# अमर श्रद्धास्थाने

७९६४
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भु-प्रवास
सं. क्र. ३५२



REFBK-0014266

श्रीराजाराम प्रकाशन संस्था, कोल्हापूर.

# अमर श्रद्धास्थानें

सं:
३७६९० १४. ग्रं.सं.
क्र. ३५२ नों दि. ६/२/६७

— लेखक —

कृ. रा. उर्फ मामा देसाई

REFBK-0014266
REFBK-0014266

श्रीराजाराम प्रकाशन संस्था, कोल्हापूर.

किंमत ४ रुपये

प्रकाशक
कृ. रा. देसाई
श्रीराजाराम प्रकाशन संस्था
२०९४, शनिवार पेठ, कोल्हापूर.

पहिली आवृत्ती १९६४

सर्व हक्क लेखकाचें स्वाधीन

मुखपृष्ठ
कोल्हापूर लिथो वर्क्स
कोल्हापूर

मुद्रक
दि. ना. कदम
बी. ए. एल्. एल्. बी
जयश्री मुद्रणालय
२५४ सी, कोल्हापूर.

क्र. ३७६१० वि: ...
क्रमांक ...३५२... नों: दि: ...

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | अमरनाथ | १ |
| २) | मौनीमठ | १९ |
| ३) | पुरीचा जगन्नाथ | २८ |
| ४) | क्षेत्र बाहुबली | ३४ |
| ५) | शिवलिंगे व शिवालये | ४२ |
| ६) | व्हलंकनी चर्च | ५३ |
| ७) | पुष्करतीर्थ–कोटीतीर्थ | ६० |
| ८) | खिद्रापूरचा कोपेश्वर | ७० |
| ९) | मक्का | ८० |
| १०) | श्रीक्षेत्र नृसिंहवाडी | ८७ |
| ११) | मंगेशीचा मंगेश | ९४ |
| १२) | मनाळी | १०४ |
| १३) | आजऱ्याचे रामतीर्थ | १११ |

# लेखकाचें निवेदन

श्रीराजाराम प्रकाशन संस्थेतर्फे माझें 'अमर श्रद्धास्थानें' हे पुस्तक वाचकांपुढें सादर करतांना मनाला मोठें समाधान वाटतें. माझ्या यापूर्वीच्या 'चार किल्ले- चार नद्या' या प्रकाशनाप्रमाणेंच याहि प्रकाशनास वाचक-वर्गाची सक्रिय सहानुभूति लाभेल आणि ती लाभावी अशी सदिच्छा व्यक्त करतो. 'अमर श्रद्धास्थानें' लिहितांना ज्या ज्या व्यक्तींचें मला सहाय्य लाभलें, त्या सान्यांचे मी कृतज्ञतेनें आभार मानतो. विशेषत: 'मक्का' आणि 'मंगेशीचा मंगेश' हे दोन लेख लिहितांना, माझे स्नेही श्री. मर्चंट व गोमांतकातील प्रियोळचे श्री. कृष्ण हरिभट्ट रेगे यांनीं आपुलकीनें जी माहिती पुरविली, ती त्यांनी पुरविली नसतीतर, ही दोन्ही प्रकरणें अमरश्रद्धास्थानांत समाविष्टच करता आली नसती. 'मंगेशीचा मंगेश' हा लेख लिहण्याकामी श्री. रेगे यांच्याप्रमाणेंच आमचे कुटुंबीय वैद्यकीय सल्लागार व उपचारक श्री. जन्वाडकर यांनीं आपल्या ग्रथसंग्रहांतील 'सारस्वतभूषण' हा बहुमोल ग्रथ बेमुदत दिला त्याबद्दल त्यांचे आभार मानणे कर्तव्य ठरते. वरील लेख लिहण्याकामीं या ग्रंथांतील माहितीचा फारच उपयोग झाला.

'अमर श्रद्धास्थानें' या पुस्तयाचा मुद्रण प्रारंभ समारंभ श्री. गणपतरावजी जाधव सं 'पुढारी' यांचे अध्यक्षतेंखालीं व श्री. अमृतराव देसाई यांचें शुभहस्तें करण्यांत आला. याची सुखद स्मृति या प्रसंगी होते. त्यांच्या व श्री दत्ताजीराव य. कुरणे यांच्या प्रेमळ सहाय्याच्या सावली-शिवाय हे प्रकाशन माझ्या हातून पुरें झाले नसते व तीच सावली तशीच माझ्यावर येथून पुढें अमरपणें रहावी अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

या पुस्तकाच्या मुद्रणाचें काम जयश्री मुद्रणालयाचें श्री. कदम बंधू यांनीं आपलेपणानें केले नसतें, तर हे पुस्तक आज तरी वाचकांच्या हाती पडलें नसते, याबद्दल त्यांचे आभार. तसेच या पुस्तकाच्या नांवास व गुणास साजेसें असे मुखपृष्ठ व आंतील चित्रें व त्यांचे ब्लॉक्स, कोल्हापूर लिथो प्रेसचे मालक श्री. कपडेकर व त्यांचे कलावंत यांनी उत्कृष्टपणें केलें. याबद्दल त्यांना हार्दिक धन्यवाद.

कोल्हापूर ता. २५।३।१९६४

**कृ. रा. उर्फ मामा देसाई**

# प्रस्तावना

'अमर श्रद्धास्थानें' हा एक भारतांतील व त्या बाहेरील अशा तीर्थ-क्षेत्रांच्या माहितीपूर्ण लेखांचा सग्रह आहे. या संग्रहांतील माहिती जितकी तपशीलवार तितकीच ती आटोपशीर अशी आहे व त्यामळें लेख मनोज्ञ झालेले आहेत. श्री. कृ. रा. उर्फ मामा देसाई यांच्या लेखणींतून हे लेख उतरले आहेत; इतके जरी म्हटले तरी त्यांच्या माहित पूर्णतेची त्यांत ग्वाही दिल्याप्रमाणें होते. श्री मामा देसाई यांचे सारेच लिखाण माहिती-पूर्ण असते. हा एक त्यांच्या लिखाणाचा विशेष मानला जातो. पुण्याच्या ठोकळ प्रकाशननें प्रसिद्ध केलेला मामांचा 'वेगळ्या शिकारकथा' हा आगळ्या शिकारकथांचा संग्रह घ्या किंवा मामानीच स्वत: प्रकाशन संस्था काढून ता मार्फत प्रसिद्ध केलेला 'चार किल्ले, चार नद्या' हा लेख संग्रह घ्या. प्रत्येक लेखांत वर्णिलेल्या विषयांची साद्यंत माहिती त्यांत पुरेपुर मिळून येतेंच. हा त्यांचा नवा संग्रहहि या त्यांच्या लौकिकास साजेसाच झालेला आहे.

'वेगळ्या शिकारकथा' या कथासग्रहांत मामानीं आपली लेखणी शिकारकथा लिहिण्यांत इतकी रंगविली आहे कीं, मामा 'अमर श्रद्धास्थानें' यासारख्या धार्मिक श्रद्धेच्या बाबतचा लेखसंग्रह इतक्या सरसपणें लिहितील असें जाणत्यास सुद्धा वाटले नसते. क्षेत्रभिन्नता असूनही त्यांत समरसपणें तल्लीन होऊन लेख दर्जेदार करणें, हा मामांची धाटणी एक आगळीच आहे, असें म्हटले तरी ते वावगे होणार नाही. त्याचप्रमाणें 'चार किल्ले, चार नद्या' बाबतहि म्हणता येईल. 'चार किल्ले चार नद्या' लिहणारे मामा, यांच्याच हातून 'वेगळ्या शिकारकथा लिहिल्या गेल्या असतील किंवा 'वेगळ्या शिकारकथा' लिहिणारे मामा व 'अमर श्रद्धास्थानें' लिहि-णारे मामा हे सारे एकच आहेत; असें म्हटलें तर त्यावर मुक्तदर्शनीं वाचकांचा विश्वास बसणार नाहीं. पण वस्तुस्थिती तशी आहे. 'वेगळ्या

शिकारकथा , जितक्या तन्मयतेनें लिहिल्या, जितकी तन्मयता त्यानीं 'चार किल्लें, चार नद्या, लिहिण्यांत दाखविली, तितकीच किंबहुना त्याहूनहि कांकणभर चढच तन्मयतेनें त्यांनीं 'अमर श्रद्धास्थानें, चितारलेली आहेत. त्यामुळें मामांचा प्रत्येक लेखसंग्रह पूर्वीच्या लेखसंग्रहापेक्षां आगळा व सरस वाटतो.

'अमर श्रद्धास्थानें' या लेखसंग्रहांतील पहिलाच अमरनाथावरील लेख इतका सुंदर व माहितीपूर्ण वठला आहे कीं त्यांतील माहिती सरकारच्या प्रसिद्धी खात्यानें दिलेल्या माहितीपेक्षां सुद्धां अधिक आहे. धार्मीक श्रद्धा आणि ती रंगवताना त्यांची त्या विषयाची झालेली तादात्म्यता खरोखरच वाखाणण्यासारखी आहे. 'मौनीबावांचे मठ' हा लेखहि अमरनाथाच्या लेखापेक्षा किंचित् सरसच वठलेला आहे. पाटगांवचे मौनीबावा व छत्रपति शिवाजी महाराज यांच्या भेटीचे वर्णन एखाद्या इतिहासकाराचे वर्णनाच्या तोडीचें आहे 'पुरीचा जगन्नाथ' 'बाहुबली' 'श्री क्षेत्र नरसोबाची वाडी' 'कोटींतीर्थ-पुष्करतीर्थ' हे लेख इतके माहितीपूर्ण झालेले आहेत कीं त्या त्या स्थळांत रहाणाऱ्यांनासुद्धां या लेखांत कांहींतरी नवीन माहिती मिळाल्याचे समाधान लाभते. कोटि तीर्थातील श्री सदगुरु नारायणदास महाराज किंवा बाहुबली क्षेत्रांतील 'बाहुबली' या नांवाचे थोर साधु व प पू. गुरुदेव संमतभद्रजी किंवा 'श्री क्षेत्रनरसिंहवाडी' मधील श्रीनृसिंहसरस्वती यांची माहिती त्या त्या लेखांत देऊन त्या विषयावरचे लेख सर्वांगपूर्ण करण्यांत मामानी मोठेच यश संपादिले आहे. 'शिवलिंगे व शिवालये' या लेखांतील माहिती तीर्थक्षेत्रांचा प्रवास करणाऱ्यास खचित उद्बोधक ठरेल अशी आहे. भारतांत शिवलिंगे व शिवालये अनेक आहेत. त्यातील विविधता व वैचित्र्य याची माहिती या लेखात आढळून येते. बेळगांवजवळील कंगराळी या गांवीं त्या गांवचे इनामदार श्री. जाधव यांचे निवासस्थानाच्या मागील परिसरांत एक शिवालय आहे; त्या शिवालयाचे वैशिष्ट्य हे कीं, त्यांत जो नंदी आहे तो द्विमुखी आहे. असा द्विमुखी नंदी भारतांत क्वचित्‌च आढळून येतो. त्याचप्रमाणें बेळगांव–

जवळील खानापूर येथील श्रीमठांत एक शिवलिंग आहे. यास चक्रवर्ति शिवलिंग असें मानले जाते. हे चक्रवर्ति शिवलिंग संगमरवरी कृष्णवर्णी पाषाणाचे असून त्यांचे वजन ११ मण ४ शेर आहे. याच्या बुडाचा घेर ६॥ फूट इतका होईल. लांबी ३। फूट व ऊंची २॥ फूट आहे. पिंडीकेची उची १० इंच असून त्याचा घेर २॥ फूट आहे. त्यांवर खाली व वर मिळून चार नागभूषणें आहेत. पैकी एकानें आपली फणा छत्रादाखल समर्पिली आहे. दुसऱ्यानें तिला दृढ अलिंगन दिले आहे. तिसरा पिंडीसमोर शाळुंकीवर लोटांगण घालून बसला आहे. व चौथा आपल्या अलिंगनानें चक्रवर्ति शिवलिंगाचा कमरपट्टा बांधला असून सगळी शाळुंका, धरणीधर श्रीमान शेषाप्रमाणें मस्तकी धारण करून बसला आहे. पिंडीच्या पाषाणावर स्वभावसिद्ध जो भस्माचा त्रिपुंड्र आहे तो पाहिला म्हणजे भोळा शंकर नुकतेच स्नान करून आसनावर विराजमान झालेले असून गंगोदकानें विभूती मर्दुन तिचा त्रिपुंड्र ललाटाग्री धारण करीत असतां त्यापैकी दोन रेषा ओलसर असल्यामुळे कृष्णवर्ण, व खालची तिसरी रेषा तावडतोब सुकल्यामुळें हास्यमुख होत्साती आपले धवलत्व उघड करीत आहे कीं काय असा भास होतो. या शिवलिंगास चक्रवर्ति म्हणण्याचे कारण कीं ते चारी खंडाचा व सात समुद्रांचा प्रवास करून आलेले आहे. अमेरिकेंत फिलाडेल्फिया येथे १८८६ च्या पूर्वी कांही वर्षे सर्व देशांतील पदार्थांचे प्रदर्शन भरले होते. त्यावेळी कलकत्त्याहून हे शिवलिंग प्रदर्शनांत मांडण्यासाठी पाठविण्यांत आले होते. लिंगाचें उघड रितीनें प्रदर्शन करणें, हे सभ्यपणास अनुचित आहे, असें व्यवस्थापकांस वाटल्यावरून ते प्रदर्शनांत मांडण्यांत आले नाही. पुढें लंडन शहरांत केनसिंगटन भागांत तसेंच प्रदर्शन झाले पण तेथेंहि पूर्वीचाच प्रकार झाला. पुढें सर जॉर्ज बर्डवुड यांनी ते लिंग आपल्या दिवाणखान्यांत ठेऊन त्यांस रुद्राक्षमाला घातली व वर झुंबर टांगण्यांत आले. तेथून हे लिंग बर्डवुड् साहेबांच्या इच्छेनुसार त्याच्या जन्मभूमींत म्हणजे बेळगांव जिल्ह्यांत आणून परंपरित आणि पुण्यकारक अशा श्री मदत्मानंद सरस्वति गौडपादाचार्य स्वामी यांच्या हस्ते शके १८१९आश्विन कृष्ण३०वास्या सोमवारी दीपावलीच्या सुमुहुर्तीं

मलापहारी नदी तटाकावरील श्रीखानापूर मठांत त्याची प्रतिष्ठापना केली.

हे एवढें विस्तारानें सांगण्याचे कारण कीं, मामानीं आपल्या लेखांत शिवाची उपासना पाश्चिमात्य देशांतही होत असे असें जे विधान केल आहे त्यास पुष्टी देण्यासाठींच होय. असो.

तीर्थक्षेत्र-ज्ञानक्षेत्र बाहुबली, मक्का व व्हेलंकिनीं चर्च यांचा समावेश या 'अमर श्रद्धास्थानांत' करून मामानी भारताच्या निधर्मी राज्याचा व परधर्मसहिष्णुतेचा पाठपुरावा केला आहे. हे तिन्हीहि लेख मामांच्या इतर लेखाप्रमाणें माहितीपूर्ण झालेले तर आहेतच पण त्या त्या स्थळांशी व त्याच्या माहात्म्याशी तादात्म्य पावून लिहिलेले आहेत. मक्केवरील माहिती देतांना जी पद्धती अंगीकारिली आहे ती अगदींच नाविन्यपूर्ण आहे. त्यामुळें मामानी मक्का न पहाता तीं पाहिल्यागत तिचे यथार्थ वर्णन केले आहे. मक्केच्या यात्रेचें वर्णन इतके वस्तुनिष्ठ झाले आहे कीं. ते वाचतांना प्रत्यक्ष यात्रेस जाऊन आलेल्या हाजीससुद्धा आपणांस कांहीतरी अधिक माहिती मिळाली असे वाटून तो समाधान मानतो हीच गोष्ट व्हेलंकिनी चर्च व बाहुबली क्षेत्र याबाबतहि म्हणता येईल.

खिद्रापूरच्या कोपेश्वरावरील लेख हा या लेखसंग्रहातील मुकुटमणीच म्हणावा लागेल. कोपेश्वराचे देवालय हे जसे शिल्पकलेच्या अतुलनियतेचे वैशिष्ठ्य मानले जाते त्याप्रमाणेच त्यावरील मामांचा लेखहि वर्णनशैलीचे एक अनुपम कसबच मानता येईल. इतकी त्यांची प्रतिभा यथें रगली आहे. तिचा विलास येथे खुलून दिसतो व त्यामुळे मामांच्या लेखनवैशिष्टयाची कसोटी दिसून येते.

यातील मामांचे सारेच लिखाण असें वैशिष्टयपूर्ण आहे. आणि वाचकहो, आपण ते प्रत्यक्ष वाचण्यांस आसुसलेले असाल, याची जाणीव ठेवून, ही माझी प्रस्तावना मी पुरी करतो.

**—दिनकरराव ना. कदम**

कोल्हापूर

ता २५।३।१९६४

# श्री राजाराम प्रकाशन संस्थेची


# पुढे पाऊलें

श्री राजाराम प्रकाशन संस्थेची आगेकूच अगदीच घोडदौडीने चालू नसली तरी ती निश्चितपणें आगेकूच मानण्याइतकी शीघ्र गतीनें चालू आहे, हे येथे नमूद करण्यास आम्हांस अत्यंत आनंद व अभिमान वाटतो. यंदा प्रकाशन संस्थेनें नवीन दोन प्रकाशनें केली असून आणखी पांच प्रकाशनांच्या संकल्प सोडलेला आहे. हा संकल्प सोडताना हावरेपणा कधीच दाखविला नाही; उलट संयम, सारासार विचार व व्यवहार आणि आपली कुवत याची जाणीव ठेवून तो सोडला आहे. 'अमर श्रद्धास्थानांचा' नंदादीप तेवत ठेवून 'तुझी कथा माझे शद्व' सारख्या ग्रामीण कथांना प्राधान्य देऊन महाराष्ट्राची 'पांच महादैवते' प्रकाशांत आणताना, 'मराठी राजकारणांतील स्त्री' चाहि यथायोग्य मान ठेवण्याचा शिष्ठपणा पाळण्यांत आला आहे. अमर श्रद्धास्थानांच्या नंदादीपाचा प्रकाश इतका प्रसन्न व सुखद वाटला कीं, त्याचा दुसरा भाग प्रसिद्ध करण्याची गरज निर्माण झाली, होहि एक आगामी 'अजबखाना' संग्रहांतील एक नवलच होय.

मराठी राजकारण ज्या थोर राष्ट्रपुरुषामुळे निर्माण झाले, त्या भारतवंद्य अशा राष्ट्रवीराचे चरित्र पुनर्मुद्रित करण्याचे कार्य संस्थेनें हातीं घेऊन प्रकाशन व्यवसायामध्यें एक मोठेच धाडस केले आहे. हे धाडस संस्थेने केलें असले तरो ते शिवप्रेमी जनतेच्या जीवावरच होय. बहुजन समाजाचा उद्धारक राजा कै. राजर्षि शाहू छत्रपति यांनीं आपल्या थोर पूर्वजाचे चरित्र कै. गु. कृ. अ. केळुसकर या थोर इतिहासाचार्या-

कडून लिहून घेतले. ते शिवचरित्र आज बाजारांत उपलब्ध नाहीं म्हणून त्याची नवीन आवृत्ति नव्या संशोधनानुसार अद्यावत करुन ती प्रकाशित करण्याचे कार्य संस्थेनें हाती घेतले आहे. अद्यावतीकरणाचे कार्य महाराष्ट्राचे अग्रसेर इतिहासकार श्री. न. र. फाटक यानीं कै. गु. कृ. अ. केळुसकर यांच्या विचारसरणीशी एकरुप होऊन व त्यांचेवरील प्रेमानें मान्य केलें. यामुळे अगोदरच उत्कृष्ठ असलेला हा ग्रंथ या नव्या लेण्यानें आधिक दर्जेदार व संपन्न होणार यांत मुळीच शंका नाहीं. असें हे शिवचरित्र शिवप्रेमीयांस सहज सुलभ घेता यावें म्हणून संस्थेनें हा ग्रंथ प्रकाशनाच्या तारखेपर्यंत अगाऊ पैसे भरुन ग्राहक होणाऱ्यास तो फक्त १० रु. स देण्याचे ठरविले आहे. या. ग्रंथाची किमत १६ रु. रहाणार आहे. हा ग्रंथ येत्या शिवराज्याभिषेकदिनी प्रसिद्ध करण्याचा मानस संस्था बाळगून आहे; तो शिवप्रेमी जनतेच्या आधारावरच. तथापि हा ग्रंथ सस्था प्रसिद्ध करणारच त्याबद्दल तिळमात्र शंका बाळगण्याचे कारण नाहीं. कै. केळुसकरांचे हे शिवचरित्र वाल्मीकीचे रामायण व व्यासांचे महाभारतच होय. शिवचरित्र ही महाराष्ट्राची भगवद्गीता आहे, व ती प्रत्येकानें संग्रही बाळगणें, हे त्यांचे थोर कर्तव्य आहे.

**–संचालक**




श्रावण पौर्णिमा ! अमरनाथच्या यात्रेचा दिवस ! भारतवर्षातील समस्त हिंदूंचे एक महत्वाचे यात्रास्थान म्हणजेच काश्मीर खोऱ्यांतील अमरनाथची गुंफा होय. या गुंफेतील हिमशिवलिंगाचे दर्शन घेऊन त्यास अनन्यभावे नमन करुन कृतार्थ होणे, हीच त्या यात्रिकांच्या आयुष्यांतील भाविक मनाची आस ! या आसेच्या घोर ओढीमुळें तो दऱ्याखोऱ्यांतून, हिमप्रदेशांतून, ठिसळ कडेकपारीवरुन बारा हजार सातशें एकोणतीस फूट ऊंचीवरील त्या गुहेकडे, त्या शिवसदनाकडे धाव घेत असतो.

निसर्गसौंदर्याचा अक्षय्य वरद्हस्त असलेली भारताची भूमि म्हणजेच काश्मीर प्रदेश होय. त्या प्रदेशांतील ती हिमाच्छादित उत्तुंग गिरिशिखरें, ते प्रशांत आणि प्रचंड जलाशय, त्या धों धों वाहणाऱ्या सरिता, ती विविध रंगांची आणि सुगंधित सुमनें, ती रुचकर फळें – परमेश्वरानें हे जणू या वस्तूंचे कोठारच केले आहे.

अमरनाथाच्या दर्शनासाठीं जाणाऱ्या यात्रिकांच्या सर्व प्रकारच्या सोयीसाठीं जम्मू व काश्मीर सरकारनें सर्व प्रकारची व्यवस्था केलेली असते. यात्रेच्या प्रत्येक टप्प्यावर वाहनांची सोय करण्यांत येत असते. शिवाय मुक्कामांत खाद्य पदार्थ, शिधा साहित्य, सर्पण, कपडेहि मिळण्याची सोय केलेली असून, या व्यवस्थेचा फायदा मिळविण्यासाठीं यात्रेस जाऊ इच्छिणाऱ्यानीं पहलगाम येथील जम्मू व काश्मीर सरकारच्या टूरिस्ट ऑफिसला, ३ आठवडे आगाऊ आपणांस यात्रेस काय काय व्यवस्था पाहिजे आहे, ते कळविले असतां यात्रिक पहलगामला पोहचताच त्याला त्या गोष्टी सिद्ध असल्याचे आढळून येते. यात्रेच्या या प्रवासांत रेनकोट अगर छत्री, बूट, जाड गरम कपडे येथें मिळूं शकतात. यात्रेकरुस कडेन्स्ड दूध घ्यावे लागते. अशा सर्व प्रकारच्या सोयी येथें उपलब्ध असतात.

अमरनाथची यात्रा म्हणजे श्रीनगरहून अमरनाथला जाणाऱ्या यात्रेकरूंची पदयात्रा होय. या यात्रेंत हजारो यात्रेकरू पायी चालत असतात. अमरनाथची काठी – या काठीला छडी म्हणतात.– ही या यात्रेची उत्सववस्तू होय. ही काठी सबंध वर्षभर, या यात्रेचा नियन्ता जो महन्त, त्याच्या ताब्यांत श्रीनगरमध्यें ठेवण्यांत आलेली असते. यात्रेस जाण्याच्या दिवशीं त्या अमरनाथाच्या छडीची यथासांग पूजा काश्मीराधिपति करतात. व नंतर यात्रा चालू होते. ही यात्रा श्रीनगरमधील शिवमंदिरांतून सुरू होते. ही यात्रा सुरू होण्याच्या प्रसंगी ज्यावेळीं काश्मीराधिपति त्या अमरनाच्या छडीची पूजा करण्यास येतात. तो सोहाळा पहाण्यासाठीं सारे श्रीनगर लोटलेले असते. श्रीनगरचे सारे सौंदर्य तेथे लोटलेले असते. हजारो पुरुष, हजारो स्त्रिया, आबालवृद्ध हा सोहळा पहाण्यासाठीं त्या प्रसगी एकच गर्दी करुन सोडतात. काश्मीराधिपतींची छडीची पूजा आटोपल्यानंतर ‘ अमरनाथजीकी जय हो ’ अशी एकच गगनभेदी घोषणा त्या अबालवृद्धांच्या तोंडून केलेली ऐकूं येते. आणि यात्रा चालू लागते.

यात्रेबरोबर थोडी पाऊले काश्मीराधिपति असतात. बंदोबस्तासाठीं पोलिस असतात. इतर अधिकारीहि पायी चालत या यात्रेस श्रीनगरची सीमा पार करतात तीन-चारशें साधू, बैरागी, भारताच्या कानाकोपऱ्यांतून आलेले असंख्य यात्रेकरू, वाद्ये, शंखफुके अशा या यात्रिकांस श्रीनगरची असंख्य जनता आपल्या वेशीवर निरोप देते. पुन्हा एकवार ' अमरनाथजी की जय हो ' ही गगनभेदी घोषणा करुन यात्रा पुढें चालू लागते. पांचव्या दिवशीं ही यात्रा पहलगामला पोचते.

पहलगामला यात्रा पोंचताच तेथे या यात्रेचे स्वागत करण्यांत येते. श्रीनगर ते पहलगाम हे अंतर ६० मैलाचे आहे. आणि श्रीनगर ते पहलगाम हा मोटारमार्ग असून या रस्त्यावर भाडोत्री वाहनें मिळतात. पुष्कळसे भाडेकरू मोटारनेंच पहेलगामपर्यंत येतात. पायीहि पुष्कळ यात्रकरू आलेले असतात. येथून मात्र पुढचा सारा प्रवास यात्रेकरूंना पायी करावा लागतो. व ज्या काहीं यात्रेकरूंना पायी प्रवास करण्याची शक्यता नसते ते घोड्यावरून यात्रेबरोबर जातात. यात्रेच्या मोसमांत पहलगाम येथे अशी जवळजवळ पांच हजार घोडी जय्यत तयार ठेवण्याची व्यवस्था सरकारकडून करण्यांत आलेली असते. यात्रेकरूंना आपले सामान नेण्यासाठीं तेथे सरकारीरित्या हमालांची व्यवस्था करण्यांत येते. यात्रेच्या मोसमांत असे सुमारे ५००० हमाल तेथे हजर असतात. व ज्यांना घोड्यावरून अगर पायीहि यात्रेबरोबर जाणे शक्य नाही अशासाठीं तेथे 'दण्डी' या नावाच्या वाहनाची व्यवस्था करण्यांत आलेली असते. ही दण्डी म्हणजे अेक प्रकारची 'पालखीच' होय. व ती चार माणसांकडून वाहिली जाते. मजूर पहलगाम ते अमरनाथला जाऊन परत पहलगामला येईपर्यंत २५ रु. मजूरी घेतो. तर एक घोडा अशा प्रवासास ४० रुपयास मिळू शकतो. दण्डीस दीडशें रुपये पडतात. भक्तिभावनेचा आणि श्रद्धेचा प्रश्न बाजूस ठेवला तरी अमरनाथाच्या यात्रेच्या मोसमांत मजूरी, घोडे, दण्डी व इतर व्यापार उदीम या तऱ्हेनें प्रजेस किती मोठा फायदा होतो, याची कल्पना येईल.

पहलगाम हे निसर्गसौंदर्याचे आगर आहे. निसर्गसौंदर्याचें काश्मीर हें भारताचे अनुपम लेणें असले तर या लेण्यांतील 'मुकुटमणी' म्हणजे पहलगाम होय. लिडार खोऱ्यांतील लिडार आणि तानिन या नद्यांच्या संगमावर हे छोटेखानी खेडे आहे. या खेड्यास 'धनगराचा गांव' असे सम्बोधिले तर ते सार्थ मानलें जाईल. देवाचिया द्वारी असलेल्या पहलगामचा परिसर देवदारच्या वृक्षांनी बहरलेला आहे. समुद्रसपाटीपासून हा भाग ७५०० फूट उंचीवर असल्यानें तेथील हवा मानवास सुखदायी वाटत असते. सुखदायी हवामान आणि विलोभनीय निसर्गसौंदर्याचे भांडार यामुळें पहलगाम सोडू नये असे वाटते. या पहलगामच्या ७–८ मैलांच्या परिसरांतहि पुष्कळ निसर्ग सुन्दर स्थळें आहेत. ७ मैलावरील अमरनाथच्या गुहेच्या वाटेवरील ती चंदनवाडी, तीन मैलावरील ते बलसारण्य ६ मैलावरील ते आरू, दोन मैलावरील ते मांडलन, दीड मैलावरील गणेशबल आणि लिडारच्या पैलथडीवरील ते मामल अगर मामलेश्वर हा स्थळें निसर्गसौंदर्यानें नटलेली तर आहेतच. पण तेथील कांहीं देवळांमुळें तर भाविक त्या स्थळांस अवश्य भेट देतात. गणेशबल येथें गणेशाचे देवालय आहे तर मामलेश्वर येथे शिवाचे देवालय आहे. या शिवालयानजीक एक पाण्याचा झरा आहे या झऱ्यांत स्नान करून भाविक शिवदर्शन घेतो. हे देवालय आज सुस्थितींत नाही. या देवालयाचे महत्व फार आहे. या महत्वाबाबत भाविक लोक श्रद्धापूर्वक असें सांगतात कीं, ते मूर्तिविध्वंसक म्हणून प्रसिद्ध असलेल्या बूतेशिकन शिकंदर गाझी याच्या हातून मोठ्या दैवी चमत्कारानें वाचलें. हा शिकंदर गाझी इ. स. १३९० ते १४१४ मध्ये होऊन गेला. श्रीनगरहून लिडार दरींतून तो एकदां अमरनाथाचें हिमशिवलिंग फोडण्याच्या हेतूनें निघाला वाटेंत त्यानें पहलगामला मुक्काम केला या मुक्कामांत त्यानें लिडार नदीच्या पाण्यांत असलेल्या गणेश मूर्तीचा विध्वंस करण्याचे योजिले, मूर्ति विध्वंसनाच्या हेतूनें तो निघाला. तो नदीच्या पात्रात उतरला. आणि मूर्तीच्या विध्वंस करण्याच्या तिरीमिरीनें त्यानें गणेशमूर्तीच्या मांडीवर मोठ्यानें

प्रहार केला तो आश्चर्य काय; त्या मूर्तीची छकले न होतां त्या मूर्तीतून रक्ताचे कारंजे उसळले. हा प्रकार पाहून शिकन्दर गाझी स्तिमितच झाला. त्याचे सर्वांग घामानें दरदरले आणि कम्प पावू लागले. कसाबसा तो नदीच्या पाण्याबाहेर आला आणि पश्चातापदग्ध होऊन त्यानें हिंदूच्या मूर्तींचा विध्वंस न करण्याची प्रतिज्ञा केली या भागांत या बुतेशिकन शिकंदर गाझानें अनेक हिंदूंचे देव आणि देवळे यांचें विध्वंसन केलें आहे. हा काळच असा होता कीं, यवनराजे धर्मान्धतेनें हिंदुमंदिरांचा विध्वंस करीत. अशीच आणखी एक सांगितली जाते. ती ही की, झेलम नदीच्या कांठो, खनवल'हून पुढें गेल्यानंतर ' बाज-प्यारा ' नांवाचे एक स्थान लागते. तेथे एक हिंदुचे देऊळ आहे. या देवळाविषयीची ही कथा आहे. जेव्हा धर्मान्ध मुसलमान हे देऊळ फोडण्यास आले तेंव्हा तेथल्या पुजाऱ्यांनीं त्यांना मुळीच विरोध केला नाही किंवा द्रव्य देऊन देवळाचा व देवमूर्तीचा बचाव करण्याचीहि गोष्ट काढली नाही. त्यानीं या माथेफिरू मुसलमानांस एवढेच सांगितले की, "या, या हे देऊळ फोडून टाका. शास्त्रांत लिहलेच आहे कीं, यवन येतील आणि मूर्तींचा नाश करून देऊळ उध्वस्त करतील" तेंव्हा बुतेशिकन गाझीला वाटले कीं, जर आपण हे देऊळ फोडले तर या काफरांची शास्त्रे खरी असल्याचा पुरावा होईल. त्यापेक्षां जाऊद्या कीं, एक देऊळ सोडून देऊं ' अशा माथेफिरूच्या तडाख्यांतून सुटलेली आज कितीतरी देवळें आहेत. त्या देवळांत देवमूर्ति आहेत. आणि त्यांच्या दर्शनासाठी नित्यश: असंख्य यात्रेकरू भारताच्या कानाकोपऱ्यांतून जात असतात. अशा प्रकारे शिकन्दर गाझीच्या तडाख्यांतून सुटलेल्या अमरनाथाची ही यात्रा पहलगामला मुक्कामाला आली आहे.

पहलगाम येथे या पदयात्रेस श्रीनगरहून मोटारनें येणारे यात्रिक येऊन मिळतात. यामुळें यात्रेकरुंची संख्या वाढते. तथापि खुद्द श्रीनगर-मध्यें वेशीपर्यन्त असलेली यात्रा पुढे कमी झालेली असते. आळंदीहून निघणारी ज्ञानेश्वरांची पालखी पंढरपुरास पोहोचेपर्यंत जशी फुगत जाते

तसा प्रकार मात्र येथें होत नाहीं. पहलगामपासून ही यात्रा सकाळी निघते. ही यात्रा निघतांना यात्रेचा नियन्ता जो महन्त तो प्रथम अमरनाथाच्या छडीची पूजा करतो. वाद्यें वाजतात शंख फुंकले जातात. आणि यात्रा 'अमरनाथजी की जय हो' या जयघोषांत पुढे चालू लागते. या दिवसाचा पुढील मुक्काम पहलगामपासून ८ मैलावर असलेल्या 'चन्दनवाडी' येथे होते. चन्दनवाडीस 'थानिन' असेहि म्हणतात.

समुद्रसपाटीपासून ९५०० फूट ऊंचीवर तिथे असलेल्या बर्फाच्या पुलाबद्दल हे स्थळ प्रसिद्ध आहे. येथें मूळ पुलावर सदोदित बर्फ पडलेले असते त्यामुळे त्यास बर्फाचा पूल असे म्हणतात. येथे यात्रकरु मुक्काम करतात. पहलगाम ते चन्दनवाडी हा मार्ग बराचसा सुकर आहे जीप, मोटारी, नेण्याइतका तो चांगला आहे. चदनवाडीत त्यादिवशीं मुक्काम करुन यात्रा पुढें चालू लागते. चंदनवाडी पासून पुढचा रस्ता अत्यंत बिकट आहे. हा बिकट मार्ग सोपा करुन यात्रिक पुढे चालत असतात.

पुण्यसंचय, मुक्तिमार्ग आणि मोक्षप्राप्ति या त्रिविध उद्दीष्टांच्या साध्यासाठीं जपजाप्य, हवन स्तवन, उपवास, तपस्या, तीर्थपर्यटण आणि यात्रा करणें हा धार्मिक वृतीच्या भाविक हिंदु मनाचा स्वभावधर्म आहे. यापैकी काहि मार्ग सामान्य जनास सुलभ आहेत. तर कांहीं दुर्लभ आहेत जे कांहि सुलभ मार्ग आहेत. त्यामध्ये तीर्थपर्यटन, यात्रा याचा समावेश होतो हे मार्ग पुण्यसंचयाच्या दृष्टीनें सुलभ असले तरी आपली कांही तीर्थस्थळें इतक्या अवघड जागी आहेत कीं, तेथें पायानें चालत जाण्या-खेरीज अन्य साधनच नाहीं. आजकालच्या वाहनांच्या युगांतहि मानवास या पुण्यतीर्थक्षेत्रासमीप चाकी वाहने नेण्याची सोय करता आली नाही. हिमालयाच्या उत्तुंग हिमशिखरावर जी कांही तीर्थस्थळें आहेत. तेथे घोडा, दंडी यासारख्या साधनानीं फार तर जाता येईल पण अन्य चाकी वाहनें तेथे जाऊं शकत नाहीत. अशास्थळीं बर्फ, वारा, हिमवर्षाव या साऱ्यांचा मारा घेऊन एकीकडे उंच डोंगर तर दुसरी कडे खोल दरी अशा पाऊल वाटेवरुन या यात्रिकांना आपला मार्ग कापावा लागतो आणि

अशा प्रकारें पायी प्रवास करणारे यात्रिक पाहिले कीं, पुण्यसंचयाचा हा सुलभ मार्ग असला तरी हे पुण्य पदरात पाडून घेण्यांत किती कष्ट असतात; याचें प्रत्यतर येतें. हे कष्टप्रद साहस करूनहि जेव्हां यात्रिक इप्सित स्थळी जाण्यासाठी जीवाचा आटापिटा करीत असतात; हे पाहिले की, वरील धार्मिक वृत्तीचा पगडा त्यांच्या भाविक मनावर किती खोल रुतून बसला आहे, याची सहज कल्पना येते. देवदर्शनाची सद्भावना, त्याचा हा बिकट मार्ग सोपा करते. सदगुणांची ठेवण, भक्तिमार्गी गाणी अगर पवित्र मंत्रोच्चार, देवाविषयीचे प्रेम, त्यांच्या भलाई विषयीच्या भावना, पवित्र स्थळें आणि तीर्थस्थानें येथें करण्यांत येणारे धार्मिक विधि, पूजाअर्चा इत्यादि कारणानें हा भाविक मनाची घडण घडलेली असते. उषेला साक्ष ठेवून थंडीच्या कडाक्यातहि तीर्थ-जलांत मंगल स्नान करतांना कुडकुडत उच्चारलेली ती मंत्राक्षरें व त्या प्रभाकराला त्या प्रवाहातच उभे राहून अर्घ्य अर्पण करणें, ही आन्हिके भाविक मनावरील तीर्थस्नानांची ओढ दृग्गोच्चर करीत नाहीं काय ? अनंत काल लोटून गेला, परधर्मीयांची अनेक आक्रमणें आली नि गेली पण हिंदुमनाची ही घडण आहे तशीच आहे. या मनाला दगडी मूर्तीतच देव आढळतो असे नाहीं. पंचमहाभूतांतहि तो त्याला आढळतो. सर्व चराचरांतहि त्याचे अस्तित्व त्याला भासते. या मनाच्या घडणींतच तिर्थपर्यटन करणें याचाहि अंतर्भाव झालेला आहे आणि म्हणूनच थंडी, वारे, कडेकपारी याची तमी न बाळगतां क्षितिजाच्या आसमंतांत अस-लेल्या या स्थानाकडे तो स्थानकावर थांबून थांबून पुढें धाव घेत असतो. त्याचे ध्येय एकच; पुढें जायचे. इप्सित स्थान गाठायचे, देवदर्शन घ्यायचे परमेश्वराला विनम्र भावे स्तवायचे, त्याला नमायचे आणि त्याच्या आशिर्वादाची अपेक्षा करून माघारी फिरायचे. हीच या यात्रिकांची आशा यात्रेतील कार्यक्रम आंखणी, तीव्र भावना. कार्यक्रम पुर्ततेची आस त्याला इतकी तीव्रपणें लागलेली असते कीं, तो हा सारा खडतर प्रवास सुखेनेव करीत असतो. बर्फाचे कण, त्याला पारिजात फुलाप्रमाणें वाटतात. डोंग-

राची चढण त्याला हिंदोळ्यासारखी वाटते, आणि अखेर ती देवाचरणी विलीन होतो.

चंदनवाडीहून यात्रा पुढें निघाली कीं, पुढील मुक्काम शेषनाग तलाव आणि वावजन यांच्या दरम्यान करते. हा भाग समुद्रसपाटीपासून १२००० फूट उंचीवर आहे. शेषनाग तलावाचा विस्तार फार मोठा असून जून महिन्याच्या प्रारंभापर्यंत त्याचा पृष्ठभाग बर्फानें आच्छादलेला असतो जूननंतर त्याचा पृष्ठभाग वितळून हिरव्यागार पाण्याच्या मोहक नदीनें सुंदर दिसतो वावजनांत मुक्काम करुन ही यात्रा पुढें चालू लागते पहलगाम पासून २० मैल अंतरावर यात्रा आली कीं, तिला महागन खिंडींतून जावे लागते. या खिंडींतून आसमंतांत नजर फेकली कीं दृष्टीस त्या देखाव्यानें भुरळ पडते. श्रावण महिन्यात या खिंडींस आसमंतांत पुष्कळ पाण्याचे तलाव झालेले दिसतात ही खिंड १४७०० फूट ऊंचीवर असून यात्रा या ऊंचीवरुन जाऊ लागली कीं, ते दृश्य मोठे मनोरम दिसते. पहेलगाम पासून २५ मैलावर पचतरणी आहे व तेथून अमरनाथ गुंफा अवघ्या चार मैलांवर आहे. हे ४ मैल अंतर यात्रिक मोठ्या आतुरतेनें तोडतात. आणि जेंव्हा अमरनाथची गुंफा त्याच्या दृष्टि पथांत येते तेव्हा ते हर्षभरीत होऊन जातात,

ज्या स्थळासाठीं यात्रिक जीवाचा आटापिटा करून व अवघड मार्गावरील हालअपेष्टा सोसून प्रवास करीत असतो; ती अमरनाथाची गुंफा त्याच्या दृष्टीपथात येताच त्याला कृतकृत्य झाल्याचा स्वर्गीय आनंद होतो. साफल्याच्या भावनेंतच त्याच्या मुखावाटें ' श्री अमरनाथजीकी जय हो ' हा जयघोष बाहेर पडतो. ही गुंफा अनंतकालापासून येथें आहे. या गुंफेचा उल्लेख अनेक प्राचीन ग्रंथांतून आढळून येतो. ही गुंफा आंतील हिमशिवलिंगामुळें फारच ख्यातनाम झालेली आहे. ती स्वर्गीय आणि अनुपम आहे. तेथील वातावरण गंभीर आहे. ती दीडशें फूट खोल व तितकीच रुंद व उंच आहे. या उत्तुंग शिखरावरील ही अमरनाथाची गुंफा दक्षिणाभिमुख असून तिच्यासमोर असलेल्या खोल दरींत गुंफेच्या उजव्या

अंगाकडून वहात आलेली अमरावती अवखळपणें उड्या घेत स्वैर गतीनें धांवतांना दिसून येते. ही गुंफा म्हणजे शिव-पार्वती सदनच मानले जाते. या गुंफेविषयीं अशी एक कथा सांगितली जाते कीं, हिमालय पर्वतांतून शिव-पार्वती नेहमींप्रमाणें फिरत असतां या स्थळीं आले. हे स्थळ त्यांना इतके आवडले कीं, त्यांनीं तेथे मुक्काम करण्याचें ठरविलें. एके रात्रो पार्वतीदेवीच्या आग्रहावरून शिवशंकरांनीं तिला अमरत्वाचे गौप्य सांगितलें. ते सांगतांना त्यांनीं आणखीहि एका गौप्याचा त्यांनीं स्फोट केला. ते म्हणाले कीं, मी कथन केलेलें अमरत्वाचे गौप्य ज्याच्या ज्याच्या कानी जाईल. ते ते अमर होतील. हे गौप्य ऐकण्यास तेथें मर्त्यभूमिवरील कोणी नव्हते. मात्र गुंफेच्या बाजूस एका ढोलींत दोन कबुतरे बसली होती. त्यांच्या कानी हे अमरत्वाचें गुपित पडले आणि ती दोन कबुतरें शिवाच्या सांगण्याप्रमाणें अमर झालीं. आजही गुंफा पहावयास जाणाऱ्यास तेथें ती दोन कबुतरें दिसतात. अनंत कालापासून सांगितली जात असलेली ही दंतकथा या दोन कबुतरांच्या गुंफेंतील वास्तव्यामुळें सत्य मानली जाते. यांत अंधश्रद्धेचा प्रश्न उद्भवत नाहीं. इतक्या ऊंच ठिकाणीं साधारणत: कबुतरें राहू शकत नाहीत. या गुंफेविषयी एक सत्य प्रकार आढळून आलेला आहे. ही गुंफा मध्यंतरी सुमारे ९ शतके तरी बर्फाच्या अच्छादनांत गडप झालेली होती. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी काश्मीर खोऱ्यांतील एका धनगरास तिचा शोध लागला. हा धनगर बाटकूटचा असून त्यास या प्रतियात्रेप्रसंगी शिवलिंगास वाहिल्या जाणाऱ्या वस्तूपैकी कांही वस्तूंचा कांही भाग देण्याचा प्रघात आजहि चालू आहे, असे समजतें

अमरनाथ गुंफेजवळ यात्रिक येतांच ते आत जाऊन विनम्रभावाने त्या हिमशिवलिंगाचे दर्शन घेऊन नतमस्तक होतात. त्या हिमशिवलिंगावर बिल्वपत्रें वाहतात, फुलें वाहतात, अक्षता घालतात, कुणी त्यास कपडे वाहतात तर कुणी धनिक आपल्या ऐपतीप्रमाणें सोन्याची बिल्वपत्रे आणि चांदीच्या अक्षताहि वाहतात. हें शिवलिंग बर्फाचे असून त्यावेवर गुंफेच्या झरोक्यांतून पाण्याची सतत धार पडते. या हिमलिंगाचा चम-

त्कार असा आहे की, ते श्रावण शुद्ध प्रतिपदेपासून आकार घेऊं लागते. प्रतिदिनीं शुक्लेंदुवत ते मोठें मोठें होऊ लागते व श्रावण पौर्णिमेस ते पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें पूर्णाकृति होते. आणि पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवसापासून ते कृष्णपक्षातील चंद्रकोरीप्रमाणें लहान लहान होत अमावस्येस निराकार बनते. अनन्यभावनानें यात्रिक दर्शन घेतो. त्यास वंदन करतो. आयुष्य सार्थकी लागल्याचा अनुपम आनंदांत बेहोष होऊन जड अंतःकरणानें बाहेर पडतो. अंतःकरणाप्रमाणेंच त्याची पाऊलेंहि जड पडू लागतात. गुंफेंत शिरण्यापूर्वीचा त्याचा असलेला अमाप उत्साह मावळतो. पण अमरनाथाची यात्रा करण्याची जीवनांतील एक महत्वाकांक्षा त्यानें पुरी केलेली असते, आणि याच समाधानांत तो यात्रेबरोबर खाली उतरत असतो.




भारत आणि नेपाळ, भूतान आदि प्रदेशांत अनेक मठ आहेत पण "मौनी मठ" म्हणून फक्त दोनच मठ प्रसिद्ध आहेत. एक हिमालयाच्या पायथ्यालगतच नेपाळ राज्यांतला आणि दुसरा सह्याद्रीच्या गिरिकंदरातला पाटगांवचा. नेपाळ राज्यांतल्या मठास "मौनी बाबा का स्थान" असे नांव आहे, तर पाटगांवच्या मठास "सद्गुरु मौनी बुवांचा मठ" असे संबोधिले जाते. या दोन्ही मठांच्या परिसरांत दोन अतिप्रसिद्ध ख्यातनाम मैदाने आहेत. एक त्याच्या पौराणिक कथा भागाने प्रसिद्ध आहे, तर दुसरे त्याच्या ऐतिहासिक घटनांनी सर्वतोमुखी झाले आहे. एकास 'रंगभूमि' अर्थात 'बिरह बिधवा' असें म्हणतात तर दुसरे 'शिव मौनी दर्शन स्थळ' या नामाभिधानानें ख्यातनाम आहे या स्थलासमोर असलेलें 'रंगभूमि' अर्थात 'बिरह विधवा' मैदान फार मोठें असून पूर्वी 'सीता स्वयंवरासाठी झालेला 'धनुर्भंग' तिथेच झाला होता अशी

त्याची आख्यायिका सांगितली जाते, तर पाटगांवच्या मौनीमठाच्या ' शिवमौनीदर्शन स्थळावर ' सन १६७६ साली आश्विन मासांत शककर्ते छत्रपति शिवाजी महाराज व पाटगांवचे मौनीबुवा सद्गुरु यांची भेट झाली असल्याचा ऐतिहासिक दाखला मिळतो 'शिव-मौनी' भेट दक्षिणेत दिग्विजयार्थ शिवाजी महाराजांची स्वारी निघण्यापूर्वी झाली व तिथें शिवबांच्या अगीकृत कार्यास सद्गुरु मौनीबाबांचा आशिर्वाद मिळाला असे बखरकार लिहितात. तर 'सीता स्वयंवरांत झालेल्यां धनुर्भंगानें सीतेनें रामास वरिलें अशी दुसऱ्यासंबंधीं पौराणिक कथा आहे दोन्हीहि प्रसंग अत्यंत महत्वाचे ! एक दिग्विजयास निघण्यापूर्वीचा, आशिर्वाद मागणीचा तर दुसरा धनुर्भंगाचा विजय संपादल्या नतर झालेल्या सीतेच्या कन्यादानाचा, दोन्हीहि प्रसग पवित्र, शुभद आणि चिरस्मरणीय ! आणि म्हणून ती दोन्ह हि स्थानें चिरस्थायी आणि ज्या मठांच्या परिसरांत ती आहेत ते दोन्ही मठहि चिरंतन कीर्तीचे होत.

हे 'मौनीबाबा का स्थान' आहे कुठें ? जानकी मंदिराच्या वायव्येंत ! हे जानकी मदीर आहे जनकपुरांत! हे जनकपूर तरी आहे कुठे? जनकपूर, नेपाळ व भारत यांच्या सीमेवर पण नेपाळात आहे. जनकपूर आजतरी नेपाळचा भाग असला तरी सांस्कृतिक भौगोलिकदृष्टया ते पूर्णतया मैथिली आहे. तेथील नागरिक मैथिली आहेत व त्यांची संस्कृति संपूर्णपणे मैथिली आहे. जनकपूरचा इतिहास हा भारताच्या सांस्कृतिक इतिहासाचा एक महत्वपूर्ण भाग आहे. ' बृहद-विष्णुपुराणांत जे मिथिला माहाम्य सांगण्यांत आले आहे, त्यांत मिथिल प्रदेशाचे दुसरे नांव ' तीर भुक्ति ' असे दिले आहे. हेच ' तीरभुक्ति ' आज ' तिरहुत ' झालेले आहे या प्रदेशांतून कोसी, गण्डक, वाघमति आदि १५ नद्या वाहात आहेत. प्राचीनकाळीं जनकपूर हे या तिरहुत प्रदेशांच्या राजधानीचे शहर होते. रामायणांत ज्या जनकपुराचे वर्णन करण्यात आलेले आहे तेच हे जनकपूर, हजारो वर्षांपूर्वीचें त्रेतायुगांतले होय. त्रेतायुगांतल्या त्या जनकपुरांत त्या वेळी राजर्षि जनक राजा राज्य करीत होता. त्या समयीं तिथें मोठमोठाले

भव्य आणि सुंदर राजप्रासाद होते राजप्रसादच्या सान्निध्यानें तेथील 'सुवर्ण मंडप' राजधानीचे वैभव वाढवीत होता. राजप्रासाद, सुवर्ण मंडप आपल्या भव्यतेनें व सौंदर्यानें नगरीचे सौंदर्य शतगुणित करीत होते. विद्या, कला, शास्त्र, संगीत आदि कलांतील पंडित नगरीला भूषवित होते विद्वज्जनांच्या पांडित्यपूर्ण आध्यात्मिक प्रवचनांनीं दाहि दिशांतील जनसमूह दिङमूढ होऊन राहिला होता. विद्वान अजिंक्य ठरत, संगीत गंधर्वांवर मात करीत, सारांश जिकडे तिकडे जनकपुरांत अग्रेसरत्व वास करीत होते व नगरी वैभवांत लोळत होती. पण कालचक्र ! कालचक्राचा प्रभाव कांहीं निराळाच आहे. शतकानुशतके ऐश्वर्यांत आणि वैभवांत असलेली ही राजधानी आस्ते आस्ते ऱ्हास पावली आणि त्यांतच ती हिमालयाच्या अगदी समीप असल्यानें तिचे वैभव नष्ट झाले व तेथे दाट जंगल निर्माण झाले. पुढें पुढें हे निबिड अरण्य निर्जनहि बनल्या-मुळें तपस्वयांनी आपल्या तपश्चर्येला ते योग्य ठरविले आणि त्याप्रमाणें तिथें अनेक थोर साधू परमेश्वराच्या आराधनेंसाठी तपश्चर्या करूं लागले. या तपस्वी साधूंमध्यें महात्मा शूरकिशोरजी हे एक मोठे साधू तपस्वी म्हणून त्यांचे नांव सर्वतोमुखी झाले होते. या थोर तपस्व्यास महात्मा चतुर्भुज गिरी असेहि म्हटले जात होते. कांही काल लोटल्यानंतर त्या प्रदेशावर राज्य करणाऱ्या सेनवंशीय राजानें महात्मा चतुर्भुज यांची ख्याति ऐकून, त्यांना त्यांच्या कार्यासाठीं शेकडो बिघे जमीन दान देऊन टाकली. तीनशे वर्षापूर्वी हे दानपत्र झालें, ते आजहि शाबूत अवस्थेत आहे. महात्मा शूरकिशोरजी एक मोठे सिद्ध पुरुष होते. जानकी हे त्यांचे उपास्य दैवत होते म्हणून जानकी देवीची ते सतत उपासना करीत. जानकीच्या उपासनेतून तिथें जानकीच्या मूर्तीची प्रस्थापना झाली आणि आस्ते आस्ते तेथें भाविकांची रीघ लागूं लागली व अनेक व्यक्तींनी ते आपले वास्तव्य-स्थान केले. महात्मा शूरकिशोरजी मोठ्या तन्मयतेनें, वात्सल्यानें आणि प्रेमभरानें जानकीचे अहर्निश भजन पूजन करीत असत. हेच साधु शूरकिशोरजी विद्यमान जनकपूरचे प्रवर्तक होत.

आजच्या या जनकपुरास जाण्यास नेपाळ सरकारनें नेपाळ–जयनगर जनकपूर हा रेल्वे मार्ग तयार केला. या रेल्वेमार्गानें आजकाल शेकडों यात्रिक जनकपुरास तेथील मंदिराची आणि मैदानांची सौंदर्यपूर्ण आणि पौराणिक कथा भागांनी आख्यायिका केलेली स्थळे पहावयास नित्य जात असतात आणि या जनकपूरांत चैत्रांत रामनवमीस, श्रावणांतील नागपंचमीस, आश्विनी विवाह पंचमीस आणि फाल्गुन पौर्णिमेस मोठ्या यात्रा भरत असतात. जनकपुरांत अनेक भव्य सुंदर कलाकृतींची मंदिरे आहेत. त्यात जानकी मंदीर, राम मंदिर, जनक मंदीर हनुमान मंदीर, लक्ष्मण मंदीर, लवांकुश मंदिर, रसिक निवास मंदिर, सुवर्ण मंडप, मौनी बाबा का स्थान, रामानंद आश्रम, शतानंद आश्रम ही सौंदर्य स्थळें आपल्या विशालतेनें आणि सौंदर्यानें पहाणारास नेत्रसुख देत असतात जनकपुरच्या परिसरांत गंगासागर, रत्नसागर ही दोन सरोवरे प्रसिद्ध आहेत. रत्नसागरास धनुषसर असेहि म्हणतात. द्विधारा नदी, दुग्धमति कुणी या नदीस दूधमति असें संबोधितात. हीहि फार प्रसिद्ध नदी आहे. विद्याकूप आणि ज्ञानकूप ही दोन कुंडेहि प्रसिद्ध आहेत. यांच्याच सान्निध्यांत देवी सीताईनें आपल्या बालपणांत राजा जनकाच्या नेतृत्वाखालीं अनेक शास्त्रांचा कलांचा अभ्यास केला होता अशी आख्यायिका आहे. जनकपूरच्या दक्षिणेंस बारा मैल अंतरावर ‘ गिरिजास्थान ’ या नांवानें संबोधिले जाणारे अत्यंत रमणीय व एकांत स्थळ आहे. या रमणीय स्थळासमिपच एक गांव आहे त्याचे नांव फुलहर. येथेंच आदिशक्ति गिरिजादेवीच्या पूजनास जानकी येत असे व अभिष्ट वरप्राप्तीच्या वरदानाचा देवीकडे मागणी करीत असें. जनकपुरांतील जानकी मंदीर हे सर्वांत मोठे आणि भव्य मंदीर होय. यास नवलखा मंदीर, शीशमहल, जानकी महल, इत्यादी नांवांनी संबोधिण्यांत येते. बुंदेलखंडच्या टीकमगढची महाराणी श्रीमती वृषभानुकुंवरि यांनी साठ वर्षापूर्वी एक लाख रुपये खर्चुन हे मदिर उभारलें आहे. या जानकी मंदिराच्या वायव्येस "मौनी बाबा का स्थान " आहे. याचेच समोर एक मोठें मैदान आहे.

या मैदानास ' रंगभूमि ' असें नामाभिधान आहे. या रंगभूमिवर सीता-स्वयंवराचा धनुर्भंग झाला होता आणि प्रभु रामचंद्रांनीं ते धनुष्य लीलेनें उचलून सीतेचा पण पुरा करून सीतेस वरिली होती, हा विराट समारंभ ज्या मैदानांत झाला तेंच हे रंगभूमि मैदान या मैदानास आज लोक बिरह विधवा असेंहि संबोधितात ' मौनी बाबा का स्थान आणि त्याच्या समोरील ते रंगभूमि मैदान सीता स्वयंवराच्या या रामायण कथेनें पुनित झाले आहे व प्रसिद्धहि झालेले आहे.

आतां आपण दुसरा मौनीमठ, जो पाटगांवचा 'मौनीमठ' म्हणून प्रसिद्ध आहे त्याकडे आणि त्याच्याच परिसरातील 'शिव-मौनी' दर्शन स्थळ या इतिहास प्रसिद्ध स्थळाकडे वळूं--पाटगांव हा गांव कोल्हापूरपासून सुमारे ५२ मैलांवर सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर वसला आहे. कोल्हापूरच्या नैऋत्येस सह्याद्रीची जी रांक आहे त्या रांकेमध्यें हणमंता घाटाच्या अलिकडेच चार मैल हा गांव आहे. हणमंता घाटातून सावतवाडीस जाण्याचा ओबड धोबड मार्ग आहे. आणि तीनशे वर्षापूर्वी या मार्गानें कोकणांतून घाटमाथ्यावर व देशांतून कोकणांत मालाची ने आण होत असे. ही ने आण बैलाच्या पाठीवरून गोण्यांतून केली जात असें. चारशे बैल किंबहुना त्याहीपेक्षां अधिक बैल एकावेळीं तांडयाच्या रूपानें या मार्गानें गेलेले आहेत असे दाखले मिळतात. शिवछत्रपतींनीं आपल्या राजकीय जीवनांत पाटगांवला चांगलेच स्थान दिलें होते गोमांतक प्रदेश व्यापून बसलेल्या फिरंग्यांकडून मिळविलेला दारू गोळा साहित्य, तोफा वगैरे माल पन्हाळामार्गे महाराजांनी जो देशांत नेला तो या हणमता घाटातून पाटगांव ममदापूर या मार्गानेंच होय. मालवण बंदरांस जातांना शिवाजी महाराज पाटगांवांत मुक्कामांस असत. महाराजांच्या ठायीं धर्माविषयी अंधश्रद्धा नव्हती पण त्यांची वृत्ति पूर्णतया धार्मिक होती. म्हणूनच अनेक सत्पुरुषांना ते भजत असत. त्यांनी पूजलेल्या आणि भजन केलेल्या साधु पुरुषांत सर्व जाति धर्माचे साधुसंत असत. मालवणास जाण्यासाठीं म्हणून महाराज एकदा निघाले असतां, त्यांचा मुक्काम नेहमीच्या पद्धतिप्रमाणें पाटगांवास

पडला होता पाटगांवांत भद्रकाळी म्हणून एक स्वयंभू स्थान आहे. यावेळीं देवीचा त्यांना साक्षात्कार झाला. महाराजांनी श्रींची पूजाअर्चा नैवेद्य वगैरे चालण्यास मौजे हणमंत तर्फ पाटगांव हा गांव राऊळ घराण्याकडे लावून दिला, तसेच पाटगांव जकायतीवर रुपये बारा नेमून दिले. आजही या घराण्याकडे श्री भद्रकाळी देवीच्या पुजारीपणाचा अधिकार चालूं आहे. पाटगांवशी शिवाजी महाराजांचा संबंध किती निकटवर्ती होता हे यावरुन दिसून येते.

मराठी राज्याची प्रस्थापना करून शिवाजी महाराजांनी स्वतःस राज्याभिषेक करवून घेतला. पाटील शिवाजी भोसल्याचा शककर्ता शिवाजी छत्रपति झाला. साऱ्या हिंदुधर्मियांस आनंद झाला शिवाजीस त्यांनी अभिष्ट चिंतून आदरें अभिवादन केले- पण मोंगलांस आणि इतर इस्लामी सत्तांस हे दृष्य साहवले नाही. त्या सत्तांनी महाराजांस हिणविण्यास प्रारंभ केला. 'दिग्विजय केल्याशिवाय सिंहासन स्थापून उपयोग कैचा ?' असे त्यांच्याविषयी त्यांना उल्लेखून बोलले जाऊं लागले. या हिणवणीस जबाब म्हणून महाराजांनी दक्षिणेत दिग्विजयार्थ निघण्याचा मनसुबा रचला. आणि कर्नाटकावर स्वारी करण्याचे त्यानी मुक्रर केले कर्नाटकावर स्वारी करण्याचा महाराजांचा हा इरादा इ. स. १६७५ च्या जुलै महिन्यांत मोरोपंत पिंगळ्याचे तोंडून, फ्रेंच व्यापारी बोरोन यास राजापूर येथें कळला होता असा उल्लेख मार्टिनच्या पत्रांत आहे. दिग्विजयाची ही गोष्ट सिद्धीस न्यावी कशी याचा विचार महाराज करूं लागले. महाराजांना याप्रकरणीं अनेक जणांनी अनेक उपाय सुचविले, अशा महत्वाच्या कृत्यास कोणा सत्पुरुषाचा आशिर्वाद मिळेल तर कार्यसिद्धि हटकून होईल असे महाराजांना वाटल्यावरून, आसपास असे सत्पुरुष आहेत काय, याचा तपास करण्यास महाराजांनी इच्छा व्यक्त केली.

या कालच्या पूर्वी पाटगांव येथें 'मौना' नामक एका सत्पुरुषांने बरीच ख्याति आणि प्रियता मिळविली होती व पाटगांवांत एक प्रशांत व प्रशस्थ स्थळ पाहून तिथें आपला मठ स्थापन केला होता. 'मौना' उर्फ


मौनी सद्गुरु हे मूळ उत्तूर भागचे. हा उत्तर गांव निपाणी आजरा या मार्गावर मध्येंच आहे. गडहिंग्लज ते गारगोटी या वाटेवरही हा गांव लागतो. मौनी महाराजांची परंपरा ही तत्कालिन प्रसृत पावलेली माधव-मुनींची परंपरा. मौना हा कथा कीर्तनें, निरुपणे करी व त्याच्या निरुपणांस असंख्य खेडुत उपस्थित होत. "मौना" च्या मागे त्यामुळें अनेक लोक लागले. मौनाची ही लोकप्रियता न साहून कथा, कीर्तनें व निरुपणें यावर जगलेल्यांनी एकदां 'मौनास' जिवंत जाळण्याचा कट करून 'मौना' ईश्वर भजनांत मग्न असतां तो बसलेल्या झोंपडीस त्यानी आग लावून दिली पण ईश्वरी प्रेरणेने "मौना" या संकटांतून सही सलामत पार पडला, मौनाच्या या अग्नि दिव्यामुळें तर तो त्या भागांत फारच प्रिय झाला पण या घटनेनंतर त्यानें निरुपणें करण्याचें सोडून दिले. मौन धारण करून पुढील आयुष्य कंठिले. मौनधारणा किंवा मौनव्रत हे परमेश्वर प्राप्तीच्या साधनेचे एक अंग आहे व त्या अंगाचा स्वीकार त्याने करून अखंडित मौन धारण केलें म्हणून मौनी सद्गुरु या नांवाने ते विख्यात झाले. असाच प्रवास करीत करीत हे मौनी सद्गुरु बैलांच्या तांड्या मागून पारगांवास आले व एका वैश्य वृद्धेनें त्यांना आपल्या पर्णकुटीत आसरा दिला. तेव्हापसून ते पारगांवचे स्थायिक झाले पारगांव हणमंताघाट, कुंडल या मार्गे ते मालवणापर्यंत फिरत असत. त्यामुळें आजहि त्या भागांत मौनी सदगुरुस मानणारी असख्य कुटुंबे आहेत. शिवाजी महाराजांनाहि या सत्पुरुषाचा प्रत्यय आला होता व त्याना महाराजांनी आपले एक गुरु मानले होते.

शिवाजी महाराजांच्या आज्ञेनुसार सेवकांनी आसमंतात तपास केला. तेव्हां त्यांना केळशी येथें 'बाबा याकूत' नांवाचे कुणी लोकोत्तर पुरुष साधू असून मालवण नजीक पाटगांव येथें मौनी बुवा म्हणून दुसरे सत्पुरुष असल्याचें आढळून आले. महाराजांना त्याप्रमाणें कळविण्यांत आले. प्रथम महाराजानीं केळशीस बाबा याकुताकडे जाण्याचे ठरविलें व त्याप्रमाणें ते केळशीस गेले. केळशीस बाबांचे दर्शनांस जाऊन संकल्प करून कांहीं उत्तर आशिर्वादाचे बोलावे तो बाबा याकूत उठोन चालले. त्याज

मागे महाराज हिंडो लागले. पायाशी लागलें तेव्हां पिकला केस दाढीचा व मिशीचा बाबांनी महाराजांचे हाती दिला त्याचा ताईत करून घालावा तो केस हरवला, त्यावरून जंजिऱ्यास सिद्धी नाहीं असें बोलले. तदुत्तर राजकारण राखून पारगांवी मौनीबुवांचे दर्शनास गेलें. मोरोपंत पिंगळ्यांचे हातीं चाफ्याचे फुलांचा तुरा व हार दिला, पंचपात्री दिली. हुजऱ्याचे हातीं नारळ व फुलांचे जिन्नस दिलें. मनांत महाराज कल्पना करून राहिले, कीं आपण चंदीचें राज्यावर जातो तर बाबांनी प्रसाद द्यावा--संकल्प करून महाराज सात तास पावेतों उभें होते. उपरांति पूजा केली. आपलें हातीं साखरेचा प्याला घेऊन बाबांचें तोंडांत साखर घातली. बाबांनी तोंडातलें उच्छिष्ट महाराजांचे हातावर दिलें. डोईवर हात ठेवला महाराजांनी बाबांस हार घातला, तुरा हातीं दिला. अभिवादनास नमलें, तोच बाबांनी मस्तकांवरील शिरपेचांत तुरा खोविला हा लाभ समजून महाराज दिग्विजयास निघालें, असा प्रसंग बखरकरांनी वर्णिला आहे, दोन वर्षांनी स्वारी यशस्वी करून परत आल्यावर महाराजांनी मौनीबुवांचे मठास १०५ होन व नेमणूक ठरवून दिली, तिची सनद तारीख ३-५-१६७८ ची उपलब्ध आहे,

ज्या ठिकाणीं शिवमौनी भेट झाली ते ठिकाण ' शिव मौनी दर्शन स्थळ ' म्हणून आज पाटगांवांतील मौनीमठांत प्रसिद्ध आहे. मौनी बाबांची ही भेट सन १६७६ च्या विजया दशमीस झाली. पुढें माघ शुद्ध एकादशी शके १५५२ ( सन १६८० ) बाबांनी, अगोदरच तयार करून ठेवलेल्या मठांतील समाधींत प्रवेश करुन जिवत समाधीं घेतली. पुढें त्यांचें शिष्यवर तूर्तगिरी यांनी मठ बांधण्याचे काम पुरे केले व त्यानंतर रामगिरी बुवांनी मठाचें भव्य प्रवेशद्वार बांधले. श्री मौनी पुण्यतिथी महोत्सव पाटगांव येथील या मठांत रथसप्तमीपासून माघ शु।। १३ पर्यंत चालतो. अभिषेक आरती, मंत्रपुष्प होऊन पालखी फिरते व माघ शु।। १३ दिवशी मोठ्या समारंभानें महोत्सवाची समाप्ति होते. हा क्रम सुमारे पावणेतीनशें वर्षांपासून आजतागायत अव्याहत चालू आहे.

नेपाळांतील जनकपुरांतील 'मौनी बाबा का स्थान' व त्या समोरील 'रंगभूमि' मैदान, सीतास्वयंवर स्थान धनुर्भंग स्थान म्हणून ख्यातनाम आहे, तर पाटगांवांतील 'मौनी मठ' आणि तेथील 'शिव-मौनी दर्शन स्थळ' दक्षिण दिग्विजय शुभशकून सूचक स्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. दोन्हीहि स्थानें महत्वपूर्ण व भावनांना हेलावणारी श्रद्धास्थानें आहेत, ती अमरश्रद्धा स्थानें होत.




पुरी हे एक हिंदूंचे मोठे यात्रा स्थान आहे आणि तेथील जगन्नाथाची रथयात्रा आसेतु हिमाचल प्रसिद्ध आहे. पुरीतील जगन्नाथाचें देवालय हे या यात्रेतील यात्रेकरूंचे भक्तिस्थान आहे. तेथील रथयात्रा प्रतिवर्षी आषाढ शुद्ध द्वितियेस भरते.

पुरीच्या जगन्नाथाच्या देवालयांत जगन्नाथ, बलभद्र आणि सुभद्रा या तीन देवतांच्या तीन लांकडी कोरीव मूर्ति आहेत. त्या तीनहि मूर्ति सुंदर रंगविण्यांत आलेल्या असतात. अधिक आषाढ मास येतो त्या सालांत या मूर्ति नव्या करून जुन्यांना तिलांजलि देण्यांत येते. या मूर्तींची रथ यात्रा म्हणजे श्रीकृष्णानें कंसाचा वध करून वृंदावनापासून मथुरेस

केलेल्या विजयी गमनाचे प्रतीक होय. जगन्नाथाचे हे देवालय इ. सनाच्या अकराव्या शतकांतले आहे. तथापि ते गंगराजा तिसरा अनंगभीम यानें बांधल्याचा उल्लेख खरा मानला जातो. हा राजा इ. सनाच्या तेराव्या शतकाच्या अगदी प्रारंभी होऊन गेला. पण या घराण्याच्या वंशवृक्ष वृत्तात या देवळासंबंधी जो उल्लेख सांपडतो, त्यांत हें देवालय अनंतवर्मा छोड-गंग या राजानें अकराव्या शतकाच्या अखेरीस बांधलें आहे, असें म्हटलें आहे. हा अनंतवर्मा छोड गंगराजा १०७८ ते ११४७ पर्यन्त राज्य करीत होता.

या देवस्थानासंबंधी अशी एक कथा सांगितली जाते की माळव्यांत अवंती येथें इंद्रद्युम्न नांवाचा सूर्योपासक घराण्यांतील राजा होऊन गेला भारतांत कोठंतरी श्रीविष्णूची नीलवर्ण मूर्ति असल्याचे त्याच्या कानीं आले. तेव्हां ती मूर्ति आपल्याजवळ असावी अशी त्याला इच्छा झाली आणि म्हणून इंद्रद्युम्नाने त्या मूर्तीच्या शोधांत दाहीदिशांना आपला सेवक वर्ग धाडला सर्वत्र शोध केल्यानतर तीन एक महिन्यांच्या कालावधीनंतर हे सारे रिक्तहस्तानें अवंतीस परत आले; पण त्यापैकी एक विद्यापति हा सेवक परत आला नाही. तो मूर्तीच्या शोधांत तीन महिने भटकत राहिला. अखेर तो सौरांच्या देशांत आला. तिथें तो रानटी जमातीच्या विश्ववसू नावाच्या एका धार्मिकाजवळ राहिला. बऱ्याच दिवसाच्या सहवासानंतर विश्ववसूस विद्यापतीसंबंधी विश्वास वाटूं लागला. हा विश्ववसू प्रतिदिनी गुपचुप एकटाच जंगलांत जात असे व तिथे असलेल्या त्या विष्णूच्या नीलवर्ण मूर्तीची पूजा करून तिला फुले वगैरे अर्पण करीत असे. विश्ववसूने एके दिवशीं विद्यापतीला आपल्या देवतेच्या दर्शनास नेले. एका उंबराच्या वृक्षाखाली ती विश्ववसूची उपास्यदेवता बसविण्यांत आली होती ती नीळ मूर्ति पाहतांच विद्यापतीस परम आनंद झाला व त्यानें मूर्तीचे दर्शन घडविल्याबद्दल विश्ववसूचे अनंत आभार मानले. या आभारांच्या भारानें विश्ववसू भारावून गेला व त्यांत तो त्या मूर्तीची पूजा करणेंस विसरला. इतक्यांत त्या उभयतांच्या कानी आकाशवाणी

पडली. " हे भक्तवत्सला या क्षणापासून मी अदृश्य होत आहे. तुला तुझी ती रोजची नीलवर्ण प्रतिमा इथे दिसणार नाहीं. इथून पुढे मी जगन्नाथाच्या स्वरूपांत रहावयास जाणार आहे. "

विद्यापतीची हकीकत ऐकून राजास मोठा हर्ष झाला आणि त्याने ती मूर्ति मिळवण्यासाठी स्वत: त्या स्थळी जाण्याची सिद्धता केली. आपल्या बरोबर कांही सेवकांना घेऊन राजा विद्यापतीसमवेत त्यास्थळी गेला. पण पाहतों तो काय ! तिथें ती निळमूर्ति दिसेनाशी झाली. त्या ठिकाणी एक वाळूचा ढीग मात्र दिसत होता. राजा खिन्न झाला, त्याने मूर्तीचा तलाश केला. तेव्हां त्याला विद्यापति ज्या दिवशी मूर्तीचे वृत्त कळविण्यास विश्ववसूस सोडून गेला त्याच दिवशी त्या परिसरांत प्रचंड वादळ झाले आणि त्या वादळांत ती मूर्ति गडप झाली असें समजून आले. त्यामुळे राजा अत्यंत कष्टी झाला आणि त्यानें परमेश्वराची प्रार्थना सुरू केली त्यावेळी पुन्हां आकाशवाणी झाली. ' हे राजा तूं सहस्त्र अश्वमेधयज्ञ करशील तर तुला विष्णु मूर्ति दिसेल. पण ही मूर्ति तूं घडविली पाहिजेस. तुला या यज्ञानंतर एक लाकडाचा ओंडका मिळेल. त्यांतून तूं तुझ्या कारागिरांकरवी हवी ती मूर्ती करवून घे. या आकाशवाणीच्या आज्ञेनुसार राजानें यज्ञ केला आणि त्याला समुद्रांतून तरंगत काठांवर आलेला एक लांकडी ओंडका मिळाला.

राजा इंद्रद्युम्नानें यानंतर आपल्या राज्यांतील सर्व सुतार कारागीरांना बोलावून त्यांना लांकडाच्या ओंडक्याची सुंदर विष्णूमूर्ति तयार करण्याची आज्ञा केली. कारागिरांची लाकडावर हत्यारे चालेचनांत. त्यांनी हरतऱ्हेनें प्रयत्न केले पण निरर्थक. इतक्यांत प्रत्यक्ष श्रीविष्णूच त्या ठिकाणी सुताराच्या रूपांत आले व आपण त्या ओंडक्याची मूर्ति तयार करतो, पण आपणांस पंधरा दिवसांचा अवधि हवा व त्या मुदतींत माझेपाशीं कुणींहि येता कामा नये, अशी विचित्र अट त्याने राजास घातली. राजानें ती अट मान्य केली व त्या सुतारास एका खोलींत ओंडक्यासह ठेऊन ती बंद करून घेतली. पुढें कांहीं दिवसांनीं त्या खोली-

तून कांहींच आवाज ऐकूं येईना म्हणून राजानें ती खोली उघडण्याची सेवकांस आज्ञा केली. सेवकांनी खोली उघडली. राजानें खोलींत प्रवेश केला. आणि पहातो तों सुतारच नाहीं आणि त्या ओंडक्याच्या तीन मूर्ती अर्धवट स्थितीत केलेल्या आढळून आल्या. त्या तीनीहि मूर्ति तीन रथांत ठेवून मोठ्या समारंभानें देवालयांत नेण्यांत आल्या व ब्रम्हाच्या पौरोहित्याखालीं त्यांची प्रतिष्ठापना करण्यांत आली. अशी या देवस्थांनासंबंधी थोडक्यांत कथा आहे.

जेव्हां एकाद्या वर्षात अधिक आषाढ मास येतो तेव्हां या जुन्या मूर्तीचे विसर्जन करून नवीन मूर्ती तयार करण्यांत येतात; यास नवकलेवर समारंभ म्हणतात. किती तरी वर्षांत एकदां हा प्रसंग येतो. या समारंभाची सिद्धता चैत्र महिन्यापासून सुरूं होते. नवीन मूर्ति करण्यासाठीं लाकूड निंबाच्या झाडांचे घेण्यांत येते. यासाठीं काकतपूर या खेड्याच्या हद्दींतील तीन झाडे शोधून निवडलीं जातात. या मूर्तींत ब्रम्ह ठेवणारा पुरोहित पुढील वर्षापर्यंत जगत नाही असे येथे मानण्यांत येते. हा ब्रम्ह ठेवण्याचा विधी उरकल्यानंतर जुन्या मूर्ति लागलीच देवालयाच्या आवारांतील देवांच्या स्मशानांत पुरून टाकल्या जातात आणि नंतर नव्या मूर्ति रथांतून देवालयाकडे नेण्यांत येतात. हीच ती रथ-यात्रा होय. रथ-यात्रा प्रतिवर्षी होते तर नवकलेवर समारंभ अनेक वर्षांतून केव्हांतरी होतो आणि म्हणून या समारंभास यात्रेकरू असंख्येनें उपस्थित रहतात.


कांडन यात्रा म्हणजे रथ तयार करण्याचा समारंभ, ही यात्रा २१ दिवसांची असते. साधारणतः वैशाख मासांत ही यात्रा भरते. ज्येष्ठ महिन्यांत स्नानयात्रा होते. स्नान यात्रेदिवशी जगन्नाथाच्या देवालयांतील जगन्नाथ, बलभद्र आणि सुभद्रा यांच्या मूर्तींना १०८ तांबे पाण्यानें स्नान घालण्यात येते. यामुळे या मूर्तींवरील रंग निघून जातो. स्नानाच्या विधीचा देखावा यात्रेकरूस सहज दिसावा यासाठी त्या तीनीहि मूर्ति एका उंच व्यासपीठावर ठेवण्यांत आलेल्या असतात. स्नानानंतर त्या मूर्ति पुन्हां

रंगविण्यासाठी पडद्यामागे नेण्यांत येतात तो पावेतो पडद्यावर तीन प्रतीमा टांगल्या जातात. रंग देण्यास १२ दिवसांचा अवधि लागतो हा सारा विधि ज्या लोकांकडून करून घेण्यांत येतो त्यांना दैत असे म्हणतात व ते विश्वकर्म्याच्या वंशातले असतात

पुरीच्या जगन्नाथाची रथ-यात्रा आषाढ शुद्ध द्वितीयेस भरते, त्या दिवशी बलभद्र, सुभद्रा व जगन्नाथ यांच्या मूर्ति त्यांच्या रथांतून मिरवत बडादांडा रस्त्यानें गुंडिका घरापर्यंत नेण्यांत येतात. हे तीनहि रथ देवालयाच्या सिंहद्वारापाशीं उत्तराभिमुख उभे ठेवण्यात आलेले असतां पुरीचा राजा मिरवणुकीच्या पुढें शृंगारलेले हत्ती, मागें लोक व या साऱ्यामागें पालखी असा हा थाट असतो. ही मिरवणूक देवळापाशीं आल्यानंतर राजा सोनेरी दांड्याच्या चौरीनें रथातील पुढील भाग स्वच्छ करतो आणि रथाच्या पुढ्यातील रस्त्याचा थोडासा भागहि झाडून स्वच्छ करतो व नंतर त्यावर गुलाबपाणी शिंपडतो. त्यानंतर रथ-यात्रा सुरू होते, प्रथम बलभद्राचा, नंतर सुभद्रेचा आणि सर्वात शेवटीं जगन्नाथाचा अशी रथांची क्रमवारी असते. हे रथ बडादांडा या रस्त्यानें मैल-दीड मैल अंतरावर असलेल्या गुंडिका घरापर्यंत मिरवणुकीनें नेण्यात येतात. गुंडिकाघर म्हणजे जगन्नाथाचें उद्यानविहारगृह होय. सर्वसामान्यपणें हे रथ सकाळपर्यंत तिथें पोहोंचतात. केव्हां केव्हां ही रथाची मिरवणूक गुंडिका-घरापर्यंत पोचण्यास कांही तासाचा उशीरा होतो; तर केव्हां केव्हां दुसऱ्या दिवशीहि जाऊन पोचते. याचे कारण रथांची बोजड व अवाढव्य चाके होत. केव्हां केव्हां ती रस्त्यांत रुतून बसतात. रथगुंडिका घरापाशीं गेल्यानतर रात्रभर तीनीहि मूर्ती रथातच ठेवण्यात येतात. दुसरे दिवशीं सकाळीं त्यांना विधीपूर्वक उतरवून घेऊन गुंडिका घरांत ठेवण्यांत येते. तेथें ते सात दिवस राहतात. नंतर परत त्या मूर्तींना रथांतून मिरवत देवालयाकडे आणण्यांत येते व त्यांना देवालयांत यथासांग बसविण्यांत येते. या यात्रेस ९ दिवस लागतात म्हणून रथयात्रेचा कार्यक्रम ९ दिवसाचा आंखण्यांत आलेला असतो. या यात्रेला अफाट गर्दी होत

असल्यानें या रथाच्या चाकाखाली कुणीतरी सांपडून मरण पावतो. यामुळें रथयात्रेला बळीं लागतो अशी गैरसमजूत यात्रिकांत दृढावलेली आहे.

अशा तऱ्हेनें चैत्रांत सुरू झालेला हा पुरीच्या जगन्नाथाचा उत्सव - नवकलेवर, कांडन यात्रा स्नान यात्रा आणि आषाढांत शुक्लपक्षांत रथ-यात्रा होऊन समाप्त होतो; पण जेव्हां अधिक आषाढ येतो व नवकलेवर समारंभ होतो तेव्हां ही यात्रा फारच प्रचंड भरत असते.




समस्त दिगंबर जैन समाजाचे असीम श्रद्धास्थान बाहूबली तीर्थक्षेत्र हे ज्ञानक्षेत्र म्हणूनहि सुपरिचित होत आहे. बाहुबली क्षेत्र हे कोल्हापूर-पासून २० मैल उत्तरेस आहे. आणि कोल्हापूर – मिरज रेल्वे रस्त्यावरील हातकणंगले स्टेशनपासुन ५ मैल अंतरावर आहे. हे क्षेत्र एका डोंगरावर पठारावर असून एकेकाळी येथें घनदाट जंगल व जंगली श्वापदे वास करीत होती यास पूर्वी कुंभोजगिरी असे म्हणत असत या पहाडाच्या तीन बाजूंना डोंगराचा गराडा पडलेला आहे आणि एका बाजूला सपाट प्रदेश असल्यानें डोंगरमाथ्यावरुन भोवतालचे दृश्य फारच मनोरम दिसते- पूर्वी डोंगरावर असलेली दाट झाडी आतां कमी झालेली असली तरी धुपाळी,

करवंद, लिंब आणि वड यांचे बरेच वृक्ष आजहि आपल्याला तेथे आढळून येतात, डोंगरमाथ्यावर वरच्या उतरणीवर पूर्वाभिमुख अशी चिरेबंदी दगडांची मुनि – गुंफा आहे. त्यामुळे या पहाडाकडे दुरुन पहिलें असता. तो एखादा बालेकिल्ला असल्याचा भास निर्माण होतो इतकी ती मुनि–गुंफा किल्लेवजा बांधण्यांत आली आहे. परमपूज्य चा. च. १०८ शांतिसागराचार्यांचें आगमन येथें अनेक वेळा झाल्यानें या कुंभोजगिरीलाहि पावित्र्य लाभलें आहे.

डोंगरमाथ्यावरच्या छोटयाशा पठारावर दिगंबर-श्वेतांबरांची मंदिरे व धर्मशाळा आहेत. या मंदिरांत अलिकडेच बांधण्यांत आलेलें सातशिखरी पार्श्वनाथांचे मंदिर फारच चांगलें आहे. या मंदिराची प्रतिष्ठा विक्रम संवत् १९२६ मध्ये झाली आहे. या मंदिरासमोर एक सभामंडप आहे, तो संवत् १९६२ मध्ये उभारला आहे. या पार्श्वनाथ मंदिराशेजारीच आद्य तीर्थंकर ऋषभदेव यांचे मंदिर आहे. हे मंदिर मात्र अतिप्राचीन असून ते कधी आणि कुणी बांधले याचा शोध अद्याप लागलेला नाही. मात्र सुमारें अडीचशे वर्षांपूर्वी या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यांत आला, असे सांगणारी वृद्ध माणसे तेथे आढळून येतात. कुंभोजगिरीस बाहुबलीचा डोंगर हे नांव पडले आहे. ते तेथे वास्तव्य करून राहून गेलेल्या ‘ बाहुबली ’ या महामुनीवरूनच होय. या बाहुबली महामुनींच्या पादुका असलेले एक देऊळ तेथेच असून त्या पादुकाशेजारीच त्यांची जुनीपुराणी खड्गासनाधिष्ठित मूर्ति आहे;

सुमारे दोनशेंहे वर्षांपूर्वी या कुंभोजगिरीवर बाहुबली या नांवाचे थोर जैन साधु वास्तव्य करुन रहात असत, ते अत्यंत तपस्वी होते. त्यांच्याच काळीं कुंभोजगिरीपासून दीड दोन मैल अंतरावर असलेल्या एका डोंगरावर बाबूजमाल या नांवाचें एक फकीर रहात असत. जैन साधू बाहुबली आणि फकीर बाबूजमाल हे एकमेकांस जाणत असत व या जाणतेपणांतून ते एकमेकाकडे आकर्षिले जात आणि त्यामुळें त्यांच्या वारंवार भेटी होत. या भेटात त्यांची अध्यात्मावर चर्चा चालत

असे. या अध्यात्मावरील चर्चेत ते इतके तल्लीन होऊन जात कीं, सूर्य पश्चिम क्षितिजाच्या खाली गेला व सर्वत्र अंधार पडला याचे भानहि त्यांना रहात नसे. असेच एके दिवशीं बाबूजमाल फकीर कुंभोजगिरीवर बाहुबली साधूशीं अध्यात्मावर चर्चा करीत असतांना सूर्यास्त होऊन अंधार पडला. भोंवतालच्या अरण्यातील श्वापदे संचारासाठीं उठली! त्यांच्या भीषण आरोळ्या वातावरणांत दुमदुमू लागल्या, वाघांच्या क्रूर गुरगुरण्यानें वातावरण अगदीच भयानक झाले, बाहुबली स्वामीस या वातावरणाचा परिचय होता. पण बाबूजमाल या गोष्टीस अपरिचित होता. यामुळे तो किंचितसा अस्वस्थ झाला. त्याची हीं अवस्था बाहुबली स्वामींच्या ध्यानीं आली व त्यांनी बाबूजमालास शांत रहाण्यास सांगितले आणि त्यानीं बाबूजमालच्या बैठकीभोवती एक वर्तुळ काढले व या वर्तुळाची रेषा ओलांडून हीं क्रूर श्वापदें आंत येणार नाहींत. असें त्यास सांगून ' निश्चित रहा ' असे म्हटले, अंमळशानें वाघ गुरगुरत त्या स्थळी आला. पण तो ती रेषा ओलांडू शकला नाहीं गुरगुरतच त्या वर्तुळाभोवती फेऱ्या मारून तो वाघ निराश होऊन परतून गेला. बाहुबलीच्या आत्मिक बलाची याप्रमाणें बाबूजमाल यांस प्रचिति आली अशा कितीतरी गोष्टी कुंभोजगिरीच्या आसमंतांत वास्तव्य करुन रहात असलेल्या लोकांकडून ऐकावयास मिळतांत. बाहुबली स्वामींच्या वास्तव्यामुळें कुंभोजगिरी क्षेत्र झालें आणि तेथें कार्तिक व चैत्र पौर्णिमेस यात्रा भरण्यास प्रारंभ झाला. आज या तीर्थक्षेत्राचे महत्व इतके वाढले आहे की, तेथे भरणाऱ्या यात्रांना भारतांतील जैन लोक हजारोंनी येत असतात.

या बाहुबलीच्या धर्मक्षेत्राचे ज्ञानक्षेत्र करण्याचे थोर कार्य सोलापूर जिल्ह्यांतील करमाळे गांवचे प. पू. गुरुदेव समंतभद्रजी यानी केलें, आज परमपूज्य गुरुदेवांचे वय ७२ वर्षे असून या बाहुबली विद्यापीठास नालंदा विद्यापीठाचा दर्जा प्राप्त करून देण्याची त्यांची मनीषा तीव्र आहे आणि धनिक जैन समाजाच्या दातृत्वावर तेहि होणे कांही अशक्य नाहीं.

इ. स. १८९१ च्या डिसेंबरच्या १७ तारखेस सोलापूर जिल्ह्यांतील करमाळे गांवी परमपूज्य गुरुदेवांचा जन्म झाला. त्यांच्या वडलांचे नांव कस्तुरचंद असे होते आणि वंदनीय मातोश्रीचे नांव कुंकुंबाई असे होते. कस्तुरचंदाचे घराणे अत्यंत धर्मनिष्ठ, पापभिरु आणि ध्येयप्रवण होते. त्याचे हेच संस्कार त्यांच्या मुलावरहि झाले. स्वामी श्री. समंत भद्रजींचें पूर्वाश्रमीचे नांव देवचंद असे होते. देवचंदाच्या अंगी जन्मत: विचक्षण आणि विलक्षण धर्मप्रीति होती. धर्मग्रंथांचें वाचन आणि जिनेश्वराचे पूजन यामुळें देवचंदाचे मन तत्वनिष्ठ व धर्मशील झाले. खूप ध्यानधारणा करावी, तपस्वी बनावे, ज्ञानाच्या अथांग सागरांत सतत डुंबावे असे त्यांना वाटत होते. वयाच्या आठव्या वर्षी, एका रात्रीं त्यानीं कांहीहि न खाण्यापिण्याचे व्रत स्वीकारले. ज्ञानाची तीव्र लालसा हृदयांत जागी असतांना व वैराग्यशीलतेची उपासना अखंड चालू असताना आपल्या मुलाचे लक्ष इतर प्रापंचिक गोष्टींकडे गुंतेल, असे देवचंदाच्या मातापित्यांनाहि वाटत नसे. करमाळी येथे प्राथमिक शिक्षण संपवून ते सोलापूरला पुढील शिक्षणासाठीं गेले. तेथील नॉर्थकोट हायस्कूलमध्ये त्यानीं आपले नांव दाखल केले. शाळेचा अभ्यास शाळेच्या वेळेंत आणि इतर वेळीं व्यायाम हा त्यांचा नेहमीचा क्रम असे. साधी रहाणी व उच्च विचारसरणी यांचबरोबर बलवान शरीरयष्टी या व्रताचाहि त्यांनी अंगीकार केला. शरीराच्या मशागती बरोबर मनाचीहि मशागत झाली पाहिजे, नाहींतर विकारांच्या प्रवेशाला उधान येते हे मनांत बिंबवून सामर्थ्य आणि विवेक यांची फारकत त्यांनीं कधीहि होऊ दिली नाहीं. बालवयांत त्यानीं स्वामी विवेकानंदांच्या पुस्तकांचा अभ्यास केला, त्यांची पुस्तके एकदां नव्हे अनेकदा वाचली व त्यावर चर्चाहि केली. मॅट्रिक परीक्षा पास झाल्यावर पुढील शिक्षणासाठी त्यांनी पुण्यास जावयाचे ठरविले; पण कांही कारणामुळे ते न जमल्यामुळें ते जयपुरास गेले. तेथील अर्जुनदास शेठ हे मोठे धर्मज्ञ आहेत, अशी त्यांची ख्याति ऐकूनच ते जयपुरास गेले. तेथील वास्तव्यांतहि त्यानीं

धर्मज्ञान प्राप्त करुन घेतले. त्यानंतर ते मुंबईला गेले. तेथे त्यानीं विलसन कॉलेजांत नांव घातले. कॉलेजमध्यें शिकत असता त्या शिक्षणपद्धतीचा त्यांना वीट आला. विवेकानंदांची पुस्तके वाचून भारतीय उत्थानाचे जे चित्र त्यानीं रंगविले होते, त्यांच्याशीं कॉलेजच्या वातावरणाचा काहींच मेळ बसत नव्हता. अशावेळी हिमालयात जाऊन ध्यानधारणा करावी, अशी प्रेरणा त्यांच्या मनांत झाली असल्यास नवल नाहीं. म्हणून ज्यू. बी. ए. चा अभ्यासक्रम संपताच ते मसूरीला गेले. इकडील वास्तव्यांत त्यांनीं आर्यसमाज गुरुकुले पाहिलं. ख्रिश्चन लोकांच्या शाळा पाहिल्या व आपणहि कांहीतरी असेच समाजोपयोगी कार्य करावे व तेणेकरुन स्वतःची ध्येयसिद्धि साधावी, असे त्यांच्या मनानें घेतले.

मसूरीच्या थंड हवेंत त्यानीं ध्यानधारणेचे अनेक प्रयोग केले. निरामय आनंदहि लुटला पण तेथील हवामान न मानवल्यानें त्यांची प्रकृति बिघडली व त्यामुळें मसूरी सोडावी लागली. यानंतर ते विदर्भांतील कारंजा येथे आले तेथील श्री वीरसेन भट्टारक यांची अध्यात्माचे एक थोर उपासक म्हणून ख्याति होती. त्यांच्याकडे श्री. देवकुमार गेले व तेथे अध्यात्मरसांत ते तल्लीन होऊं लागले इंग्रजी शिक्षण घेणारा तरुण आणि त्याचा अध्यात्माकडे सक्ति हे पाहून गांवांतील प्रमुख मंडळीनीं ५००००रु. गोळा करुन देवकुमारांच्या स्वाधीन केले व त्याला त्याच्या ध्येयाप्रमाणें जनसेवेची संधि दिली. या रक्कमेतून त्यानीं १९१७-१८ सालीं महावीर ब्रम्हचार्याश्रमाची स्थापना केला. आणि हाच देवकुमाराचा समाजसेवेचा प्रारभ होय अव्याहत उद्योग, व्यवहार चातुर्य आणि निस्पृहता यामुळें गांवांतलच नव्हे तर आमपासची जनताहि आकृष्ट होऊं लागली. त्यामुळें कारंजा येथील या संस्थेला अनुभवी माणसाचा संच उभा केला. आश्रमाचा वृक्ष वाढं लागला. तथापि त्यानीं आत्मकल्याणचे ध्येय स्वप्नातहि दूर होऊ दिले नाहीं. १९३३ साली त्यानी श्रावकपदाची सीमा गाठलीं, त्यांनी संन्यास घेतला व क्षुल्लकपद स्वीकारले. एक कौपिन आणि अर्धखडित अशी व्रतें त्यानीं स्वीकारली कठोर जीवनाचा हा त्यांचा पहिला टप्पा होय.

१९३४ सालीं बाहुबली क्षेत्रावर त्यांचें आगमन झालें व तेथे त्यानीं प्रथम श्री बाहुबली ब्रम्हचर्याश्रम या नांवाची संस्था काढली. त्या सस्थेचा आज मोठा वटवृक्ष झाला असून तेथें आतां ' बाहुबली विद्यापीठ ' या नांवाची संस्था अनेक अंगी ज्ञानदानाचे कार्य धर्मप्रवणतेनें करीत आहे. विद्यालय, स्वाध्याय मंदिर, शास्त्रसभा मंदिर, विज्ञान मंदिर, प्राचीन हस्तलिखीत ग्रंथ व ताडपत्र संग्रहालय, व्यायाम मंदिर, सभागृह, अतिथिनिवास, औषधालय, छात्रालय, हायस्कूल वगैरे विभागाचे कार्य व्यवस्थित चालले आहे. नालंदा विद्यापीठ या प्राचीन संस्थेप्रमाणें आपलेहि बाहुबली विद्यापीठ व्हावें, अशी चालकांची मनीषा असून त्याप्रमाणें त्यांची प्रगति होत आहे.

श्री बाहुबली ब्रम्हचर्याश्रमाचे आज बाहुबली विद्यापीठांत रुपांतर झाले. सुरुवातीच्या बाहुबली ब्रम्हचर्याश्रमास वसतिगृहयुक्त व गुरुकुल पद्धतीच्या प्रशालेचे स्वरुप होते. पण पुढें प्रशालेच्या वाढीबरोबर इतरहि समाजसेवेची व संस्कृति संवर्धनाची अंगे निर्माण झाली. त्या सर्व संस्थांचे सामुहिक स्वरुप म्हणून आज श्री बाहुबली विद्यापीठ आहे. बाहुबली ब्रम्हचर्याश्रम प्रशाळेचें रुपांतर श्री. मोतीचंद गौतमचंद विद्यामंदिरामध्ये करण्यात आले. कारण या विद्यापीठाचा पहिला विभाग म्हणजे शिक्षण प्रसार होय. या मंदिराला जोडून तांत्रिक विभागहि निर्माण करण्यात आला. श्रीमति कस्तुरबाई टेक्निकल इन्स्टिटयूट हे त्या विभागाचे नांव, हा जरी आज हायस्कूलचा टेक्निकल विभाग असला तरी नजीकच्या काळांत या विभागातर्फे अत्यंत उपयुक्त असें टर्निंग, फिटिंग, मोल्डिंग, वायरमन, इन्टरनल कंबशन, मेकॅनिकल इंजिनीअरिंग इत्यादि अल्पकालिक कोर्सेस सुरुं होतील. मॅट्रीक पास झालेल्या मुलांना एक वर्ष सेवायोग द्यावा लागतो. हे सेवेचे वर्ष त्यानीं स्वतःची पात्रता अधिक वाढीस लावण्यासाठीं काढावयाचे असते याशिवाय जी मुले संस्थेच्या कार्याशीं एकरुप होण्याची इच्छा करीत असतील, किंवा उच्च धर्मग्रंथांचे अध्ययन गुरुंच्या सान्निध्यात राहून पूर्ण करणार असतील किंवा संस्थेचा कार्यकर्ता बनण्यासाठीं जे

आवश्यक पाठ आहेत ते घ्यावयाची इच्छा करीत असतील तर त्यांची सोय करण्यासाठीं हे महाविद्यालय आहे.

याशिवाय बाहेरून प्रि-डिग्री, इटर आर्टस् इंटर कॉमर्स यांच्याहि परीक्षांना बसण्याची तयारी करून घेतली जाते. शिवाय धर्म, न्याय, संस्कृत या शाखांचा विशिष्ट अभ्यासहि पूर्ण करून घेण्याची सोय उपलब्ध आहे. अध्ययनाचे प्रमुख अंग म्हणजे ग्रंथालय होय. येथेहि 'सरस्वती भांडार' नांवाचे ग्रंथालय स्थापन झालें असून पोस्ट ग्रॅज्युएट-साठीं इडॉलॉजा, फिलॉसॉफी किंवा जैनॉलॉजीवर अभ्यास करण्यासाठीं हें भांडार उपयुक्त ठरणार आहे. लवकरच या भांडारातर्फे रिसर्च करू इच्छिणाऱ्यांची सोय विद्यापीठानें करण्याचे ठरविलें आहे. या खेरीज 'सन्मति' नांवाचे एक मासिक मराठी व कानडी या दोन भाषांतून प्रसिद्ध केलें जाते. यासाठीं विद्यापीठाचा स्वतःचा प्रेस असून त्या प्रेसचा उपयोग शालेय विद्यार्थ्यांना प्रिंटिंग कंपोझिंग, स्टिचिंग आणि बाईंडिंग शिकविण्यासाठीहि केला जातो. याशिवाय विद्यापीठाचे सांस्कृतिक विभाग असून त्यागी-ज्ञानोपासना मंदिर नामक संस्थाः कार्य करीत असून सत्वशील, ज्ञानी व चारित्र्यवान मार्गाकडे जायचे असेल अशांना त्यांच्या ज्ञानसंवर्धनासाठीं, तपाराधनेसाठीं व आत्मकल्याणासाठीं ती सहाय्यभूत होत आहे. त्याखेरीज दक्षिण भारतीय दिगंबर जैन महासभा या नांवाची संस्था असून दक्षिणेंतील जैन समाजाचे एकीकरण व्हावे व त्या समाजाची सर्वांगाण उन्नति व्हावी यासाठी ती झटते. याशिवाय परीक्षालय, श्री. भूपाल अण्णा बहिरशेट आरोग्यधाम याहि संस्था आप-आपल्या परीनें कार्यक्षम रीतीनें कार्य करीत आहेत.

बाहुबली डोंगराच्या पायथ्याशीं १ श्रीबाहुबली जिनमंदिर बांधण्यांत आलें आहे. समय शरण-भवनानें दक्षिणेंतील शिल्पात भर टाकली आहे. तीर्थंकर ज्या सभेंत आपल्या मंगलमय उँकार ध्वनीनें सर्व जीवांना आत्मकल्याणाचा मार्ग दर्शवितात तो कल्याणकारी प्रसंग संगमरवरी दगडाच्या कोरीव कामानें सजीव केला आहे जिनमंदिरासमोर ४१ फूट

उंचीचा संगमरवरी स्तंभ उभा केला आहे. २८ फूट ऊंचीची श्री बाहुबलीची महामूर्ति येथे बसविण्यात आली असून तिची प्रतिष्ठापना ता. ३१ जानेवारी ते ८ फेब्रुवारी १९६३ अखेर एक महोत्सव साजरा करुन १००० वर्षानंतर श्रवणबेळगोळ येथील मूर्तिनंतर ही महामूर्ति स्थापन करण्यांत आली आहे.

या संस्थेची स्थापना २५ वर्षापूर्वी झाली आणि या संस्थेचा रोप्यमहोत्सव श्री बाहुबली मूर्तीच्या प्रतिष्ठापना महोत्सवांत साजरा केला संस्थेचें स्वरुप अधिकाधिक लोकाभिमुख व्हावे, व भारतातील विद्येचें व संस्कृतीचें महत्तम केंद्र तें बनावें, अशी इच्छा व्यक्त करुन प्राचीन नालंदा विद्यापीठाप्रमाणें हेहि विद्यापीठ व्हावे, अशी सद्भावना या संस्थेचा हा वटवृक्ष पाहून कोणीहि विचारवंत व्यक्त करील.

# भारताच्या कानाकोपऱ्यांत असलेली




आपल्या भारत देशांत असा एकहि भाग नाही कीं, जिथे शिवालय, शिवलिंगे व त्याचे उपासक नाहींत. शिवलिंगाची ही उपासना भारतांतील बहुसंख्य लोक करीत असतात ही उपासना भारतांत अनादि कालापासून चालू आहे. हिमालयांतील मानससरोवर, कैलास पर्वत आणि काश्मीरच्या अमरनाथापासून तो कन्याकुमारी आणि रामेश्वरपर्यंत आणि अटकेपासून ते कटकपर्यंत शिवलिंगे आणि शिवालयें इतक्या विपुल प्रमाणांत आढळून येतात कीं त्यांची गणनाहि करतां येणार नाहीं जिथें जावें तिथें शिवालय आहे. निदान उघड्यावरील शिवलिंग तरी आहेच. आणि 'हर हर शंभो'

म्हणून त्या शिवाची उपासना करणारा भक्त पण आहेच. हिंदूंचें ३३ कोटी देव आहेत अशी अख्यायिका आहे. कदाचित् प्रत्येक हिंदुमात्र हा परमेश्वरच मानून त्याच्या संख्येवरून ही देवसंख्या मानली जात असेलहि. पण ते कांहींहि असो. हिंदूंचे देव असंख्य आहेत असे मानले जाते हे तरी निर्विवाद होय. या देवतांची तितकींच देवालये भारतांत आहेत आणि या देवालयांत शिवलिंगांची संख्या अधिक आहे असें जरी कुणी म्हटले तरी ते आंधळ्या शिवभक्तीचें द्योतक न मानतां ते वस्तुस्थिती निदर्शकच मानले पाहिजे

केवळ भारतांतच नव्हे तर भारताबाहेरहि पृथ्वीतलावरील सर्व देशात ही शिवलिंगाची उपासना केली जात असे. ख्रिस्ती धर्म स्थापनेच्या पूर्वी, पाश्चात्य देशांत प्राय: सर्वपंथीयांत, कोणत्या ना कोणत्यातरी रुपानें सर्वत्र लिंगपूजा प्रचारांत होती. रोम आणि युनान या दोन्ही देशामध्यें प्रिपेयस व फल्लूस या नांवानें लिंगपूजा होत होती या दोन्हीं राष्ट्रामधली प्राचीन धर्मामध्यें ईशोपासनेंत लिंगपूजेंस प्रधान अंग होते. लिंगाबरोबर बैलाचीहि मूर्ति पूजिली जात होती. मिश्र देशांत हर आणि ईश यांची उपासना करणें, त्यांच्या धर्माचे प्रधान अंग होते. या तिन्हीहि देशांत प्राय: फाल्गुन मासांत वसन्तोत्सव साजरा केला जात होता व या उत्सवाचे प्रधान अंग म्हणजे लिंगपूजा असे. हा उत्सव प्रतिवर्षी साजरा केला जात असे मिश्रदेशांत ओसिरी नामक एक देवता आहे व अबिसिनियामधील चद्रशैल पर्वतांतून उगम पावणाऱ्या नील नदीला तिच्या परिसरांत असलेल्या देवदेवतांमुळें फार महत्व आलेले होते व तेथेहि ही ओसेरी देवता अधिष्टात्री देवता म्हणून मानली जात होती. प्लुटार्कच्या लेखावरुन असे सिद्ध होते कीं, त्यावेळीं मिश्र देशांत प्रचलित असलेली लिंगपूजा साऱ्या पश्चिम राष्ट्रांत चालू होती.

अमेरिकेमध्येंहि तेथे प्राचीन काळीं रहाणारे लोक लिंगपूजा करीत होते असे मिळून आलेल्या प्राचीन मूर्तिवरून अनुमान निघते तीन लोकांचा सम्राट म्हणून ज्याला हिंदु लोक त्रिलोकनाथ म्हणतात त्याला

त्रिलोकनाथ याच नांवानें मेक्सिकोमध्ये ते लोक संबोधित असत. स्पॅनिश लोकांनी मेक्सिकोंत आक्रमण केलें तेव्हां त्यांनी त्या त्रिलोकनाथाचा अपभ्रंश करून *Tloque Nahuaque* असे नवे नांव दिले. मेक्सिकन लोक त्रिलोकनाथाला आपला प्रमुख देव-नियंता आणि निर्माता असे मानत होते. मेक्सिकोमधील सर्वांत मोठ्या देवालयांत शिवलिंगें आहेत. आणि दक्षिण अमेरिकन राष्ट्रांतील म्युझियमस्‌मध्यें पुष्कळशी शिवलिंगें आढळून येतात. शिवाला आपण संहारक देवता मानतो. त्याप्रमाणें मेक्सिकन लोकहि शिवाला संहारक देवता मानतात आणि ते *Huitzlipochtli* या देवाला योद्धा मानतात. तो देव म्हणजें शिवाची प्रतिमाच होय. राष्ट्रीय चिनी व जपानी साहित्यांतहि लिंग पूजेचा उल्लेख आढळून येतो. जुन्या प्राचीन मूर्तीवरून अमेरिकेतहि तेथें प्राचीन काळीं रहाणारे लोक लिंगपूजा करीत होते असें अनुमान निघते.

यहुदी लोक आपल्या देवतेची पूजा लिंगमूर्तीच्या पूजेप्रमाणें करीत असत मायावा आणि मर.नावासा यहुदांनीं आपलें उपास्य दैवत लिंग याची स्थापना फैगोगिरीवर केली होती. यहुदी आणि मिश्र देशांतील लोक यांचा लिंगपूजेचा उपासना विधी जवळजवळ एकच होता. मिश्र देशांतील लोकांच्या ॲसिरिस देवतेच्यापुढें शिवलिंगासमोर असलेल्या बैलाप्रमाणें बैल ठेवला जात असे. यहुदी लोक डोंगरांत खडकावर अगर एकाद्या मोठ्या वृक्षाखालीं लिंगाची प्रस्थापना करुन पूजा करीत असत. ही मूर्ति दगडाची करीत आणि तिच्यासमोर धूप जाळून नदीसहि पूजीत असत फरान्सच्या अनेक प्रसिद्ध भागांमध्यें आजहि लिंगप्रतिमा आढळून येतात. पर्वताच्या शिखरावर, धर्ममंदीरांत आणि म्यूझियमस्‌मध्यें लिंगरूपांतील दगड ठेवण्यांत आलेले आढळून येतात. फरान्समध्येंच नव्हे तर इतर पाश्चिमात्य राष्ट्रांतसुद्धां हा प्रकार आढळून येतो. ;पाश्चात्य देशांत लिंगपूजेचा इतका प्रचार झाला होता कीं लिंगाची *Phallicisam* करणें हा एक संप्रदायच मानला जात होता. या संप्रदायाचे अस्तित्व इतरहि राष्ट्रांत आढळून येत होते. आमच्या वैदिक साहित्यामध्ये पणि

जातीच्या लोकांची चर्चा झालेली आहे. ही पणि जात म्हणजेच पाश्चात्य वणिक् समाज होय. या व्यापारी समाजाचे येणे जाणें भारताशीं होत होते. नंतर या लोकांना पानेश संबोधिले जाऊं लागले. त्यांच्यामध्यें बालेश्वर लिंगाची उपासना भारतीय पद्धतीनें विधीपूर्वक होत होती. यांच्या देवळाची बांधणीहि भारतीय देवळांच्या घाटणीवर होती. हे आजकाल त्यांच्या मिळून येत असलेल्या अवशेषांवरून म्हणतां येईल. अमेरिकेंत पेरू नांवाच्या देशांतील प्राचीन रहिवाशांचें जुने नांव राजवंश सुर्यवंशी असें होते आणि ते लोक ' रामसीतोया ' नांवाचा एक महोत्सवही करीत असत.

इस्लामी धर्माचा संस्थापक मंहमद पैगंबर याच्या पूर्वी अरब-स्थानांत 'लात' नांवाच्या देवतेची उपासना करीत असत. हे उपास्य दैवत लिंगाच्या रूपांत असे भारतांतील सोमनाथाच्या शिवलिंगालाहि पाश्चिमात्य लोक लात असेच संबोधित असत. या दोन्ही ठिकाणच्या लात मूर्ति फार मोठ्या आणि रत्नजडीत करण्यांत आल्या होत्या अशी ख्याती आहे. सोमनाथाचें हें लिंग एकाच दगडाचे करण्यांत आले होते. हे ५० पुरुष उच्च होते. ज्या मंदीरांत लिंगाची प्रस्थापना करण्यांत आली होती तें मंदीर उभारण्यासाठीं उंचच उंच व सोन्यानें मढविलेले ५६ खांब उभारण्यांत आले होते. सोमनाथाचा विध्वंस महमद गझनीनें करून तेथील सोने व हिरेमाणके लुटून नेली.

अरबस्थानांतील मक्केमधील या प्रतिमेस लात असे संबोधित असत व सोमनाथाच्या प्रतिमेसही लात असेच म्हणत असत. दोन्ही ठिकाणच्या प्रतिमा उंची रुंदी व आकारानें सारख्याच होत्या. रिचर्डसन नांवाचा कोशकार असे म्हणतो की, लातची प्रतिमा ही अल्लाच्या सर्वात मोठ्या मुलीच्या स्मरणार्थ स्थापिली गेली होती. मुसलमानांनीं या लातचा विध्वंस करुन टाकला आणि अवशेषही ठेवला नाहीं; परंतु मक्केश्वर हा आजपर्यन्त लिंगरुपांत मक्केंतील काबामध्यें अस्तित्वांत आहे. या मक्केश्वरांतील लिंगाची चर्चा भविष्यपुराणांत ब्राम्हपर्वांत

करण्यांत आलेली आहे. मक्केश्वर लिंग काळचाशार दगडापासून करण्यांत आलेले आहे. यालाच मुसलमान 'असवध' असे म्हणतात. प्रथम यहुदी इसरायली लोक याची पूजा करीत असत. महंमद पैगंबराच्यावेळीं ही पूजा करण्याचा हक्क पूजाऱ्यांच्या चार घराण्याकडे होता. अलिकडे काबामध्यें या प्रतिमेची पूजा होत नाहीं परंतु जे मुसलमान हाज यात्रेस जातात ते या प्रतिमेचे धार्मिक भावनेनें चरणचुंबन केल्याखेरीज परतत नाहींत. या सर्वांचा विचार केल्यानंतर लिंगपूजा फार प्राचीन होती व पृथ्वीच्या पाठीवरील सर्व देशांत केली जात होती हे स्पष्ट होते. आतां आपण आपल्या देशाकडे येऊंया--

आपल्या भारत देशांत आजहि शिवलिंगपूजा चालू आहे; गतकालातहि ती चालू होती आणि तीच परंपरा अनादिकालापासून चालू आहे. ऋग्वेदात लिंगोपासनेची चर्चा आहे. वैदीक साहित्यांत संहितामध्ये शतपथ ब्राम्हणें, शांखायन ब्राम्हणें आदि ब्राम्हणांमध्ये अरण्यकामध्यें आणि उपनिषदांमध्यें रुद्रादि अनेक नांवांनीं उमा-महेश्वराचा उल्लेख आलेला आहे. या लिंगाची पीठिका कोणती याबद्दल कांही लोक मतभेद व्यक्त करतात लिंगपूजेमध्यें अश्लीलतेची भावना आहे अशी कल्पना करणें मूर्खपणाचे ठरेल तो एक नास्तिकता ठरेल. तशीच ती घोर अनभिज्ञताहि ठरेल. लिंग शब्दाचा सर्व सामान्य अर्थ चिन्ह, लक्षण असा आहे. सारख्या दर्शनांत प्रकृतीला आणि प्रकृतिबरोबरच विकृतीलाहि लिंग असे संबोधिण्यांत आले आहे. शिवलिंग हे शिवस्वरूपी ज्योतिर्मय प्रतीक आहे.

आकाशं लिंग मित्याहुः पृथ्वितस्य पीठिका
आलयः सर्व देवानां लयना लिंगमुच्यते ।।

हे आकाश लिंग आहे. पृथ्वि त्याची पीठिका होय. ती सर्व देवतांचे घर आहे. तिच्यांत सर्वांचा लय होतो; म्हणून त्यास लिंग असे म्हणतात.

लिंगपुराणाच्या तिसऱ्या अध्यायांत म्हटले आहे कीं, महेश्वर आलिंग आहे, प्रकृति प्रधान लिंग होय, महेश्वर निर्गुण आहे, प्रकृति

सगुण आहे. लिंगपूजा ही पार्वती-परमेश्वर या दोहोंचीहि पूजा होय. आपल्या भारतवर्षात सर्वत्र शिवलिंगाची पार्थिव पूजा प्रचलित आहे, परंतु कांही महत्वाच्या ठिकाणीं पाषाणाची शिवलिंगें स्थापन करून त्यांची पूजा करण्यांत येते. ही लिंगे विविध द्रव्यांची करण्यांत येतात. याबद्दल गरुड पुराणांत विस्तारानें सांगण्यांत आलेले आहे. गंधलिंग, पुष्पलिंग, गोशकृलिंग, रजोमयलिंग, यवगोधूमशालिज लिंग, सिताखंड-मयलिंग, तुपोत्थलिंग, भस्ममयलिंग, गुडोत्थ लिंग, शर्करामय लिंग, वंशांकुरमय लिंग, केशास्थिलिंग, द्रुमोम्दुतलिंग, पिष्ठमयलिंग, दधिदुग्धो-भवलिंग, धान्यजलिंग, फलोत्थलिंग, धात्रीफलजातलिंग, नवनीतज लिंग, दूर्वाकाण्डन लिंग, कर्पुरज लिंग, अयस्कान्त मणिज लिंग, मौक्तिक लिंग, स्वर्णनिर्मित लिंग, रजत लिंग, पितल्लजलिंग, कास्यज लिंग, त्रपुज लिंग, आयसजलिंग, शतिकंज लिंग, अष्टधातुज लिंग, अष्टलोह-जातलिंग, वैदुर्यजलिंग, स्फटिक लिंग, अशा प्रकारच्या पदार्थांची व धातूंची करून त्यांची पूजा केली जाते. ज्या कामनापूर्तीसाठीं ही लिंगपूजा करावयाची ती कामनापूर्तता करणारी अशी त्या त्या धातूंची अगर पदार्थांची केली जाते. उदाहरणार्थ स्पटिक लिंग हे सर्व कामप्रद आहे. आरोग्यलाभासाठीं सीताखण्ड लिंगपूजा करावी लागते. कोल्हापूरच्या छत्रपतींच्या जुन्या राजवाड्यांतील अंबादेवघरात स्फटिकाचे व पाचूची शिवलिंगे आहेत. प्रस्तुत लेखकांस त्यांचें दर्शन घेण्याचा योग एका सोम-प्रभाती कै.राजाराम महाराज यांच्या कारकीर्दीत आला होता. स्फटिकाची ती इवलीशीं शिवलिंगप्रतिमा पाहून मन भारावून जाते व असेच कितीतरी वेळ तिच्यावर नजर खिळवून रहावेसे वाटते.

वर निर्दिष्ट केलेल्या लिंगाची लक्षणे गरुडपुराणात दिलेली आहेत. परंतु तांबे, शिसें, रक्तचंदन, शंख, कासें, लोखंड यांची लिंगें करून त्यांची पूजा करणे वर्ज्य मानले गेले आहे. पान्याचे शिवलिंग मोठे ऐश्वर्यदायक आहे. लिंग हे साधारणतः अंगठ्याएवढे मोठे असावे लागते पार्थिव लिंग एक अगर दोन तोळे माती घेऊन करतात. पाषाणाची लिंगें लहान मोठी

हवी तेवढी विविध आकाराची केली जातात. लिंगाचेसुद्धां अनेक प्रकार असतात. त्यांत बाणलिंग, सिद्धलिंग, स्वयंभूलिंग, पार्थिव लिंग, इत्यादि प्रकार आहेत. सध्याचे श्री विश्वेश्वर लिंग हे बाणलिंग ( नर्मदेश्वर ) आहे शिवपुराण-कोटिरुद्रसंहिता आणि काशीखंड वगैरे ग्रंथांवरून असे म्हणतां येईल की, काशी वगैरे क्षेत्रांत जितकी पुराणप्रसिद्ध लिंगें आहेत त्यांतील कांहीं स्वयंभूलिंगे आहेत तर कांहीं सिद्धलिंगे आहेत. महात्म्यांनीं जी प्रतिष्ठापित केली आहेत किंवा त्यांचेकडून उपासना केला गेली आहेत ती सिद्धलिंगे होत स्वयंभू लिंग हे भक्तांच्या अनुग्रहानें स्वतः प्रकट झालेलें असते.

केदारनाथाच्या देवालयांतील शिवलिंग स्वयंभू असून ते वेडयावा-कडया आकाराचे आहे. ते एवढें उंच आहे कीं, त्यावर पडून हृदय स्पर्श करतां येतो. कावेरी नदीच्या तीरावर तिरुचिरापल्ली येथें मोठाल्या खडकावर एक शिवालय आहे. या शिवालयास थायुमुनवर असे म्हणतात यास मातृभूमेश्वर असेही म्हणतात या शिवालयांत असणारे शिवलिंग हे स्वंयभू आहे म्हणून त्यास थलाईकुंडेश्वर असे म्हणण्याचा प्रघात आहे. मालवणजवळील सिंधुदुर्गावरही एक स्वयंभू शिवलिंग आहे व ते दिवसे-दिवस वाढत आहे. राजर्षि शाहू महाराज यांचे सुपुत्र कै. छत्रपती राजाराम महाराज यांच्या द्वितीय महाराणी पु. मा. विजयमाला मासाहेब या कांहीं वर्षीपूर्वी काशी यात्रेस गेल्या होत्या. येतांना त्यांनीं तेथील काही वाळू आणली होती. ती वाळू आणून त्यानी जुन्या राजवाडयांत आपल्या देवघरांत ठेवली प्रातःकाली उठून पहातात तो त्या रेंतीचे शिवलिंग झाले होते. या लिंगाची समारंभपूर्वक यथासांग प्रतिष्ठापना करण्यांत आली आजही ते लिंग इच्छुकास पहावयास मिळते अशीं स्वयभू लिंगे कितीतरी आहेत.

आपल्या भारतांत १२ ज्योतिर्लिंगें प्रसिद्ध आहेत. ती म्हणजे सौराष्ट्रांतील सोमनाथ, श्रीशैलमधील मल्लीकार्जुन उज्जयिनीमधील महाकाल, ओंकार येथील परमेश्वर, हिमालयांतील केदार, डाकिनी मधील

भीमाशंकर, वाराणशीमधील विश्वनाथ, गोमती तटावरील त्र्यंबक, चिताभूमीमधील वैद्यनाथ, दारुका वनांतील नागेश, सेतुबंधनावरील रामेश्वर आणि शिवालयांतील घुश्मेश, ही बारा ज्योतिर्लिंगे होत. गोकर्ण गाणगापूर, अमरनाथ, राजगिर, वगैरे ठिकाणची शिवलिंगे आणि शिवालये वैचित्र्यपूर्ण आणि पहाण्याजोगी आहेत. अमरनाथाचे शिवलिंग हे काश्मीर दरींतील १२,७२९ फूट उंचीवर असलेल्या अमरनाथाच्या गुहेत आहे. हे हिमलिंग व ते फार मोठे व भव्य आहे. चंद्राच्या कलेप्रमाणें ते मोठे व लहान आणि फिके व तेजःपुंज होत असते. या गुहेच्या वरच्या भागातून त्या हिमलिंगावर पाण्याची सतत धार वहात असते. या हिमलिंगाच्या दर्शनासाठीं श्रावण पौर्णिमेस असंख्य भाविक यात्रेकरु अवघड वाट सोपी करुन धांवत असतात. ही अमरनाथाची गुहा दीडशें फूट उंच व तितकीच रुंद व आत खोल आहे शिवाचे वास्तव्यस्थान अशी याची ख्याति आहे. म्हणून भारतांतीलच नव्हें तर परदेशी प्रवासीसुद्धां जेव्हां काश्मीरला भेट देतात तेव्हां त्यांना ही अमरनाथाची गुहा व त्या गुहेंतील ते हिमलिंग पहाण्याचा मोह टाळतां येत नाहीं. कोल्हापूरांत उत्तरेश्वरावर एक उत्तरेश्वराचे प्राचीन देवालय आहे. त्या देवालयांत एक लिंग आहे. ' ते लिंग इतके मोठे आहे कीं, तशी मूर्ति क्वचितच पहावयास मिळते. या देवालयाची दुसरी एक चांगली स्मृति अशी आहे कीं, या ठिकाणी न्यायमूर्ति रानडे यानीं कांही काल वास्तव्य केलें होते. त्यानी आपल्या मृत्युपत्रांत या देवाच्या पूजेअर्चेसाठीं थोडी आर्थिक तरतूद करून ठेवली आहे–' असा या लिंगाविषयी गौरवपूर्ण उल्लेख कोल्हापूर नगरपालिकेच्या शतसांवत्सरिक महोत्सव ग्रंथांत ( १८५४–१९५४ ) करण्यांत आलेला आहे. या लिंगाची उंची ८० इंच आहे. व लांबी ६३ इंच आहे. वरची पिंडी १८"X१८" आहे. या लिंगासमोरच एक नंदी आहे. लिंगाच्या मानाने हा नंदी तितकासा मोठा वाटत नाही. त्या मानानें रंकाळ्याजवळील नंदी मोठा आणि भव्य आहे. कोल्हापूर जिल्ह्यांत आजरे

महालांत आजरे गांवापासून उत्तरेस रामलिंग या नांवाचे रमणीय स्थान हिरण्यकेशी नदीच्या तीरावर आहे. तेथे एक शिवलिंग व नंदी आहे. हाहि नंदी भव्य व मोठा आहे. यापेक्षांहि मोठे नंदी भारतांत ठिकठिकाणी असतीलही.

आग्र्यापासून ४० मैल दूर असलेल्या बटेश्वर येथें यमुना नदीच्या तीरावर १०१ शिवमंदीरे उभी आहेत. ही शिवमंदीरे बांधण्यांत स्थापत्य-कारांनीं इतके मोठें कौशल्य दाखविले आहे कीं, त्यांनी या मंदीरामुळे यमुनेचा प्रवाहच फिरविण्याचा विक्रम केला आहे. या १०१ शिव-मंदीरांची कथा अशी सांगितली जाते की, भदवारचे महाराज आणि मणिपुरी सरदार यांच्यामध्यें नेहमीच युद्धे होत असत; त्यामुळे ते दोघेही कंटाळले होते म्हणून त्यानीं आपणा उभयतांत पूर्ण सख्य व सलोखा व्हावा असे प्रयत्न सुरुं केले. या प्रयत्नांना यश येऊन उभयतांनी आपली आगामी संतति विवाह बंधनानें एकत्र आणण्याचे ठरविले. कर्म-धर्मसंयोगानें उभयतांसहि कन्या संततीच झाली. या पेचप्रसंगांतून मार्ग काढण्यासाठीं भदवारच्या महाराजानीं आपणांस पुत्र संतति झाल्याचे घोषित केले व झालेली मुलगी मुलग्याप्रमाणें वाढविली. कांही काळ लोटल्यानंतर पूर्वी ठरविल्याप्रमाणें हा विवाह करण्याचे योजण्यांत आले. भदवार महाराजांनी परमेश्वरावर हवाला ठेवून लग्नाची तयारी केली आणि जेव्हां वरराज वधूचे स्थळी विवाह मांगल्यास निघाला तेव्हां भदवार कन्येची स्थिती मोठी केवीलवाणी झाली. वरराजाची ही मिर-वणूक यमुनेच्या परिसरांत येतांच भदवार कन्येनें नदीत जीव देण्याच्या उद्देशानें रथांतून एकदम उडी घेतली. त्यावेळीं शिव प्रगट झाले आणि यांनी मुलीस वांचविलें व तिची अडचण ध्यानी घेऊन तिला पुरुष केले. या दैवी चमत्कृतीमुळें सर्वत्रास आनंदी आनंद झाला आणि प्रत्येक जण शिवास मनःपूत वंदन करूं लागला. या परमेश्वरी कृपेचे उतराई होण्या-साठी उभय पक्षांनी मिळून जिथे शिवानें ही कृपा केली त्याजागीं १०१ शिवमंदीरे उभारण्याचा संकल्प केला आणि हा संकल्प सिद्धीस नेला, प्रतिवर्षी कार्तिक पौर्णिमेस येथे एक मोठी यात्रा भरते.


# शिवलिंगे व शिवालये

दा. क्र. ९७८८

कोल्हापूरच्या पश्चिमेस ९ मैलांवर बीड नांवाचे एक छोटेसे गांव आहे. ऐतिहासिक काळीं तीन-चारशे शतकांपूर्वी एका राजवटीचे राजधानीचे शहर असलेल्या या बीड गांवी बीडेश्वर नांवाचे एक देवालय आहे या देवालयांत १०८ पिंडी कोरलेला एक लिंगमहांचा दगड आहे. याप्रमाणें वैचित्र्य आणि वैशिष्ठ्य असलेली शिवलिंगे व शिवालये भारतांत अनेक ठिकाणी आणि अनेक आहेत म्हैसूर राज्यातील गुलबर्गा जिल्ह्यांत गाणगापूरांत जी ठळक तीन लिंगें आहेत ती तीन प्रकारची आहेत भीमा अमरजेच्या संगमावरील या गाणगापूर क्षेत्रांत संगमेश्वराचे लिंग आहे याचा आकार कांही आगळाच आहे याच क्षेत्रांत गांवाच्या उत्तरेस तंतुकेश्वराचे लिंग आहे. त्याचाहि आकार निराळाच आहे. गांवाच्या पूर्वेस दोन मैलांवर कल्लेश्वराचे लिंग आहे. हे दीपाकार आहे. कोल्हापूरच्या टाऊन हॉलमध्यें असलेल्या पुराण वस्तुसंग्रहालयांत एक आगळ्याच पद्धतीचे शिवलिंग आहे. मूर्ति सुबक, रेखीव आहे. लिंगाच्या वरच्या बाजूस अग्रभागी श्रीयंत्र कोरलेले आहे. असे 'श्रीयंत्र' कोरलेले लिंग सहसा कोठें आढळून येत नाहीं. हे लिंग कोल्हापूरच्या महालक्ष्मी देवालयांत सांपडले व तें तेराव्या शतकांतले आहे. कारवार जवळ गोकर्ण येथे एक शिवमंदिर आहे; त्यास गोकर्ण महाबळेश्वर असे म्हणतात. शंकरानें प्रसन्न होऊन रावणाला शिवलिंग अर्पण केले होते. ते घेऊन तो लंकेस जात असतां संध्यासमयीं ते रावणानें बालरूप गणरायाजवळ दिलें होते. रावणास येण्यास विलंब झाल्याची संधि साधून गणरायानें ते तेथेच ठेवले. अन् गोकर्ण महाबळेश्वराचा जन्म झाला. या देवालयांत जे लिंग आहे, ते सजीव आहे असे मानले जाते. इतर लिंगाप्रमाणें या लिंगाची पिंडी वर नसून ती आंत खोदलेली आहे. त्यामुळें तो भाग उखळासारखा खोल झालेला आहे. त्यामुळें तेथे पूजेच्या वेळीं नेहमीच पाणी साठलेले असते व जेव्हां तेथील पुजारी हे लिंग सजीव आहे हे दाखविण्यासाठीं त्या पाण्यांत भाविकाचा हात नेऊन आंतील पिंडीवर त्याची बोटे ठेवतो. पिंडी सजीव आहे या भावनेनें भारलेल्या भाविकांस पाण्यांत पिंडीवर हात ठेवतांच ती मऊ व बिलबिलीत लागल्याचा भास होतो. कोण जाणें पिंडी सजीव असेलही !

कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या आवारांत असलेल्या श्री जोतिबाच्या देवालयांत एक मोठी पिंडी आहे. या पिंडीचे वैशिष्ठ्य हे कीं, या एका पिंडीत दोन पिंडी आहेत. म्हणजे एका शिवलिंगांत दोन शिवलिंगे आहेत. तसेंच कोल्हापूर येथें शिवाजी पेठेंत खंडोबा तालमीशेजारी एक खंडोबाचे प्राचीन देवालय आहे. या देवालयांत एक शिवलिंगाची प्रतिमा आहे. हे शिवलिंग काळ्याशार दगडाचे आहे. या शिवलिंगांत दोन पिंड्या आहेत. पैकीं एक पिंडी काळ्याशार दगडाची आहे व दुसरी संगमरवरी दगडाची आहे लिंगपूजा ही शिवपार्वतीचीच पूजा मानली जाते. आणि म्हणून या दोन पिंडी म्हणजे शिवपार्वतीच समजल्या जातात. मगध देशाचे मौर्या-पूर्वी जे राजे होऊन गेले त्यांची राजधानी असलेल्या एकेकाळच्या राज-गिरमध्यें ब्रम्हकुंड या नांवाचे एक कुंड आहे, तेथे एक शिवलिंग आहे. त्या लिंगांत चार पिंडी आहेत ब्रम्हकुंड हे नांव ज्या ब्रम्हदेवावरून पडलें त्या ब्रम्हदेवास चार तोंडे असतात. त्यावरूनच या लिंगाच्या चार पिंडी केल्या असाव्यात असे मानण्यांस हरकत नाहीं.

प्रत्येक हिंदु महिन्याच्या कृष्ण पक्षांतील त्रयोदशीस शिवरात्र असते. या प्रत्येक महिन्याच्या शिवरात्रीस मास शिवरात्र असे म्हणतात. तर माघ महिन्यांतील शिवरात्रीस महाशिवरात्र असे म्हणतात. कपिलाषष्ठी, अर्धोदय, संक्रांत, ग्रहण, या सर्व पर्वकालापेक्षां महाशिवरात्राचे धार्मिक महत्व विशेष मानले जाते. शिवरात्रीची उत्पत्ति ज्या कारणामळें झाली त्यासंबंधीच्या कथा शिवपुराण, शिवलीलामृत ईशानसंहिता, वगैरे ग्रंथात देण्यांत आलेल्या आहेत. वचन पाळण्याचा निर्धार, दुसऱ्यासाठीं आत्मार्पण करण्याची प्रवृत्ति, मातृवात्सल्य हा बोध या कथांतून मिळतो. यावरून शिवरात्रीचे व्रत हे भूतदयेचे व्रत आहे असे म्हणतां येईल शिव-रात्रीस शिवलिंगावर रुद्राभिषेक करतात व पूजेच्या वेळी श्री भगवान शंकरावर बिल्वपत्रें अर्पण करतात. शिवमाहात्म्य मोठे आहे. शिवपूजा प्राचीन आहे. शिवालये अगणित आहेत शिवउपासकांची जर गणनाच करता येणार नाहीं.




तंजावर जिल्ह्यात, नागापट्टम्‌पासून सहासात मैल अंतरावर व्हेलंकनी येथे रोमन कॅथॉलिक पंथीयांचे एक चर्च आहे. या चर्चमध्ये प्रतिवर्षी ऑगस्ट महिन्याच्या अखेरच्या आठवड्यापासून तो सप्टेंबरच्या ९ तारखेपर्यंत आरोग्यदेवतेचा मोठा उत्सव साजरा केला जातो. हा महोत्सव व्हर्जिन मेरीच्या सन्मानार्थ 'आमची आरोग्यदेवता' (Our lady of health) या नांवाने मोठ्या उत्साहाने उरकण्यांत येतो. या महोत्सवास आसमंतातीलच नव्हे, तर दूर देशाहूनसुद्धा अनेक रोमन कॅथॉलिक पंथीय लोक जमत असतात. महोत्सवाच्या या दहा दिवसांच्या मुदतीत व्हेलंकनीस चार ते पांच लाखावर यात्रेकरू येत असतात. भारतात रोमन कॅथॉलिकांची अनेक चर्चिस आहेत, पण व्हेलंकनी येथील चर्चचें माहात्म्य कांही औरच आहे व या चर्चमधील या आरोग्यदेवतेच्या सोहळ्याएवढा मोठा

सोहळा कुठेच साजरा केला जात नाही. याच चर्चमध्ये एवढा मोठा सोहळा कां व्हावा व येथेच येवढे महात्म्य काय आहे अशी जिज्ञासा प्रत्येकास वाटणे स्वाभाविक आहे. पण ही जिज्ञासा पुरी करण्याजोगे कांहाही व कोणतेहीं दृश्य कारण तिथे दिसत नाही वा पुढे केले जात नाही. मात्र व्याधी उपाधींनी पीडलेल्यास ही देवता संकटमुक्त करते, अशी असंख्य भाविकांची भावना आहे. या बाबतीत जिज्ञासूंचे समाधान पुढील एका उदाहरणावरून करता येण्याजोगे आहे. ते म्हणजे असे, अमेरिकेच्या हॉलिवुडमध्ये फर्स्ट प्रेस्बेटरियन नामक १ चर्च आहे. त्याचेहा फार आगळे माहात्म्य आहे. या महात्म्याबाबत त्या चर्चचे डॉ. लुइस एच्. इव्हन्स यांना प्रश्न करता ते म्हणाले, "केव्हां केव्हां परमेश्वरी प्रेरणा कुठेतरी कांहीतरी घडविण्याचे योजून, त्याप्रमाणें घडवीत असते. असाच प्रकार येथेही झालेला असेल कदाचित." या उत्तरात व्हेलंकनी चर्चच्या या महात्म्याचे कोडे उकललेले दिसून येईल.

व्हेलंकनी चर्चमधील हा आरोग्यदेवतेचा महोत्सव दहा दिवस चालतो. तो ऑगस्टच्या अखेरच्या आठवड्यात सुरूं होतो व त्याची समाप्ती ता. ९ सप्टेंबर रोजी होते. त्या चर्चवर एक ध्वज उभारून हा आरोग्यमहोत्सव सुरू झाल्याचे जाहीर करण्यात येते. प्रारंभदिनाच्या मंगल प्रभाती हा ध्वज जेव्हा स्तंभावर चढू लागतो, तेव्हा तेथे जमलेले असंख्य लोक आरोग्यमहोत्सवाचा प्रारंभ झाला म्हणून आनंद पावतात. चर्च तर रंगीबेरंगी लतापल्लवांनी आणि दीपांनी शृंगारण्यात आलेले असते. चर्चचा आंतील भागही शृंगारण्यात आलेला असतो. आल्टरवर व्हर्जिन मेरीची छोटीशी प्रतिमा उभी करण्यात येते. मेरीच्या कडेवर बाल येशू असतो. मेरीच्या मस्तकावर रत्नजडीत सोनेरी मुकूट असतो. आणि त्या प्रतिमेभोवती दीपांची रोषणाई केलेली असते हा सर्व देखावा मोठा भव्य, उदात्त आणि पवित्र वाटतो. चर्चमधील वातावरण देखील शांत, गंभीर व तितकेच पवित्र असते. अंगावर उंची वस्त्रे परिधान करुन आल्टरशेजारी पाद्री उभा रहातो व तो प्रार्थना म्हणत असतो. जेव्हा

प्रार्थना थांबते, तेव्हां चर्चमधील ऑर्गन आपल्या कर्णमधुर आवाजात संगीत प्रार्थनेचे सूर काढीत असतो. तेव्हासुद्धा असंख्य भाविक चर्चमध्ये विनम्रभावे विनीत होऊन उभे असतात. यामुळे तर ते सारे वातावरण अगदीच भव्य व उदात्त वाटते.

या दहा दिवसांच्या महोत्सवात प्रत्येक दिवशी, एका शृंगारलेल्या रथातून मेरीच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात येते. हा रथ २०० भाविक मोठ्या भक्तीभावाने ओढण्याचे कार्य करीत असतात. ही मिरवणूक गांवातून फिरून चर्चमध्ये विसर्जन पावते. प्रत्येक दिवसाच्या कार्यक्रमास हजारो रुपयांचा खर्च केला जातो. हा खर्च तंजावर जिल्ह्यातील रोमन कॅथॉलिकांच्या विविध संघटनांकडून करण्यात येतो. याखेराज चर्चमध्ये धर्मादाय म्हणून जमलेल्या निधीतूनही या महोत्सवावर कांही रक्कम खर्चिली जाते. या दहा दिवसात महोत्सवासाठी असंख्य लोक जमत असतात. रोज लोक येतात व सायंकाळी परततात. तिथे मुक्काम करणारेहि पुष्कळ असतात. सबंध दहा दिवसांचा मुक्काम करणारेही अनेकजण असतात. या दहा दिवसात गांवचे आरोग्यरक्षण करण्याचे कार्य पाण्याची व्यवस्था, स्वच्छता वगैरे बाबतच्या सोई तंजावर जिल्हा लोकल बोर्डाकडून होत असतात. या महोत्सवाची संधी साधून दक्षिणेतील सारे भिक्षुक येथे गोळा झालेले असतात व त्यांना या मुदतीत कमाईही चांगली होते. ता. ९ सप्टेंबर रोजी सायंकाळी, म्हणजे आरोग्यदेवतेच्या महोत्सवाचे अखेरचे दिवशी, प्रारंभदिनी उभारलेले निशाण उतरण्यात येते आणि ते चर्चमध्ये आल्टरशेजारी गुंडाळून ठेवण्यात येते. तिथे त्या निशाणाचे चुंबन प्रथम पाद्री व नंतर भाविक लोक घेतात. या महोत्सवातील हा अखेरचा कार्यक्रम होय. या कार्यक्रमानंतर सारी जत्रा आपआपल्या गांवीं परतते. या महोत्सवात अनेक नवे नवस करण्यात येतात व जुने फेडण्यात येतात. नवसाची फेड म्हणून चर्चला अनेक वस्तू देण्यात येतात. त्यात मौलवान रत्नापासून अगदी कमी किंमतीच्या पदार्थापर्यंत वस्तू असतात. येथे किंमतीचा प्रश्न नसून भावनेचा प्रश्न आहे.

इतर साऱ्या चर्चिसमध्ये येशूला प्राधान्य असते, पण या चर्चमध्ये येशूमाता मेरी हिला प्राधान्य आहे. याला कारणे आहेत. येथील लोकांची अशी एक समजूत आहे की, सबंध आशिया खंडात व्हेलंकनी येथील या चर्चमध्येच मेरी–मॅडोना प्रकट झाली व तिने कांही जणांना दर्शन दिले. फ्रान्स आणि पोर्तुगालमध्येंही मॅडोना प्रकट झाली व तिने लूर्ड्स येथील एका बर्नाडेट्टा नामक खेडुत कन्येस आणि फतिमा येथील तीन पोर्तुगीज मुलांना दर्शन दिले असे सांगितले व मानले जाते. या गोष्टी सर्व प्रख्यात आहेत. पण या घटना अगदी अलीकडच्या आहेत. अगदी अलीकडच्या म्हणजे गेल्या शतकातल्या आहेत; पण व्हेलंकनी येथें मॅडोना प्रगट होऊन कांहीजणांना दर्शन दिल्याची जी ३ उदाहरणें येथे सांगितली जातात तीमात्र तीनशे वर्षांपूर्वीची घडलेली जुनी आहेत व म्हणून व्हेलंकनीस या भागात महत्व आहे. व्हेलंकनी येथे मॅडोना प्रकट झाल्याची व तिनें कांही व्यक्तीस दर्शन देऊन त्यांच्यावर कृपा केल्याची पुढील कांही उदाहरणे येथे सांगितली जातात. पहिले उदाहरण असे की, एका गरीब पण पांगळ्या दहीविक्या मुलास मॅडोनाने दर्शन दिले. तिने त्याच्याकडून दही विकत घेतले. तिच्या दर्शनाने त्या मुलाचे पंगुत्व जाऊन तो खडखडीत बरा झाला. त्या वेळीं मॅडोनाने त्या मुलास असे सांगितले की, झाला प्रकार हा तेथून जवळच ६–७ मैलावर असलेल्या नागापट्टम् तेथील एका विशिष्ट व्यक्तीस कळवा तो मुलगा पळतच नागापट्टम्ला गेला व त्या व्यक्तींचा शोध लावून तिस घडलेली हकीकत सांगितली. त्या व्यक्तीस मात्र आदल्याच रात्री मॅडोनाने दृष्टांत देऊन हा प्रकार सांगितल्याचे जेव्हा त्या व्यक्तीने जमलेल्यांस सांगितले, तेव्हा मात्र सारेच चकित झाले व ईश्वरी कृपा ती हीच होय असे मानून त्यांनी तिथे एक चर्च बांधण्याचे ठरविलें व त्याप्रमाणें त्यांनी हे चर्च बांधले. तेथील लोक मेरीच्या कृपेस धन्यवाद देऊन तिलाच ते आरोग्यदेवता असे संबोधून हा महोत्सव साजरा करू लागले आहेत.

दुसरी एक कथा अशी सांगितली जाते की, एक दूधविक्या आपल्या मातीच्या बरतनामधून दूधविक्री करीत असतां, त्याला कडेवर मूल


घेतलेली एक स्त्री भेटली आणि तिने कडेवरील आपल्या तान्हुल्यासाठी त्या दूधविक्रेत्याकडे थोड्या दूधाची मागणी केली. त्या दूधवाल्यानें त्या मातेस थोडे दूध दिले. हा प्रकार त्याने आपल्या मालकास भीतभीतच सांगितला. मालकाने दुधाच्या मडक्यावरील झाकण काढून आपल्या नोकराने किती दुधाची खैरात केली हे पाहिले व आश्चर्य हे की ते मडके पूर्वीप्रमाणेंच दुधाने काठोकाठ भरलेले असल्याचे त्यास आढळून आले. मॅडोनाचीच ही कृपा होय असे मानून, ज्या स्त्रीने आपल्या विक्रेत्याकडे दुधाची मागणी करून ते दूध आपल्या मुलास पाजले, ती स्त्री दुसरी-तिसरी कोणी नसून मेरीच होय व तिच्या कडेवरील मूल म्हणजे प्रभू येशू – जीझस होय असे जमलेल्या मंडळींनी वर्तमान घडविले. मग काय, जो तो त्या दूधविक्रेत्याकडे झालेल्या प्रकाराची चौकशी करूं लागला. लागलीच ही वार्ता मान्या गांवभर झाली. आणि या भावनातिरेकातूनच या चर्चच्या उभारणीची कल्पना जन्मली आणि लागलीच तिथे हे चर्च बांधण्यात आले.

तिसरी कथा अशी सांगण्यात येते की, सतराव्या शतकात बंगालच्या उपसागरातून एक पोर्तुगीज जहाज चीनहून सिलोनकडें जाण्यासाठी प्रवास करीत असता, समुद्र एकाएकी खवळला व मोठे वादळ झाले. त्या वादळात ते जहाज सापडून गटांगळ्या खाऊ लागलें. तेव्हा त्या जहाजावरील खलाशी भयभीत झाले व त्यांनी परमेश्वराची प्रार्थना करण्यास प्रारंभ केला.–"परमेश्वरा या संकटातून आम्हास वाचव. आमचे जहाज या दर्यातून सुरक्षितपणें किनारा गाठू दे. आम्ही तेथे चर्च बांधू."खलांशाची ही प्रार्थना परमेश्वराप्रत रुजू झाली. वादळ शमले आणि जहाज सुखरुपपणें किनाऱ्याला लागले. परमेश्वरास वचन दिल्याप्रमाणें खलाशानी व्हेलंकनी येथे चर्च बांधले. हे जहाज ता. ८ सप्टेंबर रोजी सुखरुपपणें किनाऱ्यास लागले. हाच दिवस मॅडोनाचा–मेरीचा जन्मदिन म्हणून साजरा करण्यात येतो.

व्हेलंकनी येथील या चर्चची ख्याती फार दूरवर पसरलेली आहे. दूरवरच्या भागातून असंख्य रोमन कॅथॉलिक पंथीय व्हेलंकनीस आरोग्य-महोत्सवास येत असतात. जे येऊ शकत नाहीत ते आपला निधी या ना त्या प्रकारे चर्चच्या धर्मदाय फंडास मदत म्हणुन पाठवीत असतात. अशीच आपली देणगी कांही दूरदेशीच्या रोमन कॅथॉलिक पंथीयांनी कोणत्या तऱ्हेने पाठविली याची मजेदार व आश्चर्यकारक उदाहरणे सांगितली जातात. त्यातालच पुढील एक उदाहरण आहे. मलाया ब्रम्हदेश सिलोन व दक्षिण आफ्रिकेत राहणाऱ्या कांही लोकांनी बांबूचे तुकडे घेऊन त्यांत पैसे भरले व ते सीलबद केले आणि त्यावर 'व्हिकार ऑफ व्हेलंकनी' असा पत्ता लिहून ते समुद्रात सोडून दिले. आश्चर्य हे की, हे तुकडे समुद्रात गटांगळ्या खातखात व्हेलंकनीच्या किनाऱ्यापाशी येऊन लागले. ते एका कोळयाला दिसून येताच त्यानें ती बातमी चर्चच्या पाद्रयास कळविली पाद्रयानें ते तुकडे गोळा करून ते फाडले व आत पहाता तो पैसे. त्यानें ते पैसे धर्मदाय निधीत जमा केले आणि ती बांबूच्या तुकडयांची शकले चर्चच्या म्युझियममध्ये ठेवून दिली. हे बांबूचे तुकडे आजही पहावयास मिळतात आपल्या व्यथा आणि व्याधी दूर करून मेरी-मॅडोना आपल्या नवसास पावली म्हणून उपकृतबुद्धीनें नवस फेडण्यासाठीं व्याधीजर्जरांनी आणि त्यांच्या स्वकीयांनी दिलेल्या वस्तू या म्युझियममध्ये प्रदर्शित करण्यात आल्या आहेत. त्या पहिल्या की, भाविक मन भारावून जाते हे सत्य की सत्याचा अभास, असा त्याला भ्रम पडतो. म्युझियम-मध्यें व्हेलंकनी चर्चला दिलेल्या अशा मौल्यवान सुवर्णाच्या व हिरे-माण-कांनी मढविलेल्या अनेक वस्तू व्यवस्थित आणि सुरक्षित मांडून ठेवलेल्या आहेत. त्यात म्हैसूर नरेशांनी चर्चला दिलेले अलंकारही आहेत. याशिवाय येथें अनेक वस्तू आहेत एक पूर्णाकृती चांदीचा पुतळा देणगी म्हणून दिलेला यांत दिसून येतो. या पुतळयाची हकीगत अशी सांगण्यात येते की, हा पुतळा मुंबईच्या एका पारशी स्त्रीनें आपल्या मुलीच्या प्राणाबाबत केलेल्या नवसाची फेड म्हणून दिला आहे. त्या स्त्रीची मुलगी एकदा

आपल्या घराच्या तिसऱ्या मजल्यावरून खाली पडली. ती मुलगी पडत असता ते आईनें पाहिलें. देवाची करूणा भाकण्याखेरीज त्या वेळी तिला अन्य मार्गच नव्हता. म्हणून तिनें व्हेलंकनी चर्चमधील मेरी-मॅडोनाचा धावा केला व मुलीला सुरक्षित ठेव अशी मागणी केली आणि ही त्या मातेची हाक त्या देवतेनें ऐकली आणि ते मूल कांहीही इजा न होता सुरक्षित राहिले. यावर त्या पारशी आईनें त्या मुलाच्या पूर्णाकृतीचा चांदीचा पुतळा या चर्चला दिला नवसास पावल्यामुळे उपकृतबुद्धीनें देण्यात आलेल्या अशा आणखी कित्येक वस्तू या म्युझियममध्ये आहेत. मानवाच्या भोळ्याभाबड्या भावनेला फुंकर घालून त्याला भाविक बनविण्याचे कामी त्या वस्तू उपयोगी पडतात. पण देणग्या देणारे तरी इतके अंध श्रद्धावान असतात काय हा एक प्रश्नच आहे.

व्हेलंकनी चर्चचे माहात्म्य जे आगळे आहे ते हेच होय ! आणि म्हणून प्रतिवर्षी लाखो लोक या चर्चच्या आरोग्य-देवतेच्या महोत्सवास भक्तिभावाने आणि उपकृतबुद्धीने उपस्थित रहातात; मग ती अंधश्रद्धा म्हणा, श्रद्धा म्हणा अगर आणखी कांही म्हणा.



पुरातन पुष्करतीर्थ व आजचें कोटितीर्थ हें एक रमणीय स्थान आहे; एक रम्य तलाव आहे. याच्या पश्चिम बाजूस कोल्हापूरचें शिवाजी उद्यमनगर पसरलें आहे तर पूर्व बाजूस 'श्री शाहू छत्रपती स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल्स' आहे. दक्षिणेस मोकळे मैदान पसरलें आहे तर उत्तरेस शाहूपुरीचा परिसर लागलेला आहे. या तीर्थाच्या पश्चिम काठावर कोटीश्वराचे छोटेसे देवालय आहे. देवालयामागें एका साधू-पुरुषाची समाधि आहे व त्या देवालयापुढें व समाधीपुढें छोटेसे घाट आहेत. हे घाट वृक्षराजांनी नटलेला आहेत. तीर्थाच्या उत्तरेच्या काठावर भग्नावस्थेतील चित्रकूट मठाचे अवशेष आहेत व त्या अवशेषातच एक मारुतीरायाचें चिमुकले देऊळ कसेंबसे उभें आहे. या देवालयांतील मारुतीरायानें आपल्या सोबतीस गणपती, महादेव व नंदी अशी प्रभावळ घेतलेली आहे दक्षिणेस मोकळा माळ तर पूर्वेस शाहू मिल्सची तटबंदी, अशा या चतुःसीमेतील नीतळ पाण्याच्या जिवत काव्यास कोटितीर्थ असे म्हणतात. या

कोटितीर्थाचा उल्लेख महाराष्ट्र राज्याच्या गॅझेटियरमध्यें कोल्हापूर विभागांत पुढीलप्रमाणें करण्यांत आला आहे. "To the east of the city near the Shahu Mills, there is a big tank or lake with a temple of Mahadeo. This is called the Kotitirth. This is a picturesque spot in Kolhapur."

शंभर वर्षांपूर्वी कोल्हापूर हा गांव अनेक तळ्यांनीं आणि कुंडांनी व्यापून गेलेला असा जलमय गांव होता. त्याकाळीं या गांवांत तेरा तळी व अनेक कुंडे होती. रंकाळे, पद्माळे, सिदाळे, वरुणतीर्थ, फिरंगाई, खंबाळे, रावणेश्वर, कोटितीर्थ, सुसरबाव, महारतळें, कपिलतीर्थ, साकोली व कुंभारतळें ही तीं तेरा तळीं होत. शहरवाढ, सुधारणा व आरोग्य यासाठीं यांतील बहुतेक तळी बुजवली गेलीं असून, आतां शहरांत फक्त रंकाळा, पद्माळा आणि कोटितीर्थ हीच तीन तळी, तळ्याच्या स्वरूपांत राहिलीं आहेत.

कोटितीर्थ हें तळें कोल्हापूर, शाहूपुरी आणि राजारामपुरी या स्थळसीमेंत आहे. कोल्हापूरच्या पूर्वेस, शाहूपुरीच्या दक्षिणेस आणि राजारामपुरीच्या पश्चिमेस हे टुमदार तळें आहे. कोल्हापूरचा हा भाग म्हणजे अनेक यंत्रे व कारखाने आणि गिरण्या यांनीं गजबजलेला आहे. तळ्याच्या पूर्वेस, अनेक चात्यांची घरघर आणि मागांचा खडखडाट अहर्निश निर्माण करीत असलेली शाहू मिल्स हीं सुताची व कापडाची गिरणी आहे तर त्याचा पश्चिम भाग म्हणजे अनेक कारखाने, इंजिनीयरिंग वर्क्स यांची औद्योगिक वसाहत होऊन बसलेला आहे. जिथे एकेकाळीं घनदाट अरण्य होते तिथें आता या कारखान्यांच्या इमारती आहेत. ज्या तळ्याभोवती निवडुंगाच्या फडानें मानवी पदस्पर्श दुष्कर झाला होता, त्या तळ्याभोवतीं असंख्य मजूर, मुले, बाया आपल्या संचारानें, जागता पहारा बसवून राहिलेली आढळून येतात. दिवसा फिरणेंहि जिथे अवघड होते, तिथे आता अमावास्येच्या मध्यरात्रीहि मनुष्यसंचार चालू असतो. इतके सारे झालें, माणसानीं अहोरात्र गजबजलें व गिरण्या फॅक्टऱ्यांनी वेष्टिलें

तरी कोटितीर्थ ते कोटितीर्थच राहिले आहे. त्याचें सौंदर्य लोपले नाहीं की उपयुक्तता मावळली नाहीं, ना त्याचे पावित्र्य मानवी मनावरील आपली पकड कमी करूं शकलें आहे.

कोटितीर्थ या नांवाने आबाल-वृद्धांस परिचित असलेल्या या तीर्थ-स्थळास एके काळीं पुष्करतीर्थ म्हणत असत, हें फारच थोड्या लोकांना माहीत असेल. या तीर्थास पूर्वी पुष्करतीर्थ म्हणत असत असा उल्लेख 'करवीर माहात्म्यांत' आहे. याच ग्रथांत स्थळाची महती आणि माहिती सांगितली आहे त्यावरून पूर्वीचें पुष्करतीर्थ हें आजचें कोटितीर्थ कसे झाले याचा बोध होईल. कोल्हापूर हें एक तीर्थ अथवा महातीर्थ आहे. एवढेंच नव्हे, तर तो दक्षिणेतील प्रत्यक्ष काशी आहे व तेथें गेल्यानें काशी यात्रेइतकेंच पुण्य मिळतें अशी मध्ययुगीन कालापासूनची कल्पना आहे. काशी व करवीर ही दोन एकसारखी जुनीं स्थानें भगवान विष्णूनें निर्माण केलीं; एका ठिकाणी तो शिवाच्या रुपानें राहिला आणि दुसऱ्या ठिकाणी म्हणजे करवीरांत तो शक्तीच्या रुपानें राहिला अशी आख्यायिका निर्माण झाली. काशीतील सर्व गोष्टी कोल्हापुरांत निर्माण करण्यांत आल्या. ज्या नदीला भोगावती हे नांव अद्यापहि रूढ आहे आणि जिचा उल्लेख पूर्वीच्या वाङमयांत 'पंचनदिका' म्हणून केला आहे, त्या नदीला पंचगंगा हें नांव रूढ झालें. कोल्हापुरापासून थोड्या अंतरावर भोगावतीचा कुंभी नदीशीं जो संगम होतो त्याला गंगायमुनेच्या संगमाप्रमाणें 'प्रयाग' असें नामाभिधान प्राप्त झालें. काशीविश्वेश्वराचें देवालय, मणिकर्णिका कुंड ( दुर्दैवानें हें विस्तीर्ण कुंड बुजवण्यांत आलें आहे. ) यांनी कोल्हापूर हें दक्षिण काशीक्षेत्रच झालें. यामुळें या क्षेत्राचें माहात्म्य मानवी मनावरील पकड आजहि टिकवून आहे आणि ते बऱ्याच काळ-पर्यंत पुढेंहि टिकून राहील

अशा या करवीरक्षेत्री शहराच्या पूर्वेस गोमती आणि जयंती या नद्यांच्या संगमावर थोडेसें पलीकडे हें कोटीतीर्थ आहे. कोटीतीर्थ हा एक रमणीय भाग आहे. अशा या रमणीय तलावाच्या पश्चिम कांठावर एक

महादेवाचें टुमदार पण साधेंच देऊळ आहे. साध्या दगडांच्या साध्या बांधणीचें ते आहे. या देवळाच्या गाभाऱ्यांत पिंडी-लिंग असून गाभाऱ्या-बाहेर छोटासा मंडप आहे. आणि या मंडपासून तळ्यास जाण्यास पायऱ्या आहेत. यासच कोणी देवाचा घाट असें म्हणतात. या देवालयाच्या थोडेसें मागे नारायणदास महाराज या साधुपुरुषाची समाधि आहे. या समाधी-पासून तळ्यापर्यंत दगडी घाट बांधण्यांत आलेला आहे. समाधीजवळ या घाटाच्या दोहोबाजूस दोन छोटेखानी देवळें असून त्यांत दत्तमूर्ति व मारुतीमूर्ति स्थापिलेल्या आहेत. या दोन देवळांवर एक छोटेखानी कमान बांधविण्यांत आली असून तीवर 'नारायणदास महाराजांची समाधी' अशीं अक्षरें आहेत. तळ्याच्या उत्तरेसहि एक पडक्या अवस्थेंतील घाट आहे. या घाटापलिकडे चित्रकूट-मठ आहे. हा मठ आतां अस्तित्वांत नाहीं. त्याचे कांही अवशेष आहेत. मात्र तिथे एक मारुतीरायाचें देवालय आहे. कोटीतीर्थाच्या पश्चिम परिसरांत वृक्षराई आहे. ही वृक्षराईच या तळ्याचे सौंदर्य वाढवित आहे. त्यामुळेच तिथें निसर्गरमणीयत्व दृष्टीस पडतें. सकाळीं सूर्योदयानंतर आणि सायंकाळी सूर्यास्तापूर्वी जेव्हां सूर्य-किरणें कोटीतीर्थाच्या प्रशांत जलपृष्ठावर बागडत असतात तेव्हांचें तें दृष्य खचित मनोहारी व नितांत रमणीय असतें. कोटीतीर्थाचा पृष्ठभाग, सोन्याच्या पाण्यानें आच्छादिला आहे की काय, असा त्यावेळीं भास होतो.

पुष्करतीर्थाचें मूळ कसें, हे 'करवीर माहात्म्यात' पुढीलप्रमाणें वर्णिले असल्याचे आढळून येते. "त्रैलोक्यस्थित तीर्थगण। या क्षेत्री आला हे ऐकून पुष्करेश्वरही येऊन। तीर्थासह राहे पूर्वी ॥" तेच हे पुष्करतीर्थ होय. करवीर विरुपाक्षं श्रीशैलं पांडुरंगकम् । श्रीरंगं सेतुबन्धनंच भुक्ति-मुक्तिं प्रदाति यत् । या वचनाला अनुसरून करवीरनामक क्षेत्र हे उत्तरेकडील काशीक्षेत्रापेक्षांसुद्धा याप्रमाणें अधिक श्रेष्ठ आहे. या क्षेत्राची ख्याति ऐकून त्रैलोक्यस्थित तीर्थगणांपैकी पुष्करेश्वर येथें आला व येथे त्यानें तीर्थासह कायमचे वास्तव्य केले. म्हणून हे पुष्करतीर्थ होय. पण या पुष्करतीर्थाचे कोटितीर्थ कसें झाले याबाबत या 'करवीर माहात्म्या'त दोन कथा सांगण्यांत

आल्या आहेत. पहिली गोष्ट अशी कीं, 'कोणी एका भानूराजानें येथे स्नान-दानतर्पणें आपल्या कोटि जन्मांचि पातके गहन, नाशिली क्षणांत' यावरून पूर्वीचे पुष्करतीर्थ आतांचे कोटितीर्थ झाले असे म्हणता येईल पण याही-पेक्षा याच 'करवीर माहात्म्यात याबाबत जी दुसरी कथा सांगण्यात आली आहे ती वाचली म्हणजे या नांवावर किती आणि कसें भारूड रचण्यात आपलें बुद्धिकौशल्य रचनाकारांनी खर्च केले आहे याचें प्रत्यंतर येऊन मन अचंबित होते.

'करवीर माहात्म्या'तील ही दुसरी कथा पुढीलप्रमाणें आहे. पूर्वी तेहत्तीस कोटि अमर, आणि साहसष्ट कोटि असुर या उभयतांनी येथे येऊन समर मांडला तेव्हां प्रचंड दैत्य मंडळी सत्य देवाशी जिंकिती झाली. तेव्हां देवांनी महालक्ष्मी स्मरली. देवांच्या या धाव्याचें करुणरव कानीं पडतांच ती महालक्ष्मी जगदंबा स्वगणासह देवांच्या मदतीस धांवली, रंकभैरव, महार्गल, सिद्धबटुक काळवेताळ, योगिनी गणांहीं प्रबळ नवकोटि सखीयुक्त कात्यायनी, इत्यादिके करून लक्ष्मी युद्ध करी दैत्यासवे महालक्ष्मीने या युद्धांत दैत्यांसहित रंकभैरवादि समस्त दैत्यांना मारून दशदिशेस पळविले: एक कोटि तेथे राहिले ते प्रबळ युद्ध करिते झाले. त्यांच्या बरोबर श्री विष्णूनी युद्ध सुरू केले. 'गरुड जैसा सर्पासी' तेवी श्रीने धरोनि केशी फिरवून आपटिले तयासी, दैत्य रक्तासि ओकिती, असा दैत्यांचा हलकल्लोळ उडतांच महालक्ष्मी त्याना म्हणाली- 'शीघ्र पळा रे स्वस्थानास विष्णू मारील तुम्हास' यावर ते वीर दैत्य लक्ष्मीस उद्देशून म्हणाले, 'आम्ही जीवित्वाची आस नसे, युद्धी मरण श्रेष्ठ असें, शूराच्या चित्तीं तेच वसे, यास्तव वधीं आम्हास तूं ।। रणी जय होता राज्य भोगी मरण पावता जातो स्वर्गीं मग चंचल जीवित्वाचे त्यागी, आम्हा चिंता नसे गे ।। शत्रूसि म्हणे मज वांचिव त्या नरकी असे ठाव आम्ही युद्धी त्यजूं जीव शीघ्र मारी आम्हां तूं ।। तुझ्या हस्ते पावोनि मरण बहुत पावले सद्‌गती जाण, वांचल्याहून उत्तम मरण, यास्तव वधी आम्हांते ।।

हें वीर–वचन ऐकून महालक्ष्मीसहि त्यांच्यावर कांहीतरी उपकार करावा असें वाटूं लागले. ती त्या दैत्यांना म्हणाली, 'मी पाहून तुमचा धीर, संतुष्ट झाले मागा वर' हें ऐकून ते दैत्य म्हणाले, 'देवी प्रसन्न होऊनि देशी वर, तरी आम्ही कोटि संख्य असुर, या पुष्करतीर्थी मार' आणि आमच्या या वीरमरणाचें स्मारक म्हणून हें पुष्करतीर्थ कोटितीर्थ नाम पावो. असुरांचें हें वचन, महालक्ष्मीनें ऐकोन, मग त्या दैत्यासि वधोन, मुक्ति दिधली तयासी, मग तेथें श्रीच्या आज्ञेनें, देव ऋषी करिती स्नानें, त्या पुष्करतीर्था नमोन कोटितीर्थ नांव करिती. देव, ऋषी म्हणोनि मंत्र तेथें स्थापिति कोटिश्वर. असा या कोटितीर्थाचा इतिहास आहे. या जरी दंतकथेच्या स्वरूपांतल्या असल्या तरीसुद्धां या तीर्थाबाबत महाराष्ट्र राज्याच्या गॅझेटियरमध्यें कोल्हापूर विभागांत पान ८७९–८८० वर जी थोडी माहिती देण्यांत आलेली आहे, तीतसुद्धां याच कथा थोडक्यांत देण्यांत आलेल्या आहेत.

कोटितीर्थाचें दुसरें महनीय आकर्षण म्हणजे श्रीसद्गुरु नारायणदास महाराज व त्यांची समाधि, हें होय. नारायणदास महाराज हे कोणी ढोंगी बुवा नव्हते किंवा मठाधिपति नव्हते, ते एक शुद्ध आचरणाचे. वैराग्यशील साधुपुरुष होते. कोल्हापूरला ते सन १८९४ मध्यें आले व इथेंच त्यांनी पौष शुद्ध ५ शके १८५५ रोजीं जिवंत समाधि घेतली. कोटितीर्थावर ती समाधि आहे. पूर्वीच्या जीर्ण समाधीचा जीर्णोद्धार 'श्री नारायणदास भक्त मंडळा'नें केला आहे. श्री नारायणदास महाराज हे एक सत्पुरुष होऊन गेले. करवीरची आम जनता त्या सत्पुरुषास मानीत होती. भजत होती. करवीरचे छत्रपतीहि त्या सत्पुरुषास मानीत होते व त्यांच्या साधुत्वास साजेशा इतमामानें त्यांना वागवीत होते. आणि म्हणूनच त्या सत्पुरुषाच्या श्रीरामस्वरूपानंतरहि त्यांच्या स्मृतिरूप समाधीची पूजाअर्चा, तीर्थप्रसाद, पुण्यतिथ्युत्सव, भंडारा अखंडपणें वर्षानुवर्षे चालू आहे. श्री नारायणदासांचा शिष्यवृंद नव्हता. आश्रमांत कुणीतरी असावें व सत्पुरुषानंतर त्यांच्या जागी सत्पुरुषच असावा म्हणून नरोत्तमदास

नामक एका साधूस या आश्रमांत नेमण्यांत आलें पण ही व्यवस्था फार दिवस चालू राहिली नाहीं. यानंतरहि अनेक साधू येथें आले, आश्रमांत राहिले आणि निघूनहि गेले नारायणदासांच्या मागून ते स्थान यथार्थतेनें भूषविणारा कुणीच पुरुष आश्रमांत चिरस्थायी झाला नाहीं. आश्रमाची कांहीतरी व्यवस्था होणें जरूर म्हणून महाराजांच्या भक्त मंडळींनीं ता. १४ सप्टेंबर १९३६ रोजीं 'श्री नारायणदास भक्तमंडळ' नामक एक संस्था स्थापन केली आणि आश्रमाची देखरेख, पुजाअर्चा आदि कर्मे या मंडळामार्फत करण्यांत येऊं लागली. तीच व्यवस्था आतांपर्यंत चालू आहे.

श्री नारायणदास महाराजांचें आयष्य मोठें चित्तवेधक आहे जीवन-वृत्तांत हृद्य आहे. नारायणदास महाराज मूळ राहणार उनाऊ जिल्ह्यांतील पाटण परगण्यापैकी कल्याणपूर या गांवचे. त्यांचे वडील वृंदावन व माता बेंहशी. दोघें अत्यत धार्मिक आणि पुण्यशील होतीं व सतत ईश्वरस्तवनांत मग्न असत. अशा या पवित्र आणि मंगल वातावरणांत वाढल्यानें नारायणास ईशभजनाचा नाद लागला. ईशस्तवनाबरोबरच तो आपल्या वडिलांच्या इच्छेनुसार तालम, कुस्ती, मेहनत वगैरे घेऊं लागला. मात्र त्याचें शालेय शिक्षण जरासुद्धां झालें नाही. योग्य समयीं नारायणाचा विवाह झाला व तो सुखानें संसार करूं लागला. त्याचबरोबर तो वडिलांच्या उद्योगावरहि देखरेख करूं लागला. मुंबई, दिल्ला, कलकत्ता वगैरे प्रमुख शहरांत वृंदावनाच्या पेढ्या होत्या त्यांचाच कारभार प्रामुख्यानें नारायण पाहूं लागला. पण त्यांत त्याचे लक्ष लागेना. त्याचें सारें लक्ष ईशचिंतनात लागून राहूं लागलें. आणि अशाच वेळीं त्यास वानप्रस्थाश्रमाची आवश्यता भासूं लागली. त्याचें मन वैराग्यशील बनलें आणि एके दिवशी तो पत्नीस ईशसेवाचरण करण्यास सांगून घरांतून बाहेर पडला.

गृहत्यागानंतर नारायण प्रवास करीत करीत नैमिष्यारण्यांत आला व तिथें त्यानें गुरुप्राप्तीसाठीं एक तप तपश्चर्या केली. रात्रंदिवस गुरूचा निदिध्यास लागला असतां, एके समयीं त्याच्यासमोर सद्गुरू जानकीदास उभे ठाकले. गुरूच्या लाभानें नारायण कृतार्थ झाला व गुरुचरणीं त्यानें

आपलें मस्तक ठेवलें. जानकीदासांनी नारायणास पोटाशीं धरून 'तुझी इच्छा पूर्ण होईल. तू आजपासून माझा शिष्य आहेस.' असा आशिर्वाद दिला. यावेळेपासून तो जानकीदासांच्या सीत'मढी येथील आश्रमांत त्यांचा शिष्य म्हणून राहूं लागला. तेथें गुरूच्या कृपेनें त्यास दिव्य ज्ञान प्राप्त झालें. या ज्ञानप्राप्तीनंतर नारायणानें कृतज्ञतेनें जानकीदासांना वदन करून 'गुरुदक्षिणा काय देऊं' ? असा विनम्रपणें प्रश्न केला. यावर गुरू हंसले व म्हणाले, "बेटा चारोधाम पावोसे घुमकर सब तीर्थयात्रा करके तू मेरे पास आ." झालें. गूरूची आज्ञा शिरसावंद्य मानून त्यानें तीर्थयात्रेस प्रारंभ केला. बदरी नारायण, गंगोत्री, देवप्रयाग, केदारनाथ, अमरनाथ वगैरे मुख्य स्थळांना भेट देऊन नारायणदास हिमालयावरून खालीं उतरले व नेपाळ, भूतान वगैरे प्रदेशांतून ते प्रथम काशीस व नंतर गयेहून प्रयागास आले. ग्वाल्हेर, अयोध्या करून इंदुरास आले. पुढें मथुरा, वृंदावन वगैरे तीर्थें, गुजरातेंतील पावागडावरील विश्वामित्र आश्रम पाहून ते चित्रकूटास आले. अशा तऱ्हेनें तीर्थयात्रा व धर्मजागृति करीत ते सीता-मढ स परत सद्गुरूचरणी आलें तीर्थयात्रेंत त्यांनी दोन यज्ञ केले. इंदूर येथील मुक्कामांत नदीतीरावर पहिला व नैमिष्यारण्यांत दुसरा. सन १८८९ मध्यें जानकीदास महाराजांनीं इहलोकीची यात्रा संपविल्यानें सर्वानुमतें नारायणदासास आश्रमाचे वारस ठरविण्यांत आलें आश्रम-प्रमुखाचा ऐषआराम उपभोगण्यासाठीं आपलें जीवन नाहीं याची जाणीव त्यास होऊन त्यांनीं आश्रमप्रमुखपदाचा त्याग केला व ते १८९१ मध्यें पुण्यास आले. तेथें ते दोन वर्षें बालाजी मंदिरांत राहिले.

पण पुण्यांतहि त्या ईश्वरलोलुप नारायणदासांस समाधान वाटेना म्हणून ते योग्य त्या क्षेत्राचा तपास करूं लागले. कायमचें वास्तव्य कर-ण्यास तीर्थक्षेत्र म्हणून महाराजांनीं दक्षिण काशी करवीर क्षेत्र पसंत केलें. करवीर क्षेत्राशेजारील शिंगणापूर, प्रयाग, ज्योतिर्लिंग, रामलिंग, मल्लैया कात्यायनी वगैरे पवित्र स्थानें पाहून ते पंचगंगेच्या तीरावर आले तिथें अल्पकाळ वास्तव्य करून करवीर क्षेत्राच्या पूर्वेस गोमती व जयंती या

नद्यांच्या संगमापलिकडे असलेल्या कोटितीर्थावर आले. तलाव पाण्यानें तुडुंब भरला होता. उत्तरेस एक मठ व खालीं घाट, पश्चिमेस कोटीश्वराचें देवालय, सभोंवार कांटेरी नागफडे व दाट झाडी. असा तो निसर्गरम्य प्रशांत प्रदेश नारायणदासांना फार फार आवडला. इथेंच कायमचे वास्तव्य करण्याचे त्यांनी ठरविलें. प्रथम त्यांनी मठांत मुक्काम केला कुणी साधु आलेत असा बोलवा सर्वत्र पसरला व नागरिकांच्या झुंडीच्या झुंडी त्यांच्या दर्शनास येऊं लागल्या. मुक्त हस्तानें कोणी येत नव्हते व महाराजांचा प्रसाद घेतल्याखेरीज कोणी परत जात नसे. मठांत प्रभुरामचंद्रजींची दोन्हीं वेळां पूजा व आरती होऊं लागली. लोकांची गर्दी वाढू लागली. तीमुळें त्यांना अस्वस्थता वाटूं लागली. म्हणून एके रात्रीं ते कोटीश्वराच्या देवालयांत निर्जन स्थळी येऊन बसले. तिथेंहि पत्ता काढून भाविक त्यांच्या दर्शनास येऊं लागले. हें पाहून ते देवळासमोर असलेल्या वटवृक्षाच्या ढोलीत जाऊन बसले. तोहि पत्ता लोकांना लागला व तिथेंहि त्यांची गर्दी उमळूं लागली. याच वेळेपासून म्हणजे सन १९०३ पासून त्यांची 'साधू श्री नारायणदास महाराज' म्हणून कोल्हापूर व आसमंतांत ख्याति झाली. आणि अगदीं याच समयास नारायणदासांचे गुरुबंधु उद्धवदास त्यांच्या शोधार्थ करवीरक्षेत्री आले. ते उभयतां कोटीश्वराच्या देवळांत राहूं लागले. शेजारीच त्यांनी एक आश्रम उभारला. तिथें रोज 'सीताराम, सीताराम जय सीताराम' सुरू झालें. नारायणदास तोंडी भजन म्हणत व उद्धवदास तें टिपून घेत. 'सत्य प्रकाशसार' व 'सत्यनाम भजन रत्नसार' ही दोन भजनाचीं पुस्तकें तयार झाली.

नारायणदासांनीं एकाच ठिकाणीं बसून तीन वर्षांत तुलसीरामायणाचीं १०८ पारायणें करण्याचा संकल्प केला. पारायणास शके १८४९ पौष शुद्धांत प्रारंभ झाला व शके १८५२ कार्तिक शुद्ध नवमी, गुरुवारी पारायण समाप्ति झाली. समाप्तिकार्याकरितां पंधरा दिवस अगोदर दूरदूरचे तपस्वी, साधू वगैरेंना त्यांचा प्रवासखर्च देऊन पाचारिलें होतें. यज्ञकार्यांत हवनविधि पुरा करण्यासाठीं हुबळीचे अष्टांग साधु

श्री भगवतिदास यांना निमंत्रण देण्यांत आलें होतें. अशा तऱ्हेनें हा यज्ञ यथासांग पार पडला. हा यज्ञ कार्तिक शुद्ध दशमी शके १८५२ रोजीं झाला. नारायणदासांचा हा तिसरा यज्ञ होता. त्यांच्या अंगी सहनशीलता, क्षमा, सत्य, मनोनिग्रह हे सद्‌गुण पूर्णपणें वसत होते. वेदशास्त्र, पुराणें सर्व कांहीं त्यांच्या मुखोद्‌गत असें. चोवीस तास धुमी पेटलेली. सतत ईशनामस्मरण, सकाळी, संध्याकाळीं आरतीच्या वेळीं वार्तिक श्लोक, बाराखडी वर्णन, बारामासी, देवी अष्टक, हीं नेमानें चालायचीच. लोकांना त्यांचा एकच उपदेश–'उद्योग करा, बुद्धी चालवा, ज्ञान मिळवा. मोह उत्पन्न होऊं देऊं नका सदा सत्संग बाळगा आणि अंगी सहनशीलता क्षमा, सत्य, मनोनिग्रह व इंद्रियनिग्रह साध्य करून घ्या.

नारायणदास आपले शिष्य बदरी व ब्राम्हणदेव यांना मठांत ठेवून शके १८८५ साली पुण्यास गेले व तिथे त्यानी ता. ५–११–१९३३ रोजी समाधिस्थ होण्याचा प्रयत्न केला पण विधिघटना निराळी होती. महाराजांना कोटितीर्थास येण्याच्या हव्यास लागला. तशी त्यांनीं इच्छा प्रगट केली व कोल्हापूरच्या त्यांच्या भक्तगणानें त्यांना करवीरास आणले व ता. २१ डिसेंबर १९३३ रोजी नारायणदास समाधिसुखांत विलीन झालें. तीच ती समाधि आतां तिचा जीर्णोद्धार झालेला आहे महाराष्ट्र राज्याच्या गॅझेटियरमध्ये कोल्हापूर विभागांत याबद्दल पुढील उल्लेख सांपडतो "On the southern side ( of the Kotitirth ) there is a sort of mangrove and a building. This building was constructed by one Narayandas Maharaj who came here in 1894. Narayandas took Samadhi in 1933. The Samadhi has become a place of worship."

कोटि कोटि जन्मांतील पातकांचा नाश ज्याच्या स्नानानें होतो अशी ख्याती आहे व जें एका साधुतुल्य सत्पुरुषाचा सान्निध्यानें पूनित झाले आहे तें कोटीतीर्थ आजहि एकवार पाहिलें तर कांहीं काळ तिथेंच राहण्याचा मोह पाहणारास झाल्यावांचून राहवत नाहीं. इतकें ते रमणीय आहे. इतर भाग सोडला तरी, केवळ रमणीय स्थळ म्हणूनहि हें कोटितीर्थ एकवार तरी खचित पाहण्यासारखे आहे.

●●

# खिद्रापूरचा कोपेश्वर—



नको काही फ्रान्सने इतकी घमेंड मारायला की, शरीरसौष्ठव, स्त्री-सौंदर्याची शिल्पप्रतिमा व्हीनस डी मेलोच्या आकृतीत आहे म्हणून! नको कांही म्हैसूरच्या हळेबिडने इतकी प्रौढी मिरवायला की आपल्याचपाशी मत्त गजोत्तमाच्या मस्त शिल्पकृती असंख्येने आहेत म्हणून ! आणि नको काही दक्षिण भारताने इतके ताठून जायला की आपल्याच येथील भव्य मंदिरात उत्कृष्ट शिल्पकलाकृती साठवून ठेवलेली आहे म्हणून ! आपल्या मराठमोळ्या महाराष्ट्रात, त्यातल्यात्यात करवीर प्रांतात अशी काही शिल्पकलासृष्टी सौंदर्याने नटलेली आहे की, ती फ्रान्सची घमेंड खास जिरवील, हळेबिडची प्रौढी नष्ट करील आणि दक्षिणेतील मंदिरांचा ताठपणा मेणाहूनही मऊ करून वितळून टाकील.

कोल्हापूर जिल्ह्यात पूर्वभागात कृष्णामाईच्या काठी खिद्रापूर नामक एक खेडेगांव आहे. त्या गावात कोपेश्वराचे एक देवालय आहे. त्या देवालयात फ्रान्सच्या व्हीनस डी मेलोसारख्या डझनवारी शिल्पसुंदरी

आहेत. त्यात भारतीय युवतीचे देहसौष्ठव व सौंदर्याची अचूकता आणि अपारता सामावलेली आहे. या देवालयाच्या जोत्यात–सभोवार हळें-बिडच्या मत्त गजोत्तमांप्रमाणें शंभरानें मस्त कलाकृती आहेत की त्यांचा तो थाट पाहून देहभान हरपून जावे आणि देवालय ज्या दगडावर उभारलेले आहे तो प्रत्येक दगड, शिल्पकलाकौशल्याने इतका विनटलेला आहे की, दक्षिण भारतातील भव्य मंदिरातील शिल्पकलेचे प्रतिनिधित्वच येथे उभारण्यात आलेले आहे असे वाटू लागते.

कोल्हापूरपासून ३६ मैलावर ईशान्य दिशेस, कृष्णाबाईच्या काठावर खिद्रापूर हा दुमाला गाव आहे. या छोटयाशाच गावात दोन छोटीशीच मंदिरे आहेत. एक हिंदूचे आणि दुसरे जैनांचे. हिंदूंचे देवालय हे शिव-मंदिर आहे व जैनांचे देवालय आणि बस्ती आहे. शिवमंदिरात कोपेश्वर आणि घोपेश्वर या दोन शिवाच्या मूर्ती आहेत. मूर्ती म्हणजे शिवलिंगे होत आणि जैनांच्या बस्तीत आदिनाथ तीर्थकराची प्रतिमा आहे. हीं देयालयें फार प्राचीन आहेत. त्यांची बरोबरी करणारी, शिल्पसौंदर्य अस-लेली मंदिरे अखिल भारतात क्वचितच आढळून येतील. ही शिल्पकला न्याहळतांना नेत्रांना आल्हाद होतो. मन भारावून जाते आणि हृदय उचंबळून येते. एकेका कृतीकडे घटकान् घटका पहात उभे राहिले तरी दृष्टी तृप्त होत नाही की तेथून पुढे सरकावे असे वाटत नाहीं, आणि पुढे सरकले तरी तेथील आकृती पहात असता पाय पुन्हा जमिनीला खिळून राहतात आणि अज्ञातच पूर्वेचा सूर्य पश्चिमेस केव्हा जातो हे समजत देखील नाही.

खिद्रापूर हे गाव कोल्हापूरापासून ३६ मैल अंतरावर आहे. खिद्रा-पूरला जावयाचे अनेक मार्ग आहेत. तथापी कोल्हापूरहून त्या गावास जाणारे दोन मार्ग आहेत. नरसोबाच्या वाडीवरून कुरुंदवाड गावातून टाकळीस जायचे व तेथून पुढे उत्तरेस तीन मैल गेले की खिद्रापूर लागते. हा एक मार्ग. आणि दुसरा मार्ग म्हणजे रेल्वेने मिरजेस उतरावयाचे, तिथे मिळणाऱ्या एस्. टी. मोटार बसने शिपूरास जायचे व कृष्णा ओलां-

हून पैलथडी गेले की खिद्रापूर. फक्त उन्हाळ्यात कुरुंदवाड–टाकळी हा मार्ग सोयीचा असतो आणि मिरज–शिपूर हा मार्ग बारा महिने खुला असतो. पावसाळ्यात कृष्णेला पाणी आले तरी, ती पार व्हावयाला सतत नावा असतात. त्यामुळे खोळंबाही होत नाहीं. या गावचे मुख्य आकर्षण म्हणजे कोपेश्वराचे देवालय हे होय. हे देवालय गावाच्या मध्यभागी आहे. हे देवालय अति प्राचीन असल्याचे मानले जाते. ह्या देवालयाचे प्राचीनत्व दाखवणारा शिलालेख याच देवालयात दक्षिणद्वारात आहे. हा शिलालेख देवनागरी लिपीत असून तो देवगिरी यादवकालीन आहे. मंदिराच्या व्यवस्थेसाठी आणि कोपेश्वराच्या पूजाअर्चादिसाठी मिरज जिल्ह्यांतील कुडलदामवाड ( कुरुंदवाड ) हा गाव देण्यात आलेला आहे. याच लेखात या देवालयाच्या दुरुस्तीसाठी म्हणून कुडलदामवाडच्या पूर्व कडील आणखी दोन खेडी देण्यात आल्याचा उल्लेख आहे. या लेखावर सोमवार वद्य ३० शके ११३५ ( इ स. १२१३ ) असा काल नमूद आहे हे दानपत्र त्या वेळचा राजा सिंघणदेव दुसरा याने केलेले आहे. यावरून या देवालयाची बांधणी याहिपूर्वी झाली असली पाहिजे असे म्हणावयाय हरकत नाही.

खिद्रापूर ज्या कोल्हापूर जिल्ह्यात आहे तो जिल्हा पूर्वीं करवीर प्रांत म्हणून संबोधला जात होता. हा करवीर प्रांत फार प्राचीन कालापासून प्रसिद्ध आहे. या प्रांताची माहिती इ, सनापूर्वींचीही मिळते. इः सनापूर्वीं ३०० वर्षांचा जो एक लेख उत्खननात सापडलेला आहे त्यात कोल्हापूरचा उल्लेख केला गेला असल्याचे आढळून येते तसेच कोल्हापूरच्या परिसरात जी अनेक सोन्याची, तांब्याची, शिशाची नाणी सापडली आहेत, त्यावरुन हा प्रांत पहिल्या शतकात शातकर्णी किंवा आंध्रभृत्य राजांच्या ताब्यात असावा असे दिसते आंध्रभृत्यानतर कदंबराजांचा अंमल या प्रांतावर इ. स. ५०० पर्यन्त चालू होता. कदंबांनंतर इ. स. ७६० पर्यंत चालुक्य व चालुक्यांनतर ९३७ इ. स. पर्यंत राष्ट्रकुल राजे यांचा अंमल होता. चालुक्यांनी राष्ट्रकुलांचा पाडाव करून या प्रांतावर पुन्हा आपला अंमल बसविला, तो इ. स.

११८० पर्यंत होता. त्यांचे मांडलिक म्हणून शिलाहार (शेलार) राजे प्रत्यक्ष कोल्हापूरांत अंमल चालवीत असत. हे शिलाहार राजे आपल्याला नागराजा शखचूड-याचे गरुडापासून रक्षण करणारा जो विद्याधर जिमूतवाहन याचे वंशज म्हणवत. या शिलाहार राजांमध्ये महामंडलेश्वर नारसिंह व भोज हे फार प्रसिद्ध राजे होऊन गेले. चालुक्यांच्या कारकीर्दींत इमारती बांधण्याची शिल्पकला मोठ्या पूर्णदशेस पोहचली होती. चालुक्यांच्या पूर्वी महाराष्ट्र व कर्नाटकांत जैनधर्म फार प्रबळ होता. यामुळे त्यांच्या इमारती जैनांनी बांधलेल्या इमारतीच्या धर्तीवर बांधलेल्या आहेत; मात्र चालुक्यांच्या व जैनांच्या इमारतीत काही विशेष प्रकार आढळतात, यावरुन हे देवालय चालुक्यकालीन असावे असे मानण्यास जागा आहे. शिवाय चालुक्य राजे शिवभक्त हाते. चालुक्यकालीन जे लेख या प्रांतात आढळले आहेत, त्या लेखांवर लिंग आढळून येते. तसेच या देवालयात ज्या नर्तकींच्या अनेक मूर्ती कोरलेल्या आहेत. त्या नर्तिकांचे पदन्यास, हावभाव सातव्या शतकात प्रचलित असलेल्या नर्तनातील अंगविक्षेप, हावभावांशी साम्यता पावलेले दिसून येतात. यावरुन व शालीवाहन शकाच्या चौथ्या शतकापासून तो पुढे सहाशे वर्षेपर्यंत या प्रांतावर चालुक्य वंशाचे राजे अंमल चालवीत होते, यावरून हे देवालय त्यांच्यापैकीच कुणीतरी बांधलें असले पाहिजे असे आहे तर सिंघणदेवाच्या शिलालेखात राजा सिंघणदेवाने कुरुंदवाड गाव कोपेश्वरास दिला असा उल्लेख आहे याच सिंघणदेवाने कोल्हापूरच्या अंबाबाई देवाळालगतची महाकाली व महासरस्वती ही दोन देवळे बांधल्याचा दाखला मिळतो. यावरुन त्याने खिद्रापूरास भेट देऊन कोपेश्वरास तो गाव दिला असावा असे अनुमान निघते. जसे महाकाली व महसरस्वती ही देवालये अंबाबाई देवालयानंतर बांधण्यात आलीं, त्याप्रमाणें कोपेश्वराला कुरुंदवाड हा गावही नंतर देण्यात आला असावा आणि ज्याप्रमाणें अंबाबाई देऊळ बांधणारा कर्णदेव होता, त्याचप्रमाणें कोपेश्वराचे देऊळ बांधणारा राजा कुणीतरी सिंघणदेवा व्यतिरिक्त असला पाहिजे हे स्पष्ट होते.

देवालयातील कोपेश्वराच्या प्रस्थापनेसंबंधी पुढील प्रकारची आख्यायिका येथे सांगण्यात येते. दक्षयज्ञानंतर आपला कोप शांत करण्यासाठी भगवान शंकर येथे वास करून राहिले व तेथे श्री विष्णूंनी येऊन त्यांच्या कोपाचे शमन केले कोपेश्वराचे हे देवालय वास्तुशास्त्रातील विमान धर्तीचे आहे या धर्तीवर इतक्या सुंदर तऱ्हेने बांधलेले भारतातील हेच एक देऊळ होय. नाही म्हणावयास ओरिसात भुवनेश्वर येथील कोनारकचा ( ब्लॅक पॅगोडा ) देऊळ या धर्तीवर बांधले गेले आहे, याचा आकार दक्षिण भारतातील बहुतेक देवालयासारखा रथाकृती असून त्याच्या सभोवारच्या भितींना नीलांग हेमाडपंथी देवालयांप्रमाणे कोन



कोपेश्वर देवलयांतील नक्षीकाम

आहेत. या देवळाची लांबी १०३।। फूट रुंदी ६५ फूट आणि उंची ( मूलस्थानावरील घूमटासह ) ५१ फूट आहे. देवालयाचे मूलस्थान मणीमंडप, मुखमंडप व प्रवेश मंडप असे ४ विभाग आहेत, मूलस्थानात कोपेश्वर आणि धोपेश्वर अशी दोन शिवलिंगे आहेत. मणीमंडपात १२ कोरीव खांब आहेत तर मुखमंडपात २० कोरीव खांब आहेत. या खांबा-वरील कोरीव काम फारच अप्रतिम आहे. कोरीव काम इतके वैपुल्याने, इतक्या विविधतेने करण्यात आले आहे की त्याची मूळ कल्पना करणाऱ्या कलाकाराच्या प्रतिमेची भरारी किती उंच होती याची कल्पना येते, या खांबांवर आम्हां हिंदूधर्मीयांचे तेहतीस कोटी देव कोरण्यात आले आहेत की काय असा भास ते खांब व त्या वरील ते कोरीव देव पहात असतांना होतो. याचबरोबर या शिल्पात कोरलेल्या आकृतीत कांही माणसांच्या तर कांहीं त्यांच्या रतिक्रीडामग्न आकृती आढळून येतात. देवालयासारख्या पवित्र स्थानात ही मैथुनाची प्रात्यक्षिके कशास्तव ? शिल्पकाराच्या या कलाविलासास दोन कारणें देण्यात येतात. या कारणांची मीमांसा करतांना एक कारण असे दर्शविण्यात येते की, विद्युत्तापाने मंदिराचा विध्वंस होऊ नये म्हणून असल्या रतिक्रीडेच्या प्रतिमा कोरण्यात आल्या असाव्यात. विद्युत्पात आणि रतिक्रीडा यांचा



← कोपेश्वर देवालयापुढील स्वर्गमंडप.

संबंध काय, हेच समजत नाही. स्वर्गतुल्य रतिसुखात रममाण असणाऱ्या जीवांचे ते स्वर्गसुख आपल्या उपस्थितीने हिरावून घेण्याचे पाप हातून घडू नये, अशीच त्या देवी विद्युल्लतेची, कृष्णभगिनीची अंतरीची भावना असते ? देव जाणे आणि तो शिल्पज्ञ जाणे ! कोणी या कलाकृतीचे समर्थन शैवशाक्तांच्या साधनेचे ते १ तांत्रिक लक्षण असावे असे मानतात तर कुणी त्या धर्मसाधनेचा संभव समजतात. आपल्या हिंदुधर्मशास्त्रात कामाला तिसरा पुरुषार्थ मानले जाते. मोक्षाला जातांना कामविजय ही एक अपरिहार्य गती आहे. या बाबीचे समर्थन करतांना आद्य शंकराचार्यांनी असे प्रतिपादन केले आहे की, 'रतिक्रीडा हे सृष्टीचे मूळ आहे. ते जीवनचक्राचे कारण आहे.' त्याचप्रमाणे ते मोक्षाचे प्रवेशद्वार आहे. विकार बाहेरच्या शिल्पाकृतीने निर्माण होत नाहीत तर अंतर्यामी मनात ते निर्माण होतात. कलाकाराचा या आकृती निर्माण करतांना हाच उदात्त हेतु असला पाहिजे. नीच अर्थाने आपण त्या कलाकृतीकडे कां पहावे ? हीन, नीच हेतू असल्या युगानयुगे सदैव सुंदर रहाणाऱ्या कलाकृतींना जन्म देत नाही. त्या निर्माण करणाऱ्या संवेदनाही त्या कलाकारांच्या ठायी निर्माण होत नाहीत. हा विश्वकर्म्याचा जीवनचक्र गतिमान करण्याचा महन्मंगल पवित्रमय प्रयोगच नव्हे काय ? आणि म्हणून ज्या पवित्र भावनेने आपण देवमूर्ती पाहतो, तीच पवित्र भावना सर्वत्र ठेवावी हे योग्य आणि इष्ट

या देवालयाच्या आतून आणि बाहेरून फिरत असतांना पाहाणारास सर्वत्र शिल्पकलेचा स्वैरविलास दिसून येतो. जिथे पहावे तिथे स्वर्गीय सौंदर्य आणि कलात्मकता दिसून येते, आणि त्याचबरोबर हेही आढळून येते की या स्वर्गीय सौंदर्याचे विच्छेदनही पण इस्लाम धर्मीयांच्या आडदांड हातांनी स्वैरपणे केलेले आहे. यादवराजांचा पाडाव करून या भागावर बहामनी राजांचा इस्लाम धर्मीय राजवट सुरू झाली. त्या राजवटीने तेराव्या शतकात आणि चौदाव्या शतकात हिंदूंच्या मंदिराचे जेवढे विध्वंसन केले तेवढे विध्वंसन निसर्गाच्या क्रूर कोपानेही झालेले नाही. इति-

हासात त्याला तोड नाही. अशा सार्वत्रिक वेडाचारात खिद्रापूरचे कोपे-श्वराचे देवालय सापडले नसते तर ते आश्चर्य होते. इस्लामीयांनी या मंदिरातील कलाकृतीही विच्छेदिल्या. त्या इतक्या हिरीरीने विच्छेदिण्यात आल्या, की त्यातून एकही कलाकृती शाबूत राहू शकली नाही. तथापी या विच्छेदनातूनही या देवालयाचे जे शिल्प शिल्लक राहिले आहे तेही इतके अप्रतिम आणि अनुपम आहे की त्याची बरोबरी करू शकेल असे शिल्पवैभव भारतात इतरत्र क्वचितच आढळून येईल.

कोपेश्वराचे देवालय ५० फूट उच असले तरी आज ते कृष्णाबाईच्या वाळवंटात सातआठ फूट तरी गाडले गेले असले पाहिजे. देवळाच्या बाहेरून देवळाच्या त्या कोरीव दगडी बांधकामाकडे पाहू लागताच ही गोष्ट स्पष्टपणे दिसून येते. प्रथमच अगदी भूसपाट कोरीव दगडांचा सर्पाकृती थर दृष्टीस पडतो. यावरचे कोरीव काम सुंदर आहे. नक्षीकाम अप्रतिम आहे या थरातही विविध मूर्तींच्या आकृती कोरलेल्या आढळून येतात. यानंतरचा थर म्हणजे देवळाचे जोतें. या जोत्यात हत्ती बसवलेले आहेत. हे हत्ती इतके सुबक आहेत की यावरून परमेश्वराने हत्ती हा प्राणी निर्माण केला असावा असे म्हणण्याचा मोह आवरत नाही. एक नव्हे शंभरावर असे हत्ती सभोवार उभे करण्यांत आले आहेत. हे हत्ती कोरणाऱ्या शिल्पकाराच्या शीघ्रगतीचे व श्रमाचे कौतुक करावे की, हे देवालय बांधण्याच्या कामी शतकानुशतके गेलीत असे मानावे याचा संभ्रम निर्माण होतो. बरे, हे हत्ती एकटेच आहेत म्हणावे तर तसे सुद्धा नाही. प्रत्येक हत्तीवर कोणी ना कोणी देव आरूढ झालेला आहेच. असे वाटते की, स्वर्गात हे देव गजावरून शिलंगणासाठीं चालले आहेत. या हत्तींच्या पायांपाशीही अशाच असंख्य मानवाकृती कोरण्यात आलेल्या आहेत. याखेरीज राहिलेल्या रिकाम्या जागात अगणित मानवी प्रतिमा निरनिराळ्या भावदर्शनात उभ्या करण्यात आल्या आहेत.

यानंतर दोन थरांवर जे शिल्प गुंफण्यात आलेले आहे ते दगडावर छिन्नीने कोरण्यात आले नसून कुंचल्याने पडद्यावर चितारले आहे असेच

वाटण्याइतके सफाईदार आणि सुरेख झालेले आहे. हा भाग म्हणजे देवदेवतांचा भाग होय. या थरात विष्णू जशा लक्ष्मीसमवेत आढळून येतो तसा ब्रम्हाही आपल्या सहधर्मचारिणी समवेत दिसून येतो. एके ठिकाणी तर रामायणातील एक प्रसंगच अप्रतिमपणे कोरला गेला आहे. रावणाची भगिनी शूर्पणखा रामाला सीतात्यागासाठी मोहिनी घालीत आहे असें ते दृश्य आहे. त्यातील हावभाव, वास्तवता आणि तन्मयता यांची झालेली परमावधी पाहून हे चित्र-ही शिल्पकृती जागतिक नव्हे तर स्वर्ग, पृथ्वी, पाताळ अशा त्रिस्थळी स्पर्धेत वर्षेनुवर्षे पहिले पारितोषिक मिळवील असे खचित वाटू लागते. याखेरीज या थरात शंकर, पार्वती, गणपती या मातृकासंघाच्या मूर्ती बसविण्यात आलेल्या आहेत चवरीवाहकांची तर या थरात रेलचेल झालेली आहे. या कलाविलासात ठायी ठायी निरनिराळ्या अंगविक्षेपातील असंख्य नर्तिकांच्या मूर्ती कोंदणात बसवाव्यात तशा बसविण्यात आलेल्या आहेत. या नर्तिका शिल्पात नसून सजीव आहेत असा भास त्या पहात असतांना निर्माण होतो. त्यांचे ते विरल अवगुंठन आणि त्यातून दृग्गोचर होणारे त्यांचे रेखीव अवयव सजीवतेलाहि मागे सारणारे आहेत. युनानमध्ये मेलो द्वीपकल्पावर सापडलेली आणि फ्रान्सने आपली कलासक्ती पुरी करण्यासाठी सामदा-मदंड या मार्गांनी पॅरिसला आणून ठेवलेली व्हीनस डी मेलोची संगमरवरी विछिन्न प्रतिमा विश्वसुंदर मानली जाते. प्रत्येक युवती आपले सौंदर्य या प्रतिमेसारखे असावे अशी इच्छा बाळगते आणि प्रत्येक पुरुष त्या प्रति-मेकडे तासन्तास पाहात राहून आपली कलासक्ती तृप्त करुन घेतो. फ्रान्स-मध्ये असली कलाकृती एकच आहे. पण कोपेश्वराच्या देवालयाभोवती असलेल्या या दगडी भिंतीत बसविण्यात आलेल्या या नर्तिका पहिल्या की अगणित आणि अप्रतिम सुंदर अशा व्हिनस डी मेलोच्या रांगाच्या रांगा आपल्यापुढे आहेत असे वाटू लागते. इतके या प्रतिमांचे कलात्मक सौंदर्य अप्रतिम आहे, अभिजात आहे. प्रत्येक कलाकृती अगदी विभिन्न, प्रत्ये-कीचा ढंग न्यारा, प्रत्येकीचा छंद न्यारा.

यानंतरच्या थरात अगदी कॉरनिसपर्यंत टिक ठिकाणी कानाकोप-

३५६८९... ... ३५६८९...

ऱ्यात अनेक मूर्ती, अनेक जोडपी बसविण्यात आलेली आहेत. या साऱ्या मूर्ती एका मुशीतून नसल्या तरी एकाच मगदुराच्या व अनेक कलामहर्षी-कडून करण्यात आल्या असाव्यात असे त्या पाहतांना वाटू लागते. एक मूस एका सांच्याच्याच मूर्ती निर्माण करते, पण येथे तर प्रत्येक मर्ती वेगळी. प्रत्येकी मुखाचे सौंदर्य देहाची कमनियता आणि उभे राहण्याची ढंगदार पद्धती अगदी वेगवेगळी चुकूनसुद्धा बेढबपणा आढळायचा नाही. अशा या कलाकारांना दुनियेतील सारे कलावंत आदराने उत्थापन देतील. मग सामान्य माणसाची कथा काय ?

हे झाले मुख्य देवालयाचे शिल्पवैभव. त्या शिल्पातील तो सारा विलास, तो सारा शृंगार पाहिला की, विहारातील निरागस व निरामय अवस्थेतील साधूंच्या ठायी निर्माण झालेली वैफल्याची भावना कुठेच्या कुठेच निघून जाईल. मग साधारण मानवाची ती कथा काय ? अशा या धुंद मनः-स्थितीतच आपण देऊळ पाहून बाहेर पडतो, तोच पुढे स्वर्गमंडप आकाशाचे आच्छादन पांघरून ३६ दगडी कोरीव खांबावर उभा असलेला दिसून येतो. या मंडपास चार प्रवेशद्वारे आहेत आणि आत तो द्वादशकोनी आहे. या स्वर्गमंडपाचे हे ३६ खांब साऱ्या शिल्पसौंदर्याला साजेशाच कलात्मक सौंदर्याने विनटलेले आहेत. हा स्वर्गीय मंडप अपुऱ्या अवस्थेतच आहे. त्याचे काम व्हावयाचे राहूनच गेलेले आहे हा मंडप वीस किरणी ताऱ्याच्या आकाराचा करण्यात येणार होता असे त्याच्या मांडणीवरून म्हणता येईल. पण हे सारे अपूर्ण राहिले ते अपूर्णच राहणार ! अगदी कल्पांतापर्यंत अपूर्णच राहाणार. कारण ते पूर्ण करणारे कलावंत निर्माण होऊन गेले असले तरी आज ते पूर्ण करू शकणारे कुणी नाहीत व पुढेही होणार नाहीत ही वस्तुस्थिती आहे. पौष महिन्याच्या अमावस्येस येथे मोठी यात्रा भरते व आसमंतातील खेडुत मोठ्या संख्येने या यात्रेस उपस्थित रहातात. ही यात्रा १ दिवसाची असते.

खिद्रापुरातील कोपेश्वराचे देऊळ हे भारतीय संस्कृतीचा फार मोठा ठेवा आहे. देवालयाच्या रूपाने प्राचीन कालचे शिल्पशास्त्र मूर्तिमंत उभे आहे. त्याचे दर्शन माणसाला स्वर्गीय आनंद देणारें आहे. ●●




पहाटे फिरून परत येत असतां, जनता एक्स्प्रेस येण्याच्या वेळीं स्टेशनवर जायचे आणि गाडी स्टेशनांत शिरल्यानंतर घरचा रस्ता सुधारायचा हा माझा नित्याचा प्रघात. या प्रघातानुसार मी जनतेच्या वेळी स्टेशनवर गेलों असतां मला एके दिवशी, बरीच मुसलमानमंडळी हातांत हारतुरे घेऊन आपल्या मोटारीभोवती घोळका करून उभी असलेली आढळून आली. चारपांच मोटारी, पांचपंचवीस हारतुरे आणि पन्नासअेक मंडळी–असे तें दृश्य दिसताच ही काय बाब आहे, हें जाणून घेण्याची जिज्ञासा मला झाली; म्हणून मी त्या जमावांत माझ्या ओळखीचे कोणी दिसते की काय, हें हेरूं लागलों.

इतक्यांत एका मोटारीतून बसल्या बैठकीवरून एका असामीने मला हाक मारून विचारले, "काय मामा, स्टेशनवर आलांत, कोण यायचं आहे वाटत ?"

या प्रश्नाने मला आनंद झाला. पण त्याच क्षणी, तेथे जमलेले सारे मुसलमान मजकडे 'हा कोण मामा' म्हणून न्याहाळूं लागले. ज्याने माझ्याशी बोलणें सुरू केलें होतें तो एक स्थानिक व्यापारी होता. त्यास उत्तर म्हणून म्हणालों, "कुणी यायचं नाही माझ. नेहमीच येतों मी जनतेस. फिरायला जातों पहाटे. परततांना जातों स्टेशनवरून. पण मर्चंट, आपण कां आलांत ?" आम्ही सारी मित्रमंडळी या व्यापाऱ्यास मर्चंट याच नांवाने संबोधित असूं.

इतक्यांत 'गाडी आधा घंटा लेट है' असें सांगत एक जवान मुसलमान त्या घोळक्यात शिरला. ही बातमी समजतांच जमावाची पांगापांग झाली. कांही इतस्तत फिरूं लागले, कुणी चहा घेण्यास गेले, तर कुणी मोटारींत जाऊन बसले. मीहि माझ्या त्या मित्राकडे वळून "चल मर्चंट, आपण थोडं आंत जाऊं," असें म्हटलें व त्याला घेऊन फलाटावर गेलों

या वेळीं त्याच्याकडून मला असें समजलें की, येथील एक मुसलमान मक्केस हाज यात्रेस गेला होता व तो जनतेने परत येणार आहे. त्याच्या स्वागतासाठी ही मंडळी जमली होती मी मर्चंटला म्हणालों, "या हाज यात्रेची तुम्हांला कांही माहिती आहे काय ?"

यावर मर्चंटने मला पुढीलप्रमाणें हकीकत सांगण्यास आरंभ केला. आम्ही प्रतीक्षालयांत आरामांत खुर्च्यांवर बसलों होतों. रेस्टॉरंटमधून दोन चहा मागविले होते आणि चहाचे घुटके घेतघेत मर्चंटने, नजरेसमोर चित्रपट उभा करावा त्याप्रमाणे, मक्केची यात्रा माझ्यापुढे शब्दांत उभी केली :

"महाराष्ट्रीयांचें असें पंढरपूर, अखिल हिंदूंचें जसें काशीरामेश्वर तसें मुसलमानांचें मक्का होय. मक्केच्या हाज यात्रेसाठी, जगाच्या काना-

कोपऱ्यांतून असंख्य मुसलमान प्रतिवर्षी जात असतात. हजारो वर्षे ही प्रथा चालू आहे. मक्का हे मुसलमानांचें एक पवित्र धर्मक्षेत्र आहे. मक्के-मधील 'काबा' या पवित्र स्थानाच्या दर्शनासाठी प्रत्येक मुसलमान आतुर असतो. काबा हे स्थान इस्लाम जन्मण्यापूर्वीपासून अस्तित्वांत आहे. एक अत्यंत पवित्र धर्ममंदिर म्हणून त्याची गणना होते. या धर्ममंदिरांत शेकडो मूर्ती होत्या व त्या नित्य पूजिल्या जात असत. या काबा धर्म-मंदिराची वहिवाट कोरैश ( Koraish ) या जमातीकडे होती. या कोरैश जमातींतच महंमदाने जन्म घेऊन इस्लामी धर्माचा प्रचार आणि प्रसार साऱ्या जगभर केला. सौदी अरबस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील तांबड्या समुद्रांतील जेद्द नामक बंदरापासून सुमारे पंचेचाळीस मैल अंत-रावर मक्का हें शहर आहे. हें एक छोटेखानीच शहर आहे वैराण वाळवंटांत, ओसाड डोंगरांच्या मध्येच हें शहर आहे. पाणथळ भाग, अगर हिरवळ प्रदेश असा मक्केंत आणि आसमंतांत क्वचितच दिसून येतो.

"भारतासारख्या राष्ट्रांतून अगर समुद्रमार्गे जे हाज यात्रेकरू मक्केस जातात त्यांच्यासाठी प्रवासी बोटीची सोय आहे. या बोटीनी गेलेले प्रवासी प्रथम जेद्दा बंदरांत उतरतात. जेद्दाहून हें यात्रेकरू मक्केस जाण्या-साठी निघतात या प्रवासासाठी टॅक्सी, मोटारी, मोटार बसेस आणि लॉऱ्या अशीं वाहनें तिथे योग्य भाड्याने मिळू शकतात. हीं वाहनें मुबलक प्रमाणांत उपलब्ध असली तरी, जेद्दा ते मक्का हा प्रवास पायीं करणारेहि कांही अति उत्साही यात्रेकरू असतात. पण असले फारच थोडे. मक्केस जाणारे हें सर्व यात्रेकरू पांढरा पोशाख–अेहराम (EHRAM)–परिधान केलेले असतात. अेहराम म्हणजे बिनशिवलेले कपडे होत. ते दोन तुकडे असतात. एक मानेभोवती लपेटलेला आणि दुसरा दोन्ही खांद्यांवरून पायांपर्यंत अंगरख्यासारखा घातलेला. स्त्रियाहि अशाच प्रकारें एहराम परिधान करतात.

" मक्केंतील काबा हें इस्लाम धर्मियांचें प्रमुख आकर्षण. काबाला आपण भेट देणार, काबा आरण पाहणार या भावनेनेच भाविक मुसल-

मानांचें अंतःकरण भारावून जातें. काबा म्हणजे परमेश्वराच्या प्रार्थनेचें स्थान, काबा म्हणजे परमेश्वराच्या अस्तित्वाचें स्थान. काबांत तो परवरदिगार असतो अशी सर्व मुसलमानांची भावना आणि श्रद्धा; आणि म्हणूनच काबाच्या दर्शनाने आपण पुलकित होऊं ही प्रत्येकाची कल्पना. अगणित वर्षे, युगायुगें हीच भावना प्रत्येक मुसलमानांत आहे आणि म्हणूनच आयुष्यांत एकदा तरी मक्केस जावें, डोळे भरून काबा पाहावें, त्याभोवती प्रदक्षिणा घालाव्यात असें मुसलमान इच्छित असतो."

"काबा हें आहे तरी काय?" मीं मध्येच प्रश्न केला.

"काबा ही एक चाळीस फूट उंचीची व तीस फूट रुंदीची चौकोनी वास्तु आहे. ही वास्तु मोठमोठाल्या दगडांनी बांधलेली असून हाज मोसमांत ती काळ्या रंगाच्या रेशमी कापडाने वेष्टिलेली असते. या काळ्या रेशमी कापडावर कुराणांतील काव्यपंक्ति लिहिलेल्या असतात. काबांत शिरण्यासाठी एक दरवाजा आहे. हा दरवाजा जमिनीपासून सहा फूट उंचीवर असून तो सोन्याने मढविलेला आहे. हा दरवाजा नेहमी बंदच असतो. हाज यात्रेच्या हंगामांत तो फक्त एकदोनदाच उघडला जातो. या काळांत कुणास आंत जावयास मिळालें तर त्यास तिथे खांबाशिवाय अन्य कांहीच आढळून येणार नाही. या खांबावर काबाचे छप्पर आधारलेलें आहे. आंतील भिंतीसुद्धा काळ्या रेशमी वस्त्राने आच्छादिलेल्या असतात. काबा ही वास्तु ज्या मशिदींत आहे ती मशीद भव्य आणि विस्तारित आहे. तिचे ते उंचच उंच मनोरे आणि प्रशस्त व्हरांडा असंख्य यात्रेकरूंना दिपवून सोडतो. ही मशीद चतुष्कोनी असून ती उघडी आहे. हाज यात्रेच्या प्रसंगी सबंध मशीद तिचे मनोरे आणि काबाकडे जाण्याचा मार्ग विद्युत्‌दीपानी प्रकाशित करण्यांत येतो. काबा मात्र या रोषणाईने न सजवितां तसाच राखला जातो.

"या मशिदीत गेल्यानंतर हाज यात्रेकरू तवाफ ( TAWAF ) करतो. तवाफ म्हणजे काबाभोवती सात प्रदक्षिणा घालणें. अनवाणी पायाने, कुराणांतील कवनें म्हणत आणि परवरदिगारची स्तुति करीत

यात्रेकरू प्रदक्षिणा पुन्या करतो. परमेश्वराच्या चरणीं स्वतःचा मान आणि शान वाहून, त्याला अनन्यभावें शरण जाऊन हे यात्रेकरू जेव्हां हा तवाफ करीत असतात तेव्हाचे त्या काबाचें दृश्य मोठे हृदय हेलावणारें असतें. उन्हातान्हांतून, अनवाणी पायाने असंख्य यात्रेकरू काबाभोवती प्रदक्षिणा घालीत असतात काबाला हान मोसमांत जा, अगर आणि कोणत्याहि वेळेला जा, तिथे तुम्हांला कुणी ना कुणी तरी काबाभोवती, मुखावटें कुराण गात, अनवाणें तवाफ करीत असलेलें आढळून येईल तवाफ चालू नाही असा एकहि क्षण मिळत नाही.

" या काबापासून सुमारे शंभर कदमांवर एक विहीर आहे. या विहिरींत जिवंत पाणी आहे. हाज यात्रेकरू या विहिरीतील पाणी पवित्र मानून आपआपल्या गांवीं नेत असतात. या विहिरीतील जिवंत पाण्याची जन्मकथा अशी सांगितली जाते :

" अब्राहमची पत्नी हजीरा ही तहानेने व्याकूळ झालेल्या आपल्या पुत्राकरितां-इस्माइलकरितां पाणी शोधूं लागली. त्या वैराण वाळवंटांत तिला पाण्याचा टिपूसहि दिसेना. कुणी कारवान दिसतो की काय हें पाहण्यासाठीं हजीराने एस्–साफा व एल्–मारवा या टेकड्यांवर सात वेळां जाऊन दूरवर दृष्टि फेकली. एकदा या टेकडीवर तर एकदा त्या टेकडीवर अशा तिनें सात फेऱ्या केल्या. पण तिथूनहि तिला कोणी कारवान दिसून आला नाही. म्हणून ती हताश होऊन, तहानेने व्याकूळ होऊन निश्चेष्ट पडलेल्या आपल्या इस्माइलपाशी आली. तीहि तहानेने व्याकूळ झाली होती. अशा स्थितींत तिने परमेश्वराचा धावा करून आपल्या मुलाचे प्राण वांचविण्याची त्यास प्रार्थना केली. आणि आश्चर्य हें की, इस्माइल पडला होता त्याच्याच शेजारी, जमिनींतून पाण्याचे बुडबुडे वर येऊं लागले. तिला हर्ष झाला व ती त्या पाण्यास उद्देशून 'झेम'–'झेम' ('थांब'.'थांब') असें म्हणाली. तें पाणी ओंजळीने घेऊन तिने इस्माइलच्या तोंडांत घातलें. याच झऱ्यावर ही विहीर बांधण्यांत आलेली आहे. काबास सात प्रदक्षिणा घातल्यानंतर

यात्रेकरू या दोन टेकड्यांवर सात वेळां जा ये करतो. हाज यात्रेतील हा दुसरा कार्यक्रम होय.


" यानंतरचा कार्यक्रम म्हणजे मक्केपासून सुमारे पांच मैल दूर अंतरावर असलेल्या मुन्ना या टेकडीवर एक रात्र काढणें हा होय. मुन्ना येथे मुक्काम करून पहाटे यात्रेकरू आरफातच्या मैदानाकडे निघूं लागतात हें आरफात मैदान मुन्नापासून चार मैल अंतरावर आहे. झिल हाजच्या नवव्या दिवशी या मैदानावर सर्व यात्रेकरू दिवसभर परमेश्वराची प्रार्थना करतात. या दिवशी येथे प्रार्थना केल्याखेरीज हाज यात्रा पुरी झाली असें समजत नाहीत. झिल हाजच्या नवव्या दिवशींचा आरफात मैदानावरील यात्रेकरूंच्या मेळाव्याचें तें दृश्य फारच मनोहारि दिसते. जिकडे तिकडे तंबूच तबू पडलेले सर्व यात्रिक प्रार्थनेंत चूर असलेले, प्रत्येकाच्या अंगावर तो एहराम असलेला. सारेंच दृश्य चित्तवेधक आणि अविस्मरणीय. येथील उन्हाळा मनस्वी कडक असतो आणि अशा वेळी उष्माघातानें अपघात होत असतात. सौदी अरेबियन सरकारनें येथे औषधपाण्याची सोय केली आहे आणि आपल्या भारत सरकारनेंहि एक शुश्रूषापथक आणि दवाखाना वर्षातून सहा महिने उघडा ठेवण्याची व्यवस्था केलेली आहे या आरफात वाळवटांत एक टेकडी आहे. या टेकडीस जाव्ल-एर-रेहमान ( दयेचा पर्वत ) असें म्हणतात या टेकडीवरूनच महंमदाने आपल्या अखेरच्या हाज यात्रेच्या वेळी यात्रेकरूंस धर्मोपदेश केला होता हीच प्रथा अद्यापि चालू असून हाज यात्रेच्या वेळी याच टेकडीवरून धर्मोपदेश सांगितला जातो. सूर्यास्त होऊं लागतांच हे असंख्य तंबू काढण्यात येतात आणि हा श्रांत यात्रिक पुढील ठिकाणाकडे म्हणजे मझदालाफाकडें चालू लागतो. आरफातपासून मझदालाफा सुमारे तीन मैल अंतरावर आहे.

" सूर्यास्ताबरोबर सर्व यात्रेकरू आरफातहून मझदालाफाकडे जात असल्यामुळें, मार्गावर यात्रेकरूंची इतकी तोबा गर्दी होते कीं, हे तीन मैल अंतर तोडण्यास यात्रेकरूंस केव्हां केव्हां तीन तासाहूनहि अधिक काळ

लागतो. सर्व रात्र मझदालाफात काढली जाते. दिवसभरच्या उन्हाने श्रांत झालेल्या यात्रेकरूंस येथील थंड हवा उत्साहवर्धक वाटते. यानंतरचे तीन दिवस यात्रेकरू मुन्नांत घालवितात. येथें यात्रेकरूं सैतानावर सात खडे मारतात. याची कथा अशी आहे की, जेव्हा परमेश्वरानें अब्राहमला आपला मुलगा इस्माइल याचें बलिदान करण्याचा आदेश दिला, तेव्हा अब्राहमने परमेश्वराचा हा आदेश पाळण्याचे ठरवून पुत्राच्या बलिदानाची सिद्धता केली. या वेळीं, या परमेश्वरी आदेशाचें परिपालन अब्राहमकडून होऊं नये, यासाठी तिथे सैतान प्रकट झाला आणि त्या कामीं त्याने व्यत्यय सुरु केला. तेव्हा अब्राहमने त्यास खडयाने मारून दूर हटविलें. सैतानाला घालविल्यानंतर अब्राहमने परमेश्वरी आदेशानुसार आपल्या मुलाचे बलिदान केले. पण आश्चर्य हें की, या बलिदानांत बलि दिला गेलेला इस्माइल जिवंत राहिला व ज्याचा बलि दिला गेला तो एक एडका निघाला. ही परमेश्वराची थोर कृपा समजून अब्राहमला अतिशय आनंद झाला हा सैतान जेथे प्रकट झाला व जिथून त्याला अब्राहमने खडे मारून घालविले, तेथे अंतराअंतरावर तीन दगड असून त्या तीन दगडांस यात्रेकरू सातसात खडे मारीत असतो. सैतानावर साधुत्वाचा विजय, याचें निदर्शन म्हणून जगांतील सर्व मुसलमान झिल हाजचा दहावा दिवस बलिदान विधि करून पाळत असतात.

"यानंतर यात्रेकरू मुन्नाहून मक्केस परततात आणि काबाभोवती पुन्हा एकवार तवाफ करतात. या वेळी काबावरील जुनें कृष्णवर्णीय रेशमी कापड बदलून नवीन घातलेलें असतें. प्रत्येक वर्षी हाज यात्रेंत हें कापड बदलले जातें. यात्रा केल्यावर आयुष्याची इतिकर्तव्यता झाली, एक थोर इप्सित साध्य झालें, या समाधानाने यात्रेकरू आपापल्या गावीं 'हाजी' म्हणत परतात"

इतक्यांत पुन्हा मागविलेला चहा आला व त्याचा अखेरचा घोट घेऊन आम्ही ग्लास खाली ठेवतों न ठेवतों तोच धाडधाड करीत गाडी रेल्वेस्टेशनांत आली.




श्री क्षेत्र नरसिंहवाडी हे स्थान अत्यंत पवित्र व रमणीय असे आहे. कोल्हापूरपासून ३० मैल अंतरावर कोल्हापूरच्या पूर्व बाजूस कृष्णा आणि पंचगंगा यांच्या संगमावर आहे. कोल्हापूर–मिरज रस्त्यावर जय-सिंगपूर स्टेशनवर उतरून या तीर्थक्षेत्रास जाण्यासाठीं मोटारमार्ग आहे. या मोटारमार्गानें जयसिंगपूर ते नरसिंहवाडी हें १० मैलाचे अंतर आहे. शिवाय कोल्हापूराहूनहि जयसिंगपूरकडून परभारें मोटारमार्ग आहे. नरसिंहवाडी येथें कृष्णेच्या दक्षिण काठावर श्री दत्तमंदिर आहे. या दत्तमंदीरांत श्री नृसिंह सरस्वती यांनी स्थापन केलेल्या दत्तपादुका आहेत. या क्षेत्राच्या परिसरांत आणखी कांही देवळे आहेत. पावसाळयांत श्र

कृष्णामाई जेव्हा दुथडी वाहू लागतें, तेव्हां या दत्तमंदिराचे शिखरसुद्धा पोटांत घेते. या देवळाच्या दक्षिण बाजूस बाभळीची व चिंचेची विस्तीर्ण राई आहे व त्यामुळें तर या स्थळास फार शोभा आलेली आहे. या क्षेत्रांत श्री नरसोबाचे देवालय आहे, म्हणून यास 'नरसोबाची वाडी' असेहि म्हणण्याचा प्रघात आहे. तथापि श्री नरसिंहवाडी येथें जे एक दत्त मंदिर आहे त्या दत्त मंदिरामुळेंच या स्थळास क्षेत्रमहात्म्य आलेले आहे.

श्रीगुरुदत्तात्रयांचा गुरु अवतार कृत युगांत झाला असून तो श्री विष्णुचाच अवतार आहे व तो गुरु अवतार असल्यानें चिरंतन व सनातन आहे. वैदिक वाङमयांत दत्तात्रय हा अग्निस्वरुपी मानला आहे. श्री दत्तात्रय देवता त्रेताग्नि, त्रिगुण, त्रयविद्या यांचे प्रतिकच आहे अग्नि म्हणजे गतीची परमावधिच असल्यानें दत्तात्रय हाहि गतिमान समजला जातो व त्याच्या गतीचे चिन्ह म्हणून त्याच्या मूर्तीच्या पुजेपेक्षां त्याच्या पादुकांचे पूजन अधिक रुढ आहे. अग्नीचें वाहन कुत्रा म्हणून तेच वाहन दत्तात्रयासहि देण्यांत आले आहे. अग्नि तीन रुपांत प्रगट होतो म्हणून दत्तात्रय हाहि पुढें त्रिमूर्ती कल्पिण्यांत आला व त्यामुळेच दत्तात्रय हा निर्बंधित व संशोधित अग्नि मानला जातो. दत्तात्रयाचें उल्लेख महाभारत, अग्निपुराण, ब्रम्हांडपुराण, वगैरे ग्रथांत आढतात. हा अत्रि–अनुसुयेचा पूत्र म्हणून सर्वमान्य आहे व तो ब्रम्हा, विष्णू व महेश यांचा अंशावतार मानण्यांत येतो तो जरी त्रिगुणात्मक मानला जात होता; तरी सर्व पुराणांत १४ व्या शतकापावेतों तो एकमुखी व चार हाताच उल्लेखिलेला आहे. तांत्रिक व महानुभवांहि एकमुखी दत्ताचीच उपासना करतात. चौदाव्या शतकापासून पुढें तीन तोंडे व सहा हातांचा दत्तात्रय प्रचलित झाला.

दत्त सांप्रदायाचे मुख्य कार्य म्हणजे मध्ययुगीन कालांत ब्राम्हणवर्णाची झालेली अधोगति थांबवून तो वर्ण पुन्हा कार्यक्षम करणे हे होय. हे कार्य करण्यासाठीं श्री गुरु दत्तात्रयानें इ. स. १३२० ते इ. स. १४५९ या कालांत दोन अवतार धारण केले. त्यांतील पहिला अवतार श्रीपाद

श्रीवल्लभ या नावानें प्रसिद्ध असून दुसरा श्रीनृसिंहसरस्वती या नावानें प्रसिद्ध आहे. श्री नरसिंहवाडी हे क्षेत्र श्री नृसिंहसरस्वती यानीं स्थापन केले असल्यानें आतां आपण त्यांचाच परिचय करुन घेऊं.

श्री नृसिंहसरस्वती यांचा जन्म मध्यप्रदेशांत अकोले जिल्ह्यांतील 'लाडाचे कारजे' येथें पौष शुद्ध २ इ स. १३८० च्या सुमारास झाला. त्यांची पहिली ४० वर्षे बालपण व तीर्थयात्रेच्या निमित्तानें, भारतदर्शन व एकंदर परिस्थितीचे सम्यक ज्ञान करून घेण्यांत गेली. शेवटच्या सुमारें ४० वर्षांच्या कालावधींत औदुंबर, वाडी व गाणगापूर याठिकाणीं वास करून त्यांनी आपले मुख्य कार्य केलें. शेवटची २० वर्षे त्यांनीं गाणगापुरास घालविली व तत्पूर्वी त्यानीं श्री नरसिंहवाडी येथें १२ वर्षे घालविली. अशा तऱ्हेनें आपले अवतारकार्य यशस्वीरित्या संपवून स्वामी वयाच्या ८० व्या वर्षी श्रीशैलास जाऊन तेथेंच गुप्त झालें. स्वामींच्या दिजानदाची तिथि माघ वद्य १ शुक्रवार शके १३८० (ता. १९ जानेवारी १४५९ ) ही येते. नृसिंहसरस्वतींच्या शिष्य व भक्त परिवारांत सर्व जातीचे लोक होते. त्यांचे मुख्य शिष्य म्हणजे सायंदेव साखरे, नंदी, नरहरी व सिद्ध हे होत.

श्री सदगुरु नृसिंहसरस्वती यानीं ज्या लाडाचें कारंजे येथें जन्म घेतला ते गांव करंजनगर या नांवानें प्रसिद्ध आहे. या गांवास जायचे झाले तर भुसावळ–नागपूर मध्यविभाग रेल्वे मार्गावरील मूर्तिजापूर या जंक्शन स्टेशनवर उतरुन तेथेंच मूर्तिजापूर–यवतमाळ असलेल्या रेल्वेमार्गावर २० मैल अंतरावर असलेल्या कारंजा टाऊन स्टेशनवर उतरावें लागते. येथें गांवांत जावें लागतें: नृसिंहसरस्वतींचा जन्म माधव नामक ब्राम्हणाची पत्नी अंबाभवानी हिच्या पोटी झाला. यांचा जन्म झाल्याबरोबर त्यांच्या मुखावाटें जो शब्दोच्चार निघाला त्यांत ॐकाराचें ध्वनि ऐकूं येऊं लागले. ब्राम्हणानें जातक वर्तविल्यानंतर मुलाचे नांव 'नरहरि' असे ठेवण्यात आले. वयाच्या सातव्या वर्षापर्यंत या नरहरीस बोलता येत नव्हतें. यामुळें आपणांस मुका मुलगा झाला या भावनेनें त्यांच्या

मातापित्यास अत्यंत दुःख झाले कांहीं दिवसानंतर नरहरीनें मौजीबंधन केल्यास आपणांस बोलता येईल, असे खुणेनें सांगितले त्या खुणेनुसार त्याच्या आईवडिलांनीं त्याचें मौजीबंधन केले आणि त्या मौजीबंधनाच्या वेळीं नरहरीनें चार वेद, सहा शास्त्रें मुखोद्गत् म्हणून दाखविली या नंतर मोठमोठे पंडित, शास्त्रीं अदि विद्वान लोक नरहरीबरोबर गहन विषयावर चर्चा करण्यास येऊं लागले· मौजीबंधनानंतर नरहरीनें आपणांस तीर्थयात्रा करावयास जाण्याची परवानगी आईवडिलांकडे मागितली. आईवडिलानी आपणांस दुसरे अपत्य होईपर्यंत तरी नरहरीनें तीर्थयात्रेस जाऊं नये असा आग्रह धरला. या आग्रहास मान देऊन आपल्यास दोन भावंडे होईपर्यंत नरहरि आईवडिलांपाशीं राहिला व २१ वर्षानें पुनः भेट देण्याचें आश्वासन देऊन तो तीर्थयात्रेस निघून गेला. श्री क्षेत्र काशी येथें जाऊन त्यानें अष्टांग योगाभ्यास करुन लौकिक धर्मरक्षणार्थ श्रीकृष्णसरस्वती यांना गुरु करून घेतलें व 'श्री नृसिंहसरस्वती.' असें नांव धारण केले. नंतर गया, प्रयाग, बद्रीकेदार वगैरे तीर्थांस जाऊन २१ वर्षानीं पुन्हा ते करंजनगरास आलें. गांवांत सर्व ठिकाणी त्यांचा सन्मान झाला व या सन्मानांत त्यांनी एकाच वेळी अनेक रुपें धारण करुन सर्वांकडून पूजा स्वीकारली व शेवटीं आईवडिलास 'तुम्ही भवपाशातून मुक्त झालां आहांत' असें सांगून ते वैजनाथास आलें. वैधनाथावरुन ते कृष्णाकाठी भिलवडीजवळ औदुंबर येथे एक चातुर्मास राहिले. व तेथे भुवनेश्वरी देवीच्या चरणीं जिव्हा कापून वाहणाऱ्या मूर्ख द्विजपुत्रांस ज्ञान देऊन ते कृष्णा—पचगंगा सगमांवर येऊन राहिलें.

ज्या काळीं श्री नृसिंहसरस्वतींचे आगमन औदुंबराहून कृष्णा—पचगंगा संगमावर झाले त्यावेळीं तो सारा भाग निबीड अरण्यानें व्यापून राहिला होता. नृसिंहसरस्वतीनें औदुंबर सोडलें ते भक्तांच्या अनुग्रह लालसेसच कटाळून. संतति व संपत्ति हीच या भाविकांची मागणी होती. सद्गती मागणारे दुर्मिळच. भाविक भक्तांच्या मन कामना पुऱ्या करणें हें भगवंतांचे परम पवित्र कार्य होय, असें जरी असले तरी त्यांना, संतति

आणि संपत्ति यांचाच अनुग्रह करणें वैगुण्यच वाटतें. याच विमनस्क अवस्थेंत स्वामीजीनी औदुंबराचा त्याग केला व कृष्णा-पंचगंगेच्या संगमावर ते गुप्तपणें वास करुन गुरुदेव चिंतनांत कालक्रमण करुं लागलें कृष्णा-पंचगंगा तीरावर असलेल्या नरसोबावाडी येथें एक तपपर्यंत ते तपश्चर्या करीत राहिले. कृष्णेपलिकडे असलेल्या औरवाडाप एके दिवशीं एका गरीब ब्राम्हणाचें घरीं भिक्षेस जाऊन त्याच्या अंगणांत असलेला घेवड्याचा वेल उपटून तेथें सुवर्णांच्या राशी निर्माण केल्या; त्याचे दारिद्र्य दूर केले. या एक तपाच्या तेथाल वास्तव्यात त्यांनीं आजूबाजूची क्षेत्रे प्रगट केलीं. ती म्हणजे शिरोळचें भोजनपात्र, कुरुंदवाडचें श्री दत्तमंदिर व औरवाडचा अमरेश्वर ही तीं तीन क्षत्रें होत. बारा वर्षानंतर संगमावर यक्षिणीयोगिनी स्थापन करुन विघ्नहर्ता गजानन व आपल्या मनोहर पादुका स्थापून कल्पवृक्ष औदुंबरास वर देऊन त्यांनी गाणगापुरास गमन केले गाणगापुरास जाण्यापूर्वी त्यांनीं आपल्या पादुकांच्या नित्यपूजेची व्यवस्था करुन ठेवला. ही व्यवस्था त्यांना आलास गांवाच्या भैरव नामक विप्राकडे दिली होती. नरसोबावाडी येथून गाणगापुरास गेल्यानंतर श्रीगुरुंचें निर्याण माघ वद्य १ शके १३८० ( १९ जाने. १४५९ ) या दिवशीं घडलें.

श्री क्षेत्र नरसिंहवाडी येथे, पुढीलप्रमाणें उत्सव होतात. विजया-दशमीस चातुर्मासांत बंद असलेली पालखीसेवा सुरुं होते. आश्विन वद्य १२ स गुरुद्वादशीचा सोहाळा मोठ्या भाविकतेनें व अमाप उत्साहाने साजरा होतो. हा दिवस श्रीपाद श्रीवल्लभ स्वामींचा अवतार समाप्तीचा होयः या दिवशी येथे महाप्रसाद होतो. या महाप्रसादास फार महत्व आहे. यामुळे हजारों भाविकांच्या पंगती प्रसाद सेवनास बसत असतात. ह्या क्षेत्राचें नैसर्गिक वैभव असलेल्या वृक्षराजांच्या राईत या भाविकांच्या असंख्य पंगती आकंठ प्रसाद सेवन करुन उठण्याचे दृश्य प्रस्तुत लेखकानें कोल्हापूर संस्थान असतांना, खऱ्या अर्थाने रामराज्याचें अधिपति असलेल्या राजाराम छत्रपतींच्या कारकीर्दीत अनेकवेळां पाहिलेलें आहे. आजहि येथें महाप्रसाद होतो व याहिवेळी कैक लोक महाप्रसादास


येतात; पण त्या काळच्या महाप्रसादाची शान आणि शोभा आताच्या महाप्रसादास अल्पांशानें सुद्धा दिसून येत नाहीं. पूर्वी ज्यानीं ते प्रसाद पाहिलें तें आजचे प्रसाद पाहून 'गेले ते दिवस' असे खिन्नतेचें उद्‌गार काढतात.

दत्तजयतीचा सोहाळा हा एक मोठा सोहाळा होय. हा सोहाळा मार्गशीर्ष शुद्ध ७ पासून पौर्णिमेपर्यंत चालू असतो, पौर्णिमेस सायंकाळी ५ वाजतां जन्म होतो. हा श्रीगुरुदत्त जन्मसोहाळा पाहण्यास आसमतांतील खेडांपाडांचे अगणित भाविक जमतात. यावेळीं नरसिंहवाडीस मोठी यात्रा भरते. श्रीकृष्णावेणीउत्सव हाहि एक या क्षेत्रांत होणारा मोठा उत्सव होय. हा उत्सव माघ शुद्ध सप्तमीपासून वद्य प्रतिपदेपर्यंत कृष्णेचा उत्सव म्हणून साजरा केला जातो. प्रतिपदेपासून वद्य पंचमीपर्यंत शेजारती केली जात नाहीं. माघ वद्य पंचमीस गोपाळकाला मोठ्या प्रमाणांत साजरा केला जातो. यानंतर कन्यागत; या कन्यागतांत सबंध वर्षभर या क्षेत्रांस यात्रेकरु येतच असतात. बारा वर्षांनीं गुरु कन्या राशीस येतो, म्हणून त्यांस कन्यागत म्हणतात. कन्यागतांत क्षेत्रदर्शन, स्नान इत्यादि विधि करणें मोठे पुण्यकारक समजले जाते.

आपल्या भरतखंडासारख्या अनेक तीर्थांच्या, अनेक क्षेत्रांच्या पुण्यभूमीत ईश्वराचे व ईश्वराच्या परमभक्तांचे अनेक अवतार युगायुगांचे ठायीं झालेले आहेत. श्री ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव आदि संत आणि त्यांच्याच अधिकाराच्या इतर श्रेष्ठ पुरुषांनीं ज्या भूमीचे वैभव वाढविलें आहे; त्यांचे भक्तिमार्गाचे अनेक पंथ आहेत. त्यांतच श्री नृसिंहसरस्वतींचा दत्तपंथ होय. आणि या पंथीयांचे श्री क्षेत्र नरसिंहवाडी हे एक मोठे आकर्षण आहे. या क्षेत्रांत आज वस्ती झालेली आहे. तीर्थक्षेत्राचें दर्शन घेणाऱ्या यात्रेकरुंस या तीर्थक्षेत्राची माहिती देऊन त्यांचेकडून यथासांग विधि करुन घेणारे पुजारीहि तेथें आहेत यात्रेकरुंसाठी एक मोठी धर्मशाळा आहे व सरकारी पाहुण्यासाठीं नगारखान्याची भव्य इमारत खुली आहे. यात्रेकरुंत कांहीं लोक व्याधिपीडित असतात. तर कांहीं लोक भूतबाधेनें पछाडलेले असतात. असे लोक कृष्णेंत स्नान करुन ओलेत्यानें या क्षेत्रां-

तील मंदिराभोंवतीं प्रदक्षिणा घालून आपल्या व्याधीपासून मुक्त होतात. असा अनुभव असल्याने अशा तऱ्हेचे व्याधिजर्जर झालेले लोक या क्षेत्रास मोठ्या संख्येनें येतात. तथापि सदा सर्वकाळ येणाऱ्या भाविकांच्या मानाने अशांची संख्या फारच कमी असते. कृष्णेचा काठ हा दुधदुभत्याचा काठ मानला जातो. म्हणून या क्षेत्राचा प्रसाद पेढे व बर्फी यांचाच प्रामुख्यानें असतो. या क्षेत्रावरुन परतणारा यात्रेकरु घरी जातांना पेढे व कवठाची बर्फी यांचाच प्रसाद प्रामुख्यानें घेऊन जातो. असे हे सुखद, दुधदुभत्यानें समृद्ध व भक्तिभावनेने संपन्न क्षेत्र आहे. ●●●

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ.
.......................... दि: ......................
.......................... नोंद दि: ....................




गोमांतक हो महाराष्ट्राची पुण्यभूमी आहे. कारण या छोटयाशा प्रदेशांत अनेक देवालये विखुरलेली आहेत. या देवांची माहिती व वर्णन स्कंदपुराणांत आहे.

मांगिरीशो महादेवो महालक्ष्मीश्च म्हालसा ॥
शांतादुर्गा च नागेश: सप्तकोटेश्वरं शुभं ।

या प्रदेशांत गोमांचल पर्वत आहे म्हणूनहि त्यास गोमांतक हे नांव प्राप्त झाले असावे या पर्वताचे वर्णन हरिवंशातील विष्णुपर्वात व विजयध्वजी भागवतांच्या दहाव्या स्कंदांत आहे. त्रिहोत्रपुराहून सारस्वत ब्राम्हण

गोमांतकांत आले त्यावेळी त्यांनी आपल्याबरोबर, आपले कुलदेवहि येथे आणून स्थापन केले. गोमांतकांतील देवांच्या प्रकारांत मुख्यत: तीन प्रकारांचा अंतर्भाव होतो. पहिला प्रकार कुलदेव हा होय कुलसंरक्षण हेच कुलदैवतांचे मुख्य कार्य होय म्हणून त्या देवतांस कुलदैवत म्हणतात. यानतर दुसरा प्रकार म्हणजे ग्रामदैवत. ग्रामदैवत म्हणजे गांवच्या देवता होत त्या फक्त ज्या त्या गांवातच असतात, इतरत्र नसतात. त्या ग्रामदेवतांच्या कृपेनें गांवावरची संकटे नाहीशी होतात यानंतर तिसरा प्रकार म्हणजे उपास्य दैवत हा होय. ज्या त्या व्यक्तीनें अगर कुळानें स्वत:च्या उपासनेंकरितां म्हणून जे दैवत स्वीकारलेले असते; त्यास उपास्यदैवत असें म्हणतात. उपास्य दैवताची उपासना करुन जो तो समाधान आणि अध्यात्मिक शांति मिळवूं शकतो.

गोमांतकांतील मुख्य कुलदैवत म्हणजे श्री. मंगेश होय. श्री मंगेश म्हणजे शिवलिंग होय. या शिवलिंगास मांगिरीश असें नांव आहे. बंगालच्या उत्तर प्रदेशांत भागिरथीच्या तीरावर मानगिरी अथवा मोंगिर या नांवाचे जे मोठे क्षेत्र आहे, तेथील शिवलिंगास मांगिरीश असें म्हणतात या मांगिरीश शब्दाचा अपभ्रंश पुढे पुढे मांगेश आणि मंगेश असा झाला.

श्री मंगेशाची मूळ पीठिका पुढीलप्रमाणें मानली जाते– गोमांचल पर्वतावर एका निर्जन वनप्रदेशात श्री शिवलिंगाचा प्रादुर्भाव झाला. याबाबतचा उल्लेख सह्याद्रि खंडांतर्गत मांगिरीश महात्म्यांत पुढीलप्रमाणें आढळून येतो. कुशस्थली येथे शिवशर्मा नामक एक सारस्वत ब्राम्हण रहात असें. त्याच्या घरी दुधदुभत्यासाठीं कांही वासरे होती. त्या शिवशर्मांच्या घरची एक गाय प्रत्येक दिवशी गोमांचल पर्वतावरील त्या निर्जन वनप्रदेशांतील त्या श्री शिवलिंगावर आपल्या आंचळांतील दुधाची धार सोडून दुग्धाभिषेक करीत असें. हे त्या ब्राम्हणाच्या गुराखी मुलानें पाहिले व तो अद्भुत प्रकार त्यानें आपल्या मालकास सांगितला. गाईच्या मालकानें ते दृष्य स्वत: पाहिले व त्यानें या प्रादुर्भुत शिव-

लिंगाची एकनिष्ठेनें आराधना सुरुं केली. या शिवलिंगामुळे कुशस्थली हे गांव पुण्यक्षेत्र म्हणून विशेष प्रसिद्धिस आले.

श्री मंगेशाविषयीं स्कंदपुराणांत एक कथा सांगितलेली आहे. ती कथा अशी की, एकेकाळी शिव व पार्वती ही दोघे मजेत बोलत बसली असतां त्या उभयतांत प्रेमकलह झाला. या कलहाचे पर्यवसान शिवानें क्रोधानें गौतमाश्रमी जाऊन आपलें ठाण मांडण्यांत झाले. पार्वती शिवाच्या शोधास लागली. शोध करीत करीत ती गौतमाश्रमांत आली. तेथें ती आलेली पहातांच शिवानें व्याघ्राचे रुप धारण केले व त्यानें तिच्या अंगावर उडी मारण्याचा अविर्भाव आणला. तेव्हा पार्वती भयभीत झाली व ती करुणरवानें 'मां गिरीश त्राहि' म्हणजे 'हे शंकरा, तूं माझे संरक्षण कर' असे म्हणूं लागली.

हा तिचा धावा भयभीत अवस्थेत होत गेल्यानें तिच्या मुखा-वाटे होणारें 'मां गिरीश त्राहि' हे शब्द पुढें पुढें मांगिश त्राहि असे उच्चारले जाऊं लागले अधिक अंत पहाण्यात अर्थ नाही असे जाणून शिवानें प्रसन्न होऊन पार्वतीस वर मागण्यास सांगितले. त्यावर पार्वतीनें शिवाजवळ असा वर मागितला की, 'हे गिरीश, ज्या माझ्या मांगिश या बोबड्या बोलानीं आपण प्रसन्न होऊन मला दर्शन दिलें, तेंच नांव पुढे चालवून आपण भक्तांचा उद्धार करावा'. पार्वतीची प्रार्थना शिवानें मान्य केली. आणि तेव्हापासून त्यानें मांगिश हेंच नांव चालविले. या स्कंदपुराणांतील कथेशिवाय श्री मंगेशासंबंधी पुढील एक कथा सांगितली जाते- सृष्टिनिर्मितीचा अहंकार नष्ट करण्यासाठीं महादेवानीं सृष्टिसंहार चालविला. शंकराच्या या संहारानें निगर्व व हतबल झालेल्या विधात्यानें उत्तर भारतांतील त्रिहोत्रपुरांत मानगिरी पर्वतावर लिंगस्थापना करून उपासना केली. तोच हा मांगिरीश होय. परशुरामानें त्रिहोत्रपुराहून कश्यपाश दान देऊन गोमांतकांत यज्ञकार्यार्थ दशगोत्री ब्राम्हण आणले. त्यापैकी वत्सकौंडिण्य ब्राम्हणासोबत मंगेश गोमांतकास आला व त्याची स्थापना त्यांचेकडून कुठ्ठाळ्ळीस झाली.

या श्री मंगेशाच्या देवालयाखेरीज गोमांतकांत आणखी अनेक देवस्थानें आहेत. त्यातील पुढील देवस्थानांचा उल्लेख प्रामुख्यानें करतां येण्याजोगा आहे. शांतादुर्गा, महालक्ष्मी, महालसा, सप्तकोटीश्वर, नागेश, रामनाथ, हाटकेश्वर, नरसिंह, गजानन, अजादुर्गा: यांतील बहुतेक सर्व देवालये पूर्वी 'कुशस्थलीं' नांवाच्या प्रदेशांत होती. परन्तु फिरंग्यांच्या बाटवाबाटवीच्या धामधुमीमध्यें तीं देवस्थानें रातोरात सुरक्षित स्थळीं हलविण्यात आली. या फिरंग्याच्या दंग्यामध्ये देव जरी हालविण्यांत आले तरी देवळे तेथेच राहिलीं व ती सर्व मोडून टाकण्यांत आली. सन १५०६ मध्ये गॅसपर या नांवाचा पाद्री गोव्याचा मुख्य धर्मोपदेशक झाला. हिंदूंच्यावर त्यानें इतकें अनन्वित अत्याचार केले की, त्याचे वर्णनहि करतां येणें कठिण आहे. साष्ठी प्रांतातील लोक व्यापारासाठीं गोवे शहरांत आले असतां त्यांना पकडून त्यानें एका दिवसांत ४०९ जणांना बाटवून ख्रिस्ती केले. इतकेंच त्यांच्या छळाचे वर्णन नाहीतर त्यानें हिंदुंची १२०० धर्ममंदिरें मोडून नेस्तनाबूत करून टाकली अशा नेस्तनाबूत केलेल्या देवालयांत बरीच प्राचीन देवालये होती अद्यापि या प्राचीन देवालयांच्या खुणा कुशस्थळीं प्रदेशांत आढळतात. तथापि आतां तो प्रदेश केवळ अरण्यमय झाला आहे. त्याला सांप्रत 'कुडथळी' असें म्हणतात. बाटवाबाटवीच्या तडाख्यांतून निसटून रातोरात जी हिंदूंचीं देवालये सुरक्षित स्थळीं हलविण्यांत आली, त्यांत मंगेशाचें देवालय अग्रेसर आहे. या धामधुमीत विजापूरकरांच्या आमदानींत सौंधेकर राजाच्या मुलखांत प्रियोळ येथे उपरिनिर्दिष्ट वत्स कौण्डिण्य महाजन वर्गानें श्री मंगेशाम आणिले व त्या जागी त्याची स्थापना केली प्रथम ज्या ठिकाणीं मंगेशाची मूर्ति आणण्यांत आलीं त्या जागी हल्ली श्री महादेव कृष्णा अभिषेकी याचे घर असून तेथे तुलसी वृन्दावन आहे. दरवर्षी श्रीची पालखी येथे वृंदावनास भेट देण्यास येत असतें. ६० वर्षांपूर्वी महाजनानीं या देवस्थानचा जीर्णोद्धार केला. पेशवाईत १७३९ च्या दरम्यान या देवस्थानच्या पूजाअर्चा वगैरेसाठीं सातारचे छत्रपति

शाहु राजे यांनीं सदर गांव इनाम म्हणून दिला.

श्रीमंगेशाचे देऊळ ज्या परिसरात आहे तो परिसर निसर्गसौंदर्यानें अत्यंत रमणीय व आल्हादकारक झाला आहे. या स्थळाच्या प्रवेशद्वारापासून दुतर्फा कठड्यामधून प्राकाराच्या दरवाजापर्यंत प्रशस्त राजमार्ग गेलेला आहे.. या देवस्थानच्या मुख्य दरवाजांत प्रवेश केला म्हणजे भाविकांस थोड्या अंतरावर पिंपळाचा एक मोठा पार लागतो या पाराच्या पलिकडे एक सुंदर इमारत दिसते. या इमारतीच्या मागच्या बाजूस श्री नाईक स्वामींची समाधी लागते. या सुंदर इमारतीस ' मठ ' असें संबोधिले जाते व वनभोजनादि उत्सवप्रसंगी श्री मंगेशदेवाची स्वारी येत असते. दुतर्फा कठडा असलेल्या राजमार्गावरून आपण पुढे गेलो कीं आपणास प्राकाराच्या पूर्वेकडील बाजूस उंच तट लागतो व त्यावर मधोमध नगारखाना आहे. या नगारखान्यांत श्री देवस्थानतर्फे चौघडा वादन होत असते या नगारखान्याशेजारीं एक छोटासा सुंदर तलाव आहे. प्रकाराची रचना टुमदार व सुंदर असून त्याच्या तिन्ही बाजूस भव्य अग्रशाळा आहेत प्राकाराच्या मधोमध श्री मंगेश देवालय आहे पुढे जरा उत्तरेकडच्या बाजूस सुंदर व उंच दीपमाळ आहे. अशा प्रकारची दीपमाळ या भागांत क्वचितच पहावयास मिळते. देवालयाच्या गर्भागारांत श्री मंगेश असून पुढील चौकावर नंदिकेश्वर, वत्सगोत्री ग्रामपुरुष यांच्या मूर्ति आहेत. मंगेशाचे उजवे बाजूस श्री गणपति व दुसरीकडे श्री भगवति यांच्या मूर्ती आहेत देवालयाच्या पाठीमागे श्रीवीरभद्र, श्रीमुळकेश्वर, लक्ष्मीनारायण, सूर्यनारायण, शांतादुर्गा, श्रीकाळभैरव यांच्या मूर्ती आहेत व प्राकाराच्या उजवीकडे श्री सांतेरी व समोर श्री क्षेत्रपाळ अशा मूर्ती आहेत. श्री मंगेशाचे मुख्य शिवलिंगावर अभिषेक झाल्यावर ते पुसून त्यावर मुख्य कवच ठेवण्यांत येते.

या देवस्थानांत नित्यनैमित्तिक कार्यक्रम पुढीलप्रमाणें होत असतात. प्रात:काळीं ब्राम्हमुहुर्तावर एक तास चौघडावादन होते. त्यानंतर नौबत होते. नौबतीनंतर निर्माल्यविसर्जन होते. यानंतर अभिषेकादि देवकृत्यास

प्रारंभ होतो. अकरा वाजतां पुन्हा चौघडा वादन होते व दुपारी १२ वाजतां महामंगलारती होते. संध्याकाळी ५ वाजतां चौघडा, ६ वाजता नौबत, त्याचवेळीं नृत्यांगनांचा नृत्यगायनांची सलामी होती. प्रदोषकाळचे निर्माल्य विसर्जन झाल्यानंतर नेहमीची रोजची आवर्तने व नैवेद्य होतात, सभामंडपांत चौंकावर देवासमोर सकाळी ७॥ पासून एक तास पुराण व तदनंतर एक तास कीर्तन होऊन ९॥ च्या सुमारास मंगलारती होते. मंत्रपुष्पांजलीनंतर गाऱ्हाणे, व नंतर कलावंतीणींचे नृत्यगायन हा कार्यक्रम होतो. प्रत्येक सोमवार हा शिवपर्वणीचा दिवस मानला गेल्यामुळे दर सोमवारी श्रीची पालखी निघते. यास शिबिकोत्सव असें म्हणतात. या देवस्थानात सतत बाराहि महिनें अभिषेक, महारुद्र, लघुरुद्र, इत्यादि देवकृत्ये होत असतात. शिबिकोत्सव, लालकी उत्सव, रथोत्सव, अन्न-संतर्पण इत्यादि उत्सवांची नेहमीच फार गर्दी होत असते. मुख्य मुख्य उत्सवाचे दिवस सोडून बाकीच्या दिवसांत सकाळपासून रात्रीची आरती होईपर्यंत श्री ग्रामपुरुषाच्या मूर्तीस प्रसाद लावण्यांत येतो. हा प्रसाद काही सकल्पित गोष्टीचा उलगडा करण्यासाठी लावण्यांत येतो व प्रसादास तांबड्या पटकुळींच्या कळ्या लावतात. प्रसाद म्हणजे आपण आपल्याकडे कौल म्हणतो तो. मंगेश देवाचे जे मूळ महाजन वत्स व कौंडिण्य सारस्वत ब्राम्हण त्यांची मूळ उपनावे २४ असून त्यास 'वांगड' अशी संज्ञा आहे.

मंगेशाच्या दर्शनास जेव्हा भाविक जातो, तेंव्हा तो तेथे जाऊन जी कांही धर्मकृत्यें करवितो, ती करविण्यासाठीं देवस्थानच्या संस्थापकानीं बेहडा ठरविला आहे. बेहडा म्हणजे धर्मकृत्यें करावयास लागणारा खर्च. हा बेहडा घेऊन पुढील धर्मकृत्यें करण्यांत येतात – धूळभेट देवाचे प्रथम दर्शन श्री मंगेश देवास नारळ, श्री मुळकेश्वर, श्री ग्रामपुरुष, श्री कौंडिण्य पुरुषास ( कौंडिण्य गोत्री असल्यास ) प्रत्येकी एक केळ, खर्च ८ पै. ग्रामपुरुषास व श्री मुळकेश्वरास खिचडी, श्री कौंडिण्यपुरुषास अभिषेक, तसेंच मुळकेश्वरास तंबाखूची विडी, कांबळ व कोयती हे विधि

तसेंच गंठवंड ( दांपत्य स्नान ), पंचामृतासह आवर्तन, संतर्पन, घूड भरणे म्हणजे श्रीच्या मस्तकावर पोचेपर्यंत गर्भगृहांत पाणी भरणें. बेहड्याचा लघुरुद्र, शिंगाचा लघुरुद्र, बेहड्याचा महारुद्र अभिषेक, शिंगाचा महारुद्र म्हणजे गव्याच्या शिंगातून पुढें टोकाला गोमुख केलेलें असतें. त्यांत पाणी भरुन देवाला अभिषेक घालणें. पंचामृतासह अभिषेक नैवद्य, पचामृतासह रुदएकादशनी, काळभैरवास वड्यांची माळ, एकदारी पूजा, तीनदारी पूजा, तुळाभार ( सकल्पित वस्तू ) वगैरे प्रकारची देवकृत्यें करविण्यास पंचावन रुपये दोन आण्यापर्यंत निरनिराळ्या प्रकारचा बेहडा घेतला जातो. गौड सारस्व ब्राम्हण जातीतील कोणत्याहि धर्मपीठाधिपति, श्री स्वामींचा सर्व देवस्थानांतून पादपूजादि सत्कार करण्याचा परिपाठ येथें चालू आहे. या देवस्थानच्या महोत्सवाच्या दिवशी देवस्थानांत आलेल्या व तेथें असलेल्या श्रीच्या अगर अन्य महाजनांसहि उत्सवाचे काम पूर्ण झाल्याखेरीज दुसरींकडे जातां येत नाहीं अगदी जरुरीचेच काम असलेस श्रीस श्रीफळ ठेऊन व श्रींची क्षमा मागून तेथून जातां येते. हा असा प्रघात आहे हा प्रघात श्री मंगेशाच्या देवालयांतच आहे, असें नाहीं तर गोमांतकांतील सर्व देवस्थानांत तो चालू आहे.

श्री मंगेश देवांस साताराचे शाहू छत्रपति यांनीं आपल्या पेशव्यांकडून जें गावे इनाम दिली आहेत, त्यांच्या सनदा देवस्थानच्या दप्तरांत पहावयास मिळतात. त्या सनदांतील मजकूर बराच उद्‌बोधक असल्यानें त्या तीनहि सनदा पुढें विस्तारानें देत आहोत.

राजश्री रामचंद्र मल्हार यांचें कुलदेवाचीं देवालयें अंत्रुन प्रांतीं आहेत. तेथ ल उर्जेस तेल, फुलें आणि द्रव्यें पाहिजेत त्यास खर्चाबद्दल रफायतपन्हां सदाशिव नाईक, इमडी राजे सौदे यांजकडून कवळें ग्राम श्री शांतादुर्गादेवीस व मौजे प्रियोळ येथ ल श्री म्हाळसादेवीस एक वाडा व श्रीमंगेशदेवास एक वाडा व नगदीं महाल मजकुरीं अडीचशें रुपये इनाम संपादून घेऊन सनदी हांसल केल्या आहेत. त्याप्रमाणें आम्ही तीं

[stamp: ९८.२८]

इनामें करार करुन सरकारची पत्रें दिली आहेत. अशास गांव व वाडा मजकूरची कमाविशी करून कमाविसदार जातील. अशास, इजलाल पन्हांसीं आमचा संकल्प कीं सदरहू गांव, वाडे, देवालयें व कमाविसदार यांस इजलालपन्हांकडून कांहींच तसोसीं होऊं नये. सौदे संस्थानीं व इजलाल पन्हांमध्यें विभक्तता पडली आहे, तेव्हां इजलालपन्हांकडील इसम यांस आज्ञा केली पाहिजे कीं, सदरहू गांव, वाडे देवालयें व कमाविसदार यांस कांहीच उपसर्ग करुं नये. सौंदे संस्थान याशीं पाहिजे तसें वर्तावे परंतु यांत दिकत असूं नये. श्रीसप्तकोटेश्वर क्षेत्र नारवें हें पुरातन पासून संरक्षिलें आहे. इजलालपन्हां अगोदरचा विसरै यांनीं डिचोली महाल व किल्ला काबीज केला. तेसमयी गांव फरारी झाल्यामुळें देवालय खालीं आले. तेव्हां गांवांहून श्रीस्थळ काढिलें अशास गांव मजकूर श्रीक्षेत्रास पूर्वीच इनाम देऊन आम्हांकडून सरकारांत पत्र सादर झालेंच आहे. प्रस्तुत श्रीक्षेत्राची उर्जा चालणेच्या खर्चाबद्दल सदरहू गांवचे इनाम पत्र इजलाल पन्हांनीं रवाना केले पाहिजे. रवाना छ. १८ माहे शाबान ( ११ माहे जून ) जादा काय लिहावे हे किताबत.

राजा
शाहू नरपति
हर्षनिधान बाळाजी
बाजीराव
प्रधान

२) सनद-

अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री येसाजी
राम निसपत नारायणराव व्यंकटेश गोसावी यांसी

सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार सुरसन समान समसेन मय्या अल्लफ. श्रीमंगेशदेव यास सरकारांतून इनाम रुपये तीनशे मौजे प्रियोळ प्रांतफोंडें या गावीं करुन दिले आहेत. त्यास मौजे मजकूरच्या पाटील कुळकर्णी यांनी तीनशें रुपयाची जमा करुन दिली आहे. त्याची लावणी

श्रींचें ब्राम्हणजन यांनीं करुन उत्पन्न होतें तें श्रीस देतात, असें असतां तुम्हीं अडथळा करितां कीं आपणांस सरकारचें ताकिदपत्र येईल तेव्हां जमीन चाल्वूं म्हणतां म्हणून हुजूर विदित झालें त्यावरुन हें आज्ञापत्र तुम्हांस सादर केले असे, तर सरकारचे सनदेप्रमाणें गांवकर याणीं श्रीकडे नक्की नेमून दिलें आहे त्याप्रमाणें चालवणें. व श्रीचे स्थळास व सेवकजन वगरे यांस वेंट व बेगारीचा वगैरे कोणेविशीचा तगादा काडी–मात्र न लावणें, श्रीचे स्थळी रा. पांडुरंग यांचे तर्फे सदाशिव विठ्ठल ठेविले आहेत ते देखरेख करतील जाणिजे. छ. ९ साबान. ( मोर्तब शिक्का धाकटा )

३ सनद :– राजश्री देसाई गांवकर कुळकर्णी मौजे प्रियोळ तपे अंत्रूज मामले फोंडाभाव संवत्सर. श्रीदेवास अमृतपड नंदादिप चालावे याबद्दल महाराज स्वामीनीं मौजे मजकुरचीं ठिकाणें घालून द्यावीं म्हणून श्रीदेवास शिक्के रायस दिला असे व देसाई गांवकर यांचे नावीं शिक्के-रायस आळा असे. त्याप्रमाणें रा. अधिकारी विरम्मानवरु यांचे पत्र रा. फोंडे सुभेदार ज्ञान लिगया नवरु यांस श्रीमुख संवत्सर युक्तभावचैत्र बहूल ११ दर्शीचे मितिचें आलें ते भाद्रपद १४ शी दिवशीं पावलें, तेणेंप्रमाणें व दोन रायंसा प्रमाणें सर सुभेची सनद मामलीं सादर झाली ती पाहून मौजे मजकूर पैकीं ठिकाणा दुमाला करुन दिलीं आहेत. येणें प्रमाणें ६४० असर्फीची ठिकाणा श्रीदेवास घालून दिली आहेत. येणें प्रमाणें साल दर साल चालवून देणें, हे सनदीची तालीक लिहून घेऊन अस्सल सनद भोगवटेस फिरावून देणें. ताजें सनदीचा हुजूर न करणें. जाणिजे रवाना कार्तिक शु. १५ मा ( मोर्तब शुद्ध धाकटा शिक्का )

या देवस्थानचे वार्षिक उत्पन्न ( प्रियोळ गांव २५ हजार रुपये असून खर्च २० हजार रुपयांचा आहे.

असा हा श्री मांगिरीश देवाचा वृतान्त आहे. या वृतान्तांत श्री मंगेशाचे मूळ, त्याची स्थापना त्याचे स्थलांतर, पुन्हा प्रतिष्ठपना देवाल-याचाजीर्णोद्धार व त्याचा योगक्षेम संसार चालविण्यासाठीं दिलेल्या

देणग्या व दैनंदिन व नित्यनैमित्यिक कार्यक्रमाची माहिती वगैरे सर्व प्रकारची साद्यंत माहितो देण्यांत आली आहे. श्री मांगिशाचें देवालयांतील खांब फार प्रसिद्ध आहेत; म्हणून गोमांतकांत " श्री मंगेश देवाचा खांब, श्री महालक्ष्मीचा चौक, श्री शांतादेवीचा घूड, श्री नागेशदेवाचा तलाव, श्री म्हाळसादेवीचे स्थळ आणि कामाक्षोदेवीचे गण " अशी म्हण प्रसिद्ध आहे गोमांतकांत या देवतेचें किती महात्म्य आहे, याची माहिती देण्याचे कारणच नाही. अगोदरच देश निसर्गसुंदर, त्यांत श्री मंगेशाचे देवस्थान असलेली जागा नितांतरमणीय, देवालयांची मांडणी व प्राकार सर्वांगसुंदर अशा या ठिकाणीं असलेल्या श्री मांगिरिशाला

नमो देवा महादेवा आदिदेवा सदाशिवा ।
अव्यक्ता अजिता ईशा मांगिरीशा नमोस्तु ते ।।

या प्रणाम मंत्रानें नमन करुन हा लेख आटोपता घेतों ●●●




हिमालयांत जीं कांहीं निसर्गसंपन्न खोरी आहेत त्यांत कुलु खोरे हें अधिक संपन्न खोरे आहे. आणि या खोऱ्यांत ज्या मनोहारी दऱ्या आहेत त्यात मनाळी ही सर्वश्रेष्ठ दरी आहे. कुलु खोरे, हे या सर्व निसर्ग संपन्न खोऱ्यांचा राजा मानले तर मनाळी ही वैभव संपन्न राजकन्या होय हिमालयाच्या अगदी अंत:पुरात ही राजकन्या वास्तव्य करुन आहे. हिमालयाच्या सर्व दऱ्या निसर्गसंपन्न आहेत त्याप्रमाणें मनाळी हीहि निसर्गसंपन्न

आहे, नैसर्गिक सौंदर्याचा संपन्न साज हिनें घातला आहे. तथापि तिथें मिळणारी शांतता, एकांत हा अद्वितीय आहे. म्हणून या दरींत, महाभारताचा जनक महर्षि व्यासमुनि तपासाठी येऊन राहिला होता. पांडवांनी आपल्या अज्ञातवासासाठीं या दरीची निवड केली होतीं, आणि आपले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हेहि विश्रांतीसाठी याच दरींत रहावयास जातात. हे ठिकाण समुद्रसपाटीपासून सहा हजार फूट उंच असल्याने तेथील हवाहि थंड आहे. सारांश मनाळी सुंदर आहे. शांतता तिथें नांदते आणि थंड हवा हें तिचें लेणें आहे. सुंदर, शांत आणि थंड अशी ही मनाळी तपस्व्यांना आपल्याकडे खेचते, अज्ञातवास करणारांना थारा देते, आणि राजकारणी मुत्सद्यांना आपल्या थंड हवेने आराम देते.

काश्मीर खोऱ्यांत अमरनाथाच्या वाटेवर जसे पहेलगांम तसेच कुलू खोऱ्यांत रोहटांगच्या मार्गावर मनाळी. पठाणकोट या रेल्वेच्या शेवटच्या स्टेशनापासून कुलू सुमारे चाळीस मैलांवर असून तिथून मनाळीस जाण्यास मोटार मार्ग आहे. कुलू ते मनाळी दरीतून अवखळपणें वाहणाऱ्या बिपास नदीच्या कांठाकांठानें गेलेला आहे. आजकाल मनाळीस एका थंड हवेच्या ठिकाणाचें ( Hill Station ) चें स्वरूप आले असल्यामुळें, तिथें मानवी सहवास अधिक होऊं लागला आहे. तिथे शहरी वस्तींतल्या आधुनिक सुखसोयी नाहीत, तिथें नाच गाणें नाही जे आहे ते सारे निसर्ग सौंदर्य. निसर्गानें निर्माण केलेल्या नैसर्गिक सुखसोयी, वायूचे गाणे, नदीचे नाचणें आणि यामुळेच मानवी मनाला तिथें विरंगुळा वाटतो, ते उल्हसित होते आणि त्याला जगाचा विसर पडतो. या ठिकाणीं माणसाचा प्रवेश होतांक्षणी तेथील सौंदर्यानें त्याचें मन हेलावून जाते कारण येथें निसर्ग-सौंदर्याचें वैपुल्य आढळते, ते सौंदर्य विलोभनीय आहे अगदीं थेट निसर्गाप्रमाणेंच ते नैसर्गिक सौंदर्य आहे. त्याची बरोबरी फक्त निसर्गच करूं जाणे. देवदार आणि इतर जंगली झाडांनी सारें डोंगर भरुन गेलेले आहेत. रानटी विविध पण अनुपम रंगरंगोटीच्या फुलांनी तो प्रदेश

बहरलेला आहे. त्या फुलांचा मादक सुगंध आंधळ्यांनासुद्धां आपल्या अस्तित्वाची चाहूल लावतो. वाऱ्याची मंद झुळूक या सुगंध ची स्वैर पखरण करते. या सुगंधित वातावरणांतून विहार करूं लागले कीं निसर्गाचे ते मुलायम सौंदर्य व पाणुल्यांची ती भावगुंजने मानवाचे देहभान हिरावून घेतात. मनाळीतील निसर्गाची ती विविधता व विपुलता; रंगीबेरंगी फुलांचे ते स्वैर पसरलेले गालिचे; फळांनी बहरलेले ते वृक्ष आणि त्याहिपेक्षां या स्थळीं वास्तव्य करुन राहिलेले ते सुखी लोक यामुळें या दरीतून पाय काढूं नये असे वाटते. कायमचे अगदीं तिथेंच रहावे, तिथेंच फिरावे, तिथेंच त्या पाणुल्यासंगे नाचावे बागडावे असा मोह होतो.

दरींतील लोकांची रहाणी अगदींच साधी आहे. ते गरीबीत रहात असले तरी त्या गरीबीची त्यांना खंत वाटत नाहीं. त्यांची वृत्ती समाधानी आहे. त्यांचा स्वभाव मित्रभावी आहे. सण साजरे करणें, यात्रा भरविणें आणि सामुदायिक संचार करणें यांतच ते सुख मानतात. त्यांचे अनेक सण असले तरी दसरा हा ते लोक आपल्या सणांचा राजा मानतात, दरीतील झाडून सारें जण त्या दिवशी आनंदानें नटतात शृंगारांनी सजतात आणि एकत्र येऊन सण साजरा करतात. 'दसरा सण मोठा, नाहीं आनंदा तोटा' याची येथें शब्दश: प्रचीति येते. त्यांची गाणी हृद्य वाटतात, ती कानाला गोड वाटतात आणि हृदयाला जाऊन भिडतात. रानावनांत कामे करतांना गाइलेली गीते त्या गायकांच्या विलोभनीय तोंडवळ्यापेक्षाहि अधिक मनोहारी वाटतात. ती सामुदायिक गीते, त्यांत विखुरलेलें निसर्गप्रेम, त्यांत प्रतीत होणाऱ्या उत्कट आणि उत्फुल्ल भावना यांनी जातीच्या कवीलाहि शरणागति देण्यास भाग पडते आणि त्यांच्या त्या कथा त्यांत त्यांचे निसर्गावरील प्रेम, दरीविषयीचो स्वाभिमानी भावना आणि त्याच्या सान्निध्यांतच सतत रहाण्याचा तीव्र लालसा या भावगुणांनी ओतप्रोत भरलेल्या असतात. पुढील एकच कथा याची प्रचीति देऊं शकेल.

मनाळीची राजकन्या. तिचा विवाह झाला. आणि ती सासरी प्रथमच

नांदावयास गेली. तिचें सासर मनाळी पासून कांहीं मैल अंतरावर होते. नागगार त्याचें नांव. त्या गांवांत सर्व कांही होते. तिचे सासर तिला साजेसे होते सासरची सारी माणसे स्वभावानें फारच गोड होती. पण तिथें मनाळीच्या आसमंतात असलेले डोंगर नव्हते. तिथें देवदाराच्या राई नव्हत्या, त्या रंगढंगाच्या फुलांचे ताटवे नव्हते, ते अवखळपणें वाहणारे पाणुले नव्हते. आणि हे वैगुण्य त्या राजकन्येच्या ठायीं विफलता निर्माण करुं लागले. ती सुखात लोळत असून दुःखी बनत चाललीं. चांगल्या माणसांच्या सहवासांत असून तिला त्यांचा सहवास नकोसा वाटूं लागला. ती दिवसें-दिवस खिन्न होऊं लागली. सासरच्या मंडळ स तीं असे कां वागते याचे कोडे उलगडेना. त्यांनी नानातऱ्हांनी तिला प्रसन्न राखण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ. तिची खिन्नता वाढतच होती. आणि याच विफलतेत ती एकांतात राहूं लागली. अखेर तिनें एके दिवशीं आपल्या पित्याला पत्र लिहून आपल्या व्यथेला वाचा फोडली. तिनें पत्रांत लिहिलें होते कीं, 'मनाळीच्या आंवती भवतीचे डोंगर मला पाहावेसे वाटतात. त्या नद्यानाल्यांतून वाहणाऱ्या जलौघांचे गुंजन मला ऐकावेसे वाटते. याची येथे वाण आहे. ही माझ्या उदासिनतेची कहाणी आहे.' राजानें हें पत्र वाचले. त्याच्या पुढें प्रश्न उभा राहिला कीं या व्यथेला तोड काय? त्यानें राजवाड्यापुढील उद्यानांत आपल्या राणीस पाचारण केले आणि तिथे त्यानें ते पत्र राणीस वाचून दाखविले. राणीहि ते पत्र ऐकून चिंतातूर झाली.

राजाने राणीला वाचून दाखविलेलें ते राजकन्येचें पत्र. त्या उद्यानांत फुलांच्या ताटव्यावरुन मध गोळा करीत असलेल्या मधमाशांनी ऐकले. पत्र ऐकून आपल्या राजकन्येविषयीं त्यांच्या मनांत दया निर्माण झाली. कारण त्याच उद्यानांत फुलांच्या बहरलेल्या ताटव्यांत विहार करींत असलेली राजकन्या त्यांची मैत्रिण बनली होती. आपल्या या मैत्रिणीचें दुःख ऐकून त्या चिंतातूर झाल्या. पण त्या स्तब्ध बसल्या नाहींत. त्या उद्योगी होत्या. त्यांनी आपल्या लाडक्या मैत्रिणीच्या व्यथेवर तोडगा काढला आणि त्या उद्योगास लागल्या. राजकन्येचा आवडता डोंगर त्यांना

माहित होता. त्या डोंगराकडे त्या सान्या धावल्या आणि त्याचा एक भला मोठा लचका तोडण्याचा त्यांनी उद्योग आरंभिला. कांहीं दिवसांत त्या डोंगराचा एक भाग त्यांनी तोडून अलग केला आणि आस्ते आस्ते तो नागार गावी राजकन्येच्या सासरी तिच्या दारी नेऊन ठेवला. मनाळीचा हा कडेपठार आपल्या दारांत पाहून राजकन्येस आनंद झाला. ती उल्हसित झाली. उत्साहानें फुलून गेली. आपल्या स्नुषेच्या स्वभावातील हा पालट पाहून तिच्या सासूसासऱ्यांनाहि फार आनंद झाला. या आनंदाच्या भरांत त्यांनी घराबाहेर येऊन पाहिलें तों राजकन्या त्या दारांतील डोंगराच्या तुकड्याशी खेळूं लागलेली, हितगुज करीत असलेली दिसली. त्यावेळी त्यांना आपल्या स्नुषेची व्यथा काय होती हे उमगून आले. नागरच्या किल्ल्यांत तो डोंगराचा तुकडा आजहि पडलेला दिसून येतो. आणि मनाळीत ज्या डोंगराचा भाग मधमाशांनी दीर्घोद्योगानें तोडला तो डोंगरहि उभा असलेला दृष्टीस पडतो आणि तेथील लोक मोठ्या अभिमानानें मधमाशांची कथा सांगून डोंगराचा भाग दाखवितात. तेथील लोकांचे केवढे निसर्गप्रेम हे आणि मधमाशांची केवढी दीर्घोद्योगशीलता ही!

राजकन्येच्या व्यथेच्या या कथेवरुन मनाळीच्या निसर्गवैभवाची कल्पना येते. हे निसर्ग सौंदर्य प्रत्येक ऋतूंत आगळें असते. आणि हा आगळेपणाहि प्रत्येक खेपेस निराळेच पण अनुपम सौंदर्य प्रतीत करतो. उन्हाळ्यांत मनाळीच्या अंवतीभवतीची गिरीशिखरे आपल्या अंगावरील बर्फ झाडून टाकतात त्या बर्फाचे पाणी होते आणि हे पाणी त्या उंच गिरींतून धों धों अशा आवाजांत फेसाळ पांढऱ्या रंगात, दरीतून वाहणाऱ्या बियास नदीच्या पात्रांत येऊन मिळते, वृक्षराज आपली जीर्ण पर्णे टाकून नवी पर्णे परिधान करतात. क्वचित एखाद्या फांदीवर बहरलेला मोहर अगर फुलें दिसू लागतात. आणि नदीच्या किनारीं पट्टीवर सुसरे पीक डौलानें डुलत असते. या नंतर तो पावसाळा. जिकडे तिकडे हिरवे गार गवत, हिरवेगार रानें, आणि फुले फुललेली आणि त्या फुलांवर मध गोळा घोंघावणाऱ्या त्या मधमाशा. या साऱ्यांनी अवघे वातावरण सुगंधमय होऊन गेलेले असते.

हा हिरवा गालीचा सोनेरी करीतच हिवाळा येतो. गव्हाची शेते सोनेरी झालेली असतात. गहू आणि बार्ली यांची पिके आलेली असतात. झाडे फळाफुलांनी बहरून जातात. आणि निरभ्र आकाश अधिकच निळसर व शोभिवंत दिसू लागते आणि ती गिरीशिखरे आपल्या हिमबुरखा परत पांघरून घेऊन शुभ्र होऊन चांदीच्या चकाकीने चकाकू लागतात. सारी दरी बर्फाच्छादित होते. जिकडे पहावे तिकडे बर्फ अखंड बर्फाचा लेपच दिला आहे कीं काय असा देखावा दिसू लागतो. सर्व ऋतूंत साऱ्या दरींत इंद्रधनूचे सर्वहि रंग उधळत जातात आणि म्हणून तेथील लोक मागासले असूनहि सुखी असतात.

या लोकांना शिक्षित करण्यासाठी अनेक प्रकारे प्रयत्न केलें जातात पण या लोकांत शिक्षणाचा प्रचार व्हावा तसा झपाट्यानें होत नाही. शिक्षण घेण्यास ते लोक आतुर नसतातच मुळीं. केव्हां केव्हां तर त्यांचा देवभोळेपणाहि त्यांचा शिक्षणाआड येतो. आपल्या भारत सरकारनें कुलू खोऱ्यांत शिक्षण प्रसार व्हावा या हेतूनें मालन या गांवीं शाळेची सोय केली. या गांवचें ग्रामदैवत जमलु देव आहे. या देवाला घाबरून या शाळेकडे कुणीहि फिरकत नाहीं. देव विरूद्ध सरकार असा तिथें पेच निर्माण झाला आहे. यावर काय तोड काढावी हे अधिकाऱ्यांना कोडे पडले आहे. मालव हे खेडे कुलू खोऱ्यांत अगदीं उंचीवर ९००० फुटांवर आहे. कुलूपासून हे मालन गांव पंचवीस मैल अंतरावर आहे. तेथें सक्तीच्या मोफत शिक्षणाची योजना सरकार अमलांत आणू पहात आहे. पण त्या गांवकरी लोकांना त्यांचा जमलुदेव शिक्षण घेणे पाप आहे अशी भीति घालत आहे हे लोक देवभोळे व पापभिरू आहेत. कानाशी नावाची भाषा हे लोक बोलतात. या भाषेला अजून लिपीचा लाभ झालेला नाहीं या भाषेचें इतर जवळपासच्या भाषेशीं कोणतेहि साम्य नाहीं. ही या लोकांची एक खास भाषाच आहे त्याचप्रमाणें या गावकऱ्यांचा जमलू देवहि मोठा अजब असावा. या देवाचे देऊळ नाहीं कीं मूर्ति नाहीं निर्गुण निराकार असाच हा देव असून तो दाट झाडींत वास्तव्य करून असतो अशी या खेडुतांची अंधश्रद्धा आहे.

या भागांतील लोक असे अशिक्षित असले तरी, ज्यांना ध्यानांत मग्न व्हावयाचे होते अशा ऋषिमुनींनी येथेंच ईशसाधना केलेली होती. महाभारताचा निर्माता व्यासऋषी याच बियास नदीच्या कांठानें रोहटांग पर्यंत गेला असून त्यानें आपल्या साहचर्यानें बियास नदीस आपले नामाभिधान दिलेले आहे. इतके एकत्व या दरीतून स्वैरपणें वाहणाऱ्या नदीचें आणि व्यासमुनींचें झालेले होते. रोहटांगच्या वाटेवर मनाळीपासून थोड्याच अंतरावर एक गंधकयुक्त जलाचा झरा आहे. या झऱ्यास वशिष्ठ झरी असें नांव आहे. श्रीरामप्रभूचे गुरु वशिष्ठ येथे बरीच वर्षे तप करीत होते, असें म्हणतात. मनाळी शेजारीच असलेल्या घनदाट वृक्षराजींत पांडवांनी आपल्या अज्ञातवासांतील कांहीं काल घालविला होता अशी आख्यायिका सांगितली जाते. येथेंच डुंगरींचे देवालय आहे. या देवालयासंबंधी अशी एक लोककथा येथे प्रचारांत आहे कीं जेव्हां या अरण्यात पांडव वास करीत होते तेव्हा त्यांचा शोध लावून देण्याचा विडा उचललेल्या आपल्या भावाच्या तडाक्यातून पांडवास सुरक्षित राखले त्या स्त्रीच्या स्मरणार्थ हे देवालय आहे

ऋषिमुनीजनांची तपोभूमि, निसर्गवैभवाची रम्यभूमि आणि कलाकारांची स्वप्ननगरी असे हे मनाळी निसर्गाचे लेणें आहे. भारताच्या भूभागावर, हिमाचलाच्या नगराजावर अशी निसर्ग लेणी अनेक आहेत. काहीं ज्ञात आहेत तर बरीच अजून ज्ञात व्हावयाची आहेत. पण मनाळीचे सौंदर्य असाधारण होय !




महाराष्ट्राचीं मनाली, या सार्थ सादृश्यानें शोभायमान होणारे, जर कोणते स्थळ महाराष्ट्रांत असेल तर ते म्हणजे आजऱ्याचे रामतीर्थ हे होय. आजरा हा गांव महाराष्ट्रांतील दक्षिण भागांतील कोल्हापूर जिल्ह्यांत आहे. हिरण्यकेशी आणि चित्रा नदी यांच्या संगम प्रदेशांत या गांवचा परिसर पसरलेला आहे आजरे गांवास बेळगांव हुकेरी रोड, कोल्हापूर सावतवाडी या ठिकाणाहून एस. टी. मोटार बसीसनें जाता येते. कोल्हापुरहून सकाळी आजऱ्यास एस. टी. बसनें जर आपण आजऱ्यास निघालो तर आजऱ्यापासून ८ मैल अलिकडे निसर्ग रमणीयतेचा ठावठिकाणासुद्धा लागत नाही. आणि ८ वा मैल आपण ओलांडून पूढें

गेलो आणि तांबड्या मातीबद्दल प्रसिद्ध असलेल्या त्या मोटार मार्गावरुन आपली मोटार धुळीचे लोळ उडवीत धावू लागली म्हणजे त्या आजूबाजूच्या निसर्गरमणीय घनदाट झाडीनें वातावरण एकदम प्रसन्न होऊन जाते. रखरखीत उन्हांतून, गार गार अशा मंद झुळकीच्या वाऱ्यांत जेव्हा मोटार प्रवेश करते तेव्हां मन उल्हासित होते. आणि जिकडेतिकडे गारेगार अशी झाडे दिसूं लागतात. आजऱ्यापासून ४ मैल जवळ आल्यानंतर तर निसर्गरमणीयतेला पारावरच रहात नाहीं वृक्षराजींतून नागमोडी वळणें घेत, जेव्हा मोटार धावू लागते, तेव्हाचे दृश्य तर अत्यंत मनोहारी वाटते. जर पावसाळ्यांत या रस्त्याने प्रवास करण्याची संधि लाभली तर आजूबाजूच्या डोंगराळ भागांतून वहाणारे पाणुले आपल्या पांढऱ्या शुभ्र फेसाळ प्रवाहानें खळखळ आवाज करीत पुढें पुढें धावत आलेले दिसतात. मध्येच एखादा पाणुला उंचवट्यावरुन अवखळपणें खाली उडी घेत असलेला दिसतो तर लागलीच तो संथपणें वाहून मध्येच कुठेंतरी गडप होतो व पुन्हा अवखळपणें उड्या मारत धांवत सुटतो. अशी ही निसर्गरमणीय दृश्यें मेजवानीप्रमाणें डोळ्याला आल्हाद देत असतात. अंमळशानें मोटार हिरण्यकेशी नदीच्या सानिध्यांत येथें रस्त्याच्या आजूबाजूला ती कळकीची भळीमोठाली बेटे घों घों वहाणाऱ्या वाऱ्यांत सूं सूं आवाज करीत उभी असलेली आढळतात. आणि थोड्या वेळानें मोटार हिरण्यकेशीच्या पुलावर येते. हिरण्यकेशी नदी येथें खळखळ खळझळ वहात हिरव्यागार शेवाळी पाण्यचा प्रवाह अधून मधून चंदेरी कड्याच्या प्रसन्नतेनें वाहून नेत असलेली दिसते. येथें नदी उत्तर दक्षिण वहाते व पूल पूर्व पश्चिम आहे. पुलाच्या उत्तरेकडील बाजूस नदीचा हा खळखळणारा प्रवाह असतो तर दक्षिणेकडील बाजूस नदीचा प्रवाह संथपणें वहात असलेला आढळून येतो. पुलाच्या या सीमारेषेनें नदीच्या प्रवाहांत जाणवणारा हा फरक पाहला की, निसर्गाच्या लीलेचे कौतुक करावेसे वाटते.

नदीचा पुल ओलांडला कीं तेथेच रामतीर्थाला जायचा रस्ता फुटतो

येथून रामतीर्थ सुमारे १॥ मैल अंतरावर असले तरी रामतीर्थाचा परिसर येथूनच सुरूं होतो, असे म्हणावयास हरकत नाही. मोटारीतून उतरून आपणांस येथून पायी जावे लागते. मोटार जाण्याइतकासुद्धा रस्ता चांगला आहे. या रामतीर्थ तिठ्यावरून आजरा गांव दक्षिणेस १ मैल अंतरावर आहे. रामतीर्थ तिठ्यावरून आपण उत्तरेकडे नदीच्या प्रवाहाशीं समांतर असलेल्या रस्त्यानें पायीं चालत निघालो कीं, आपणांस निसर्गाच्या आगरांतून निघाल्याचे सुख लाभते. पूर्वेकडे घनदाट जंगलांतून वहाणारा तो हिरण्यकेशीचा अवखळ प्रवाह तर पश्चिमेकडे ऊंचच ऊंच डोंगर लागतो या डोंगरांतून निघाले असतां आपल्या कानांवर निरनिराळ्या पक्ष्यांचे किलबिल आवाज येत असतात कुटुर्र ऽऽ घुम या आवाजानें तर माणसाचे चित्त चळते आणि तो जर शिकारी असेल तर ' अरे हा तर कवडा, तो पहा झाडाच्या फांदीवर कसा बसला आहे ऐटींत ' असे उद्‌गार त्याच्या मुखावाटें निघाल्याखेरीच रहात नाहीत. मध्येंच सोनेरी पंखाच्या भारद्वाजाचे ओरडण्याचें आवाज ऐकू येतात. तर लांबून कुठूनतरी अज्ञात स्थळांतून मोरांचें मियॉंव मियॉंव असे रव कानी पडतात. करवंदीच्या झाडाझुडपांतून एकाद् दुसरी चिमणी उडतांना दिसतें तर केव्हांतरी एकादा ससा या झुडपांतून त्या झुडपांत टुणटुण उड्या मारींत गेलेला दिसतो. आतां आपण तिठा ते रामतीर्थपर्यंतचे अर्धे अंतर तोडून आलो आहोत. येथें आपला रस्ता नदीच्या पात्रापासून १५–२० फूट ऊंचावर जातो. त्यामुळे उजवीकडील नदी झाडाझुडपांतून वहातांना पाहून मन प्रमोदित होऊन जाते. अंमळशानें आपण रामतीर्थाच्या अगदी परिसरांत येतो. तेथें एक शिवालय आहे. शिवालयाची पिंड बरीच मोठी आहे. या पिंडीच्या पूर्वेकडील बाजूस एक भला मोठा सुबक व डौलदार करणीचा नंदी चारी पायांवर बसलेला दिसून येतो. या नंदीइतका मोठा नंदी, एक कोल्हापूर सोडले तर आजूबाजूस कोठे आढळून येत नाही. कोल्हापूरांतही रंकाळ्याच्या पूर्व बाजूस एवढाच एक मोठा नंदी आहे. पण तो फुटलेला असून सिमेंटनें सांधलेला आहे, त्यामुळें त्यांस गौण स्वरूप आलेले आहे.

आजऱ्याच्या रामतीर्थावरील हा नंदी कुठेच भंगलेला नाही. एका शिळेचा तो आहे. आणि त्याची मांडणी इतकी रेखीव आणि कलात्मक आहे कीं त्या नंदीकडे कितीतरी वेळ पहातच बसावे, असे वाटते. या देवालयाच्या पूर्व बाजूस वट–पिंपळाची ऊंचच ऊंच कितीतरी वर्षांपासूनची झाडे आहेत. या झाडाखालून निघाले आणि वर मान घालून पाहिले कीं, झाडाचा शेवट मनुष्यास दिसू शकत नाहीं, इतकी ती ऊंच आहेत व ती इतकी जुनी आहेत, कीं, दोन पिढ्यांपूर्वीच्या माणसांनासुद्धां त्यांचे बालपण आठवत नसावे. या ऊंचच उंच झाडावर हत्तीच्या कानासारखी लोंबणारी मधाची पोंवळी पाहिली कीं, मनुष्य आश्चर्यानें स्तिमितच् होतो, तर किंचितशा भितीनें तो गांगरुन जातो. कारण मधाचें पोवळे पहावयास सुंदर असले यांतील मध च खावयास मधुर असला तरी त्यांत घर करुन बसलेल्या मध-माशा केव्हा कोण उठविल व माणसांचा चावा केव्हा घेतील याचा नेम नसतो. कारण त्या झाडावरुन दुसऱ्या झाडावरुन खॅस् खॅस् असा आवाज काढीत उड्या घेणारे ते वानर पहा. सर्कशींतील हिंदोळ्यांवर उड्या मारणाऱ्या खेळाडूप्रमाणें उड्या घेत इतस्तत: क्रिडा करीत आहेत. या क्रिडेतून जर एखाद्या माकडाचा धक्का, तो मधाची पोवळी असलेल्या फांद्यास लागला, तर त्या पोंवळ्यांमधील माशा, आपली समाधि भंग पावल्यानें संत्रस्त होऊन सैरावैरा उडू लागतील व केव्हा कोणाचा चावा घेतील याचा नेम नसतो. यावरुन माकडचेष्टा हा शद्वप्रयोग निर्माण झाला की काय कोण जाणें!

नंदीच्या पूर्व बाजूस एक पाऊलवाट आहे. ही पाऊलवाट नदीच्या पात्रापर्यंत जाते. हे शिवालय ओलांडून थोडे उत्तरेकडे गेले कीं, धबधब्याचा आवाज ऐकू येतो व नदीच्या पात्राच्या कांठावर बांधण्यांत आलेल्या त्या धर्मशाळेजवळ मनुष्य गेला, तर त्यास निसर्गाच्या अंत:पुरात गेल्यासारखे होते येथें नदी ५।२५ फूट उंचीवरुन उडीं घेते. सारा खडकाळ भाग, काळेकुळकुळीत फत्तर, मातीचा कणहि येथे दिसून येत नाही. नदी येथें वळसा घेऊन आलेली असल्यामुळें नदीच्या पूर्वेस व उत्तरेस घनदाट

३८६९० ...ग्रं.प्रवास
११५
३५२ ६५५६

जंगलाचें ऊंचच ऊंच डोंगर आहेत व नदीच्या पश्चिम बाजूस ऊंचवटयावर रामाचे देऊळ आहे. या देवळाच्या पलिकडे नदी सपाटपणें वहातें. तथापि प्रदेश सारा खडकाळच नदी जेथे वळण घेते त्या वळणावर २५ । ३० फुटाच्या अंतरानें छोटे छोटे दोन धबधबे आहेत व तिसरा तो धबधबा मागें सांगितल्याप्रमाणें ५१२५ फूट ऊंचावरून उडया घेतो आहे. येथें नदीचे पात्र २०० फूट रूंद आहे, त्यामुळे येथील दृश्य विलोभनीय दिसते रमणीय निसर्ग म्हणतात तो हाच याचा येथें प्रत्यय येतो. येथें खडक इतके स्वच्छ आहेत कीं, या खडकावर रामतीर्थास सहलास येणारे लोक पानपात्र शिवाय आहार करुं शकतात, इतकें ते खडक स्वच्छ आहेत; याच खडकावर एके ठिकाणी खडकांत श्रीरामाची पाऊलें उठलेली आहेत. रावणानें सीतेचा अपहार केल्यानंतर जेव्हा राम सीताशोधासाठीं रानोमाळ फिरूं लागले, तेव्हा ते येथें आले होतें व त्यावेळी त्यांची हीं पाउलें उठली आहेत, अशी भाविक लोकांची समजूत आहे. या श्रद्धेच्या जोरावर या स्थानास रामतीर्थ असें मानले जाते; आणि म्हणून नदीच्या पात्राबाहेरील पश्चिम बाजूकडे पूर्वाभिमुख असें मंदिर आहे. त्या मंदिरात राममूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. या मंदिरांतील मूर्ति छोटयाश्याच पण रेखीव आहेत. एका ऊंच आसनावर त्या अधिष्ठीत आहेत. या राममंदिरांतच दक्षिणेकडील बाजूस उत्तराभिमुख हनुमानाची मोठी मूर्ति आहे या मंदिरांत दोन मोठाले दगडी गोळे असून त्यांचीहि पूजा नित्य केली जाते. त्या दोन दगडी गोलास सूर्य व चंद्र असे मानलें जाते. टाकीचें घांव घालून केल्याप्रमाणें ते दोन दगड गोल आहेत· निसर्गतच गोल आहेत. त्या गोलाबाबत अशी एक कथा सांगितली जाते. कीं, रामतीर्थावरील बुवा स्नानास धबधब्यांत उतरले असतांना त्यांना धबधब्याच्या पाण्यांत तळास हे दोन गोल आढळून आले. त्या बुवानीं ते गोल पाण्यांतून लीलया बाहेर काढले. पण पाण्यांतून बाहेर आल्यानंतर त्या जलशिळा शिळे प्रमाणें जड झाल्या, तेथून महत्प्रयासाने त्या बुवानी ते दोन्ही दगड आणून त्यांची देवालयांत प्रतिष्ठापना केली. देऊळ साधेच आहे.

दी: क्र. १०२-६०

अलिकडच्या बांधणीचे आहे. पण निसर्गाच्या कोंदणांत बसविल्याप्रमाणें असल्यानें त्याचे रमणीयत्व शतगुणित झाले आहे. देवळाच्या बाहेर ओटयावर प्रातःकाळीं बसले असतां पूर्वेस त्या ऊंचच ऊंच डोंगररांगा व त्या पलीकडून डोकावणारा महाप्रतापी रविराज आपली किरणें नदीच्या प्रवाहांत फेकून त्या प्रवाहास सूर्यस्नान घालीत आहे की काय असा भास होतो. पावसाळयांत पाणी दुतर्फा वहाते, पण नदीचे पात्र देवालयांतील देवाचा पदस्पर्श करुं शकले नाहीं असें वृद्धांकडून सांगितले जाते. या देवालयाच्या मागच्या बाजूस बुवांचा मठ व धर्मशाळा आहे. येथें सहलीस जाणाऱ्यास येथें भांडयाची वगैरे सोय बुवाकडून करण्यात येते. येथील बुवा संन्यासी असून त्यांची नेमणूक उत्तरेकडील त्यांच्या मूळ स्थानाकडून केली जाते.

असें हे निसर्गरमणीय स्थळ पहाण्यास येणाऱ्यासाठी या राममंदिराच्या दक्षिणेकडील बाजूस दोन आधुनिक पद्धतीच्या धर्मशाळा बांधण्यांत आलेल्या आहेत. पैकी एक फार जुनी व दुसरी अलिकडील आहे. या धर्मशाळांत रात्र उतरणाऱ्यास आजूबाजूच्या जंगलांतील श्वापदापासून त्रास होऊ नये व भय राहू नये यासाठी त्या बंदिस्त बांधण्यांत आलेल्या आहेत. रामतीर्थाच्या या जंगलांत क्वचित प्रसंगीं कोल्हे व वाघ आढळून येतात, यामुळें तो भाग किंचितसा भयग्रस्त आहे. पण आजपावेतो या भागांत अशा श्वापदांनी कोणासहि इजा पोचविलेली आढळून येत नाही. हाहि एक या स्थळाचा महिमा मानला जातो. या धर्मशाळांत एक दोन दिवसांसाठीं जाऊन रहाणारे, असे पुष्कळ हौशी प्रवाशी आहेत. आणि सहलीसाठीं म्हणून सुद्धा पुष्कळ शाळांच्या तुकडया जातात. या शिवमंदिराच्या परिसरांत शिवरात्रास मोठी यात्रा भरते व हा एकच दिवस असा आहे कीं, या पवित्र निर्जन स्थळीं हजारों यात्रेकरु निर्भयपणें वास करुन देवदर्शन घेतात व निसर्गाचे वैभव लुटीत असतात.

हिमालयांतील मनाळी, आणि सह्याद्रीतील हे रामतीर्थ या दोहोंवरहि निसर्गाचा सारखाच वरदहस्त आहे. म्हणूनच आजऱ्याच्या या रामतीर्थास ' महाराष्ट्राची मनाळी ' असें संबोधिले जाते.

ठेवीदारांच्या पूर्णविश्वासातील व जिल्ह्यातील सहकारी
व आर्थिक क्षेत्रांत आघाडीवर असलेली

**कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि,**
**कोल्हापूर.**

मुख्य कचेरी :- शिवाजी रोड, कोल्हापूर

तार:- कोडिको बँक) रौप्यमहोत्सवी वर्षांत पदार्पण केलेली (फो. नं ३४२
जिल्ह्याच्या निरनिराळ्या भागांत एकूण २५ शाखा.

(१) अधिकृत शेअर भांडवल :- रु. १ कोटी
(२) खपलेले भांडवल :-
(अ) सभासदाकडील :- रु. ५१.९१ लाखाचे वर
(ब) सरकारनें घेतलेले :- रु. २२.०० ,,
एकण ७३.९१ ,,
(३) एकूण ठेवी :- रु. २॥ कोटीवर
(४) खेळते भांडवल :- रु. ६ कोटीवर

नगरपालिका, जिल्हा परिषद वगैरे महत्वाच्या संस्थांच्या ठेवी स्विकारणेस सरकारी मान्यता असलेली, ठेवीचा उपयोग प्रामुख्यानें शेती उत्पादन वाढ व शेतकऱ्यांचे हितासाठींच करण्यास सतत झटणारी जिल्ह्यातींल एकमेव बँक. तसेंच जिल्हा परिषदेच्या आर्थिक व्यवहारासाठीं सरकारनें मान्य केलेली एकमेव बँक.

कोल्हापूर मा. ह. भडभडे व्ही. के. चव्हाण पाटील
मुख्य व्यवस्थापक. अध्यक्ष

---

मी असा, माझें कसें, पुढें कसें? याचा खुलासा

**श्री रामानंद ज्योतिषमंदिर**

येथें प्रश्नमार्गानें अगर पत्रिकाद्वारा केला जाईल. तारीखवार जन्मवेळा दिल्यास पत्रिका तयार करून देऊं.

पत्रिका फी रु २-५० प्रश्न फी रु. १-२५
पोस्टेज ५० न. पैसे. भेटा अगर लिहा

**ज्योतिषी :- कृष्ण हरिभट्ट रेगे**

श्रीरामानंद ज्योतिषमंदीर, मु. कवळें. पो. फोंडा गोवा

आमचेकडे 'अमर श्रद्धास्थानें' मूल्य ४ रु. हे मिळेल

REFBK-0014266

REFBK-0014266

[illegible]
[illegible] ........................ वि: ........................
[illegible] ........................ [illegible] ........................